सचिव विभाग

मा० महासभा

मा.महासभा स.सु.क्र०४

दि.२८/०६/२०१३

स: दि. ०६/०७/२०१३

प्रकरण-क्र. २१ ते २३

मुळप्रत

पुरक घोषणा

प्रकरण-क्र-२४ ते २८

(४)

१३/१४

# <u>मिरा भाईंदर महानगरपालिका</u>
मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २७/०६/२०१३.

## <u>मा. महासभा</u>

**मा. महासभा सूचना क्र. :- ०४, दिनांक २७/०६/२०१३.**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ________________________

नगरसेवक/नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा शनिवार दि. ०६/०७/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०४, दि. २७/०६/२०१३ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

मा. महासभा सुचना क्रमांक ०४, दि. २७/०६/२०१३ सोबतची विषय पत्रिका
सभा शनिवार दि. ०६/०७/२०१३

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| ---- | **प्रश्नोत्तरे –** |
| ---- | **मागील सभांचे इतिवृत्तांत –** |
| २१ | दि. १८/०४/२०१३ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| ---- | **सर्व निवडणुका –** |
| ---- | **सर्व नियुक्त्या** - निरंक |
| ---- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| ---- | **विनंती अर्ज** - निरंक |
| ---- | **स्थायी, परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** – निरंक |
| ---- | **शिक्षण मंडळाची पत्रे** - निरंक |
| ---- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज –** |
| २२ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २, कलम ५ (२) (ब) तसेच महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेवर पाच नामनिर्देशित पालिका सदस्यांची नियुक्ती करणे. |
| २३ | रस्ते, चौक, वास्तु यांचे नामकरण करण्याच्या प्रस्तावांना मान्यता देणे. |
| ---- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे –** |
| ---- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** – निरंक |

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महानगरपालिका सचिव कार्यालय,
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- २७ जुन २०१३

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

मा. महासभा सुचना क्रमांक ०४, दि. २७/०६/२०१३ सोबतची विषय पत्रिका
सभा शनिवार दि. ०६/०७/२०१३

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| --- | **प्रश्नोत्तरे** – |
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत** – |
| २१ | दि. १८/०४/२०१३ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **सर्व निवडणुका** – |
| --- | **सर्व नियुक्त्या** - निरंक |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **स्थायी, परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** – निरंक |
| --- | **शिक्षण मंडळाची पत्रे** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज** – |
| २२ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण क्रमांक २, नियम ५ (२) (ब) अन्वये तसेच महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेवर पाच नामनिर्देशित पालिका सदस्यांची नियुक्ती करणे. |
| २३ | रस्ते, चौक, वास्तु यांचे नामकरण करण्याच्या प्रस्तावांना मान्यता देणे. |
| --- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** – |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** – निरंक |

महानगरपालिका सचिव कार्यालय,
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- २७ जुन २०१३

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मिरा भाईदर महानगरपालिकेची मा. महासभा दि. ०६/०७/२०१३ रोजी आयोजित केली आहे.**
**सदर सभेकरिता मा. सदस्यांचे खालीलप्रमाणे प्रश्न आलेले आहेत.**

| प्रश्न |
|---|
| **०६ श्री. राजेंद्र जैन मा. सदस्य यांनी दि. ११/०१/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| 1) Details of Fire Safety measure suggested by fire department in building used/ owned by MBMC state and Central government in MBMC Jurisdiction area with details of their implication status. |
| A) Details of Notice & Penalty against contractor/ institution who are responsible for maintenance of electrical polls in last 9 years. |
| B) List of defaulters in paying taxes on open land with principle and penalty details why this taxes are not recovered so far. |
| **०७ श्रीम. गिता भरत जैन मा. सदस्या यांनी दि. ०४/०२/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) महानगरपालिकेने सन २००४ ते २०१२ ह्या कालावधीत मे. टंडन असोसिएट ह्या तांत्रिक सल्लागारास देण्यात आलेल्यां कामाची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे देण्यात यावी.<br>(अ) कामांची नावे (ब) कामाची अंदाजपत्रक रक्कम (क) कार्यादेश तारीख (ड) काम पूर्ण करण्याची मुदत (तारीखसह) |
| अ) कामाची मुदत पूर्ण होऊनही बरीच कामे पूर्ण झाली नाहीत हे खरे आहे काय? |
| ब) असल्यास अपूर्ण असलेल्या कामाचा तपशिल द्यावा? |
| क) कामे मुदतीत पूर्ण न केल्याने त्याचे विरुध्द कोणती कारवाई केली? |
| ड) कामे मुदतीत न केल्याने महानगरपालिकेचे किती नुकसान झाले? |
| **०८ श्रीम. गिता भरत जैन मा. सदस्या यांनी दि. ०४/०२/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) भूमिगत गटार योजना कामाची एस्टीमेंट रक्कम किती आहे? |
| अ) कामाचा कार्यादेश दिनांक कोणता आहे? |
| ब) कामाची मुदत काय आहे? |
| क) महानगरपालिकने ठरविलेल्या वेळापत्रकानुसार (Bar Chart) काम झाले नाही हे खरे आहे काय? |
| ड) असल्यास, काम वेळापत्रकानुसार किती होणे आवश्यक आहे? प्रत्यक्षात आजपर्यंतच्या कामाची स्थिती काय आहे? |
| इ) काम वेळेवर न झाल्याने ठेकेदारावर कोणती कारवाई करण्यात आली आहे? |
| **०९ श्रीम. गिता भरत जैन मा. सदस्या यांनी दि. ०४/०२/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) महानगरपालिकेची कामे मिळविण्यासाठी महानगरपालिका लोकप्रतिनिधीना लांच देताना मे. टंडन असोसिएट्स हया तांत्रिक सल्लागाराच्या प्रतिनिधीस लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले होते हे खरे आहे काय? |
| अ) असल्यास, लांचलुचपत प्रतिबंधक कायदाखाली ज्याप्रमाणे शासकीय कर्मचाऱ्यां विरुध्द कारवाई होते त्या प्रमाणे संबंधित ठेकेदार विरुध्द कोणती कारवाई केली आहे? |
| ब) संबंधित ठेकेदारास काळया यादीमध्ये टाकण्याबाबत प्रशासनाची भुमिका काय आहे? |
| **१० श्रीम. गिता भरत जैन मा. सदस्या यांनी दि. ०४/०२/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) शहराच्या भुमिगत गटार योजनेच्या देखरेखीसाठी नेमण्यात आलेल्या तांत्रिक सल्लागारावर आजपर्यंत किती खर्च करण्यात आलेला आहे? |
| अ) देखरेखीसाठी खाजगी तांत्रिक सल्लागार नेमूनही त्या व्यतिरिक्त महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांचे अभियंते प्रतिनियुक्तीवर नेमण्यात आले आहेत हे खरे आहे काय? |
| ब) असल्यास, किती अभियंते केव्हापासून प्रतिनियुक्तीवर आहेत? त्यासाठी महानगरपालिकेला किती खर्च झाला आहे? |
| क) तांत्रिक सल्लागाराची नेमणूक कोणी अशताही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ह्याच्या अभियंत्याची आवश्यकता आहे काय? |
| **११) श्रीम. गिता भरत जैन मा. सदस्या यांनी दि. ०४/०२/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) मिरा भाईंदर शहर भूमिगत गटार योजना कामाचे एस्टीमेट रक्कम किती आहे? |
| अ) महानगरपालिकेने मंजूर केलेल्या निविदा दराप्रमाणे किती खर्च होणार आहे? |

| |
|---|
| ब) योजनेसाठी राज्य व केंद्रशासनाकडून किती अनुदान मिळणार आहे व प्रत्यक्षात किती अनुदान प्राप्त झाले आहे काय? |
| क) उर्वरीत रक्कम महानगरपालिका कर्ज रुपाने किती उपलब्ध केली आहे? किती रक्कम कर्जरुपाने अद्याप मिळणार आहे? |
| ड) काम पूर्ण करण्याची मुदत काय आहे? |
| इ) आजपर्यंत झालेल्या एकूण खर्च किती आहे? |
| **१२ श्री. नरेंद्र एल. मेहता मा. सदस्य यांनी दि. ०८/०२/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) मिरा भाईंदर शहरासाठी किती पाणी पुरवठा उपलब्ध होत आहे? |
| अ) सध्याचा वाढत्या लोकसंख्येला शासनाच्या भायदंडाप्रमाणे (भामकाप्रमाणे) दरडोई किती पाणी पुरवठा आवश्यक आहे? |
| ब) प्रत्यक्षात होणारा पाणी पुरवठा लोकसंख्येला पुरेसा आहे का? |
| क) नसल्यास वाढत्या लोकसंख्येला वाढीव पाणी पुरवठा उपलब्ध करण्याच्या महानगरपालिकेकडे काही योजना आहेत का? |
| **१३ श्री. नरेंद्र एल. मेहता मा. सदस्य यांनी दि. ०८/०२/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) ठाणे जिल्ह्यातील सूर्य धरणातून उपलब्ध होणाऱ्या पाणी साठ्यावत मिरा भाईंदर व वसई विरार ह्या महानगरपालिका क्षेत्रासाठी पाणी पुरवठा करणारी प्रस्तावित योजना एम.एम.आर.डी.ए. ने तयार केली आहे. त्यास महानगरपालिकेची सहमती मागणी करणारा प्रस्ताव एम.एम.आर.डी.ए. ने महानगरपालिकेकडे सादर केला आहे हे खरे आहे काय? |
| अ) असल्यास, सदर प्रस्तावावर काय कार्यवाही झाली आहे? |
| ब) नसल्यास, केव्हा कारवाई करण्यात येईल? |
| **१४ श्रीम. प्रतिभा तांगडे-पाटील मा. सदस्या यांनी दि. ०८/०२/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) ठाणे जिल्ह्यातील सूर्य धरणातून उपलब्ध होणाऱ्या पाणी साठ्यावत मिरा भाईंदर व वसई विरार ह्या महानगरपालिका क्षेत्रासाठी पाणी पुरवठा करणारी प्रस्तावित योजना एम.एम.आर.डी.ए. ने तयार केली आहे. त्यास महानगरपालिकेची सहमती मागणी करणारा प्रस्ताव एम.एम.आर.डी.ए. ने महानगरपालिकेकडे सादर केला आहे हे खरे आहे काय? |
| अ) असल्यास, सदर प्रस्तावावर काय कार्यवाही झाली आहे? |
| ब) नसल्यास, केव्हा कारवाई करण्यात येईल? |
| **१५ श्रीम. प्रतिभा तांगडे-पाटील मा. सदस्या यांनी दि. ०८/०२/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) मिरा भाईंदर शहरासाठी किती पाणी पुरवठा उपलब्ध होत आहे? |
| अ) सध्याचा वाढत्या लोकसंख्येला शासनाच्या भायदंडाप्रमाणे (भामकाप्रमाणे) दरडोई किती पाणी पुरवठा आवश्यक आहे? |
| ब) प्रत्यक्षात होणारा पाणी पुरवठा लोकसंख्येला पुरेसा आहे का? |
| क) नसल्यास वाढत्या लोकसंख्येला वाढीव पाणी पुरवठा उपलब्ध करण्याच्या महानगरपालिकेकडे काही योजना आहेत का? |

# मा. महासभा

# दि. १८/०४/२०१३

# रोजीचे इतिवृत्तांत

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा महासभा दि. १८/०४/२०१३**

आज गुरुवार दि. १८/०४/२०१३ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. १ दि. ०६/०४/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | महापौर |
| २) | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | उपमहापौर |
| ३) | भोईर राजू यशवंत | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सभागृह नेता |
| ५) | मेहता नरेंद्र लालचंद | विरोधी पक्षनेता |
| ६) | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | सदस्या |
| ७) | अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| ८) | असेन्ला मेंडोन्सा परेरा | सदस्या |
| ९) | ॲड. रवि व्यास | सदस्य |
| १०) | कोठारी सुमन रमेश | सदस्या |
| ११) | कांगणे यशवंत ठकाजी | सदस्य |
| १२) | मयेकर सरस्वती रजनीकांत | सदस्या |
| १३) | सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| १४) | पाटील रोहिदास शंकर | सदस्य |
| १५) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १६) | पिसाळ मनिषा नामदेव | सदस्या |
| १७) | पांडे हंसूकुमार कमलकुमार | सदस्य |
| १८) | निलम हरिश्चंद्र ढवण | गटनेता, शिवसेना |
| १९) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| २०) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| २१) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| २२) | अरविंद दत्ताराम ठाकुर | गटनेता, महाराष्ट्र नवनिर्माण सेना |
| २३) | प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| २४) | प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| २५) | शर्मा सुनिला सत्येंद्र | सदस्या |
| २६) | मेहता डिंपल विनोद | सदस्या |
| २७) | संध्या प्रफुल्ल पाटील | सदस्या |
| २८) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| २९) | प्रविण मोरेश्वर पाटील | सदस्य |
| ३०) | घरत तारा विनायक | सदस्या |
| ३१) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| ३२) | केळुसकर प्रशांत नारायण | सदस्य |
| ३३) | भानुशाली वर्षा गिरीधर | सदस्या |
| ३४) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३५) | मुन्ना सिंग | गटनेता, अपक्ष |
| ३६) | रावल भगवती जयशंकर | सदस्या |
| ३७) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| ३८) | शरद केशव पाटील | गटनेता, भारतीय जनता पार्टी |
| ३९) | मेघना दिपक रावल | सदस्या |
| ४०) | जैन गिता भरत | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ४१) | जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ४२) | शुभांगी महिन कोटियन | सदस्या |
| ४३) | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ४४) | बाबरा डॉनल्ड रॉड्रीक्स | सदस्या |
| ४५) | मॅन्डोंसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ४६) | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | सदस्या |
| ४७) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ४८) | ग्रिटा स्टिफन फॅरो | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ४९) | डॉ. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ५०) | जयमाला किशोर पाटील | सदस्या |
| ५१) | संदिप मोहन पाटील | सदस्य |
| ५२) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ५३) | डिमेलो बर्नड अल्बर्ट | गटनेता, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ५४) | बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ५५) | लियाकत ग. शेख | सदस्य |
| ५६) | परमार अनिता भरत | सदस्या |
| ५७) | पाटील प्रणाली संदिप | सदस्या |
| ५८) | रकवी सुहास माधवराव | सदस्य |
| ५९) | झिनत रऊफ कुरेशी | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ६०) | खण्डेलवाल सुरेश | सदस्य |
| ६१) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ६२) | शेख शबनम लियाकत | सदस्या |
| ६३) | सुजाता रविकांत शिंदे | सदस्या |
| ६४) | मोहम्मद फरिद सिद्दीक कुरेशी | सदस्य |
| ६५) | पुजारी कांचना शेखर | सदस्या |
| ६६) | काझी रशीदा जमील | सदस्या |
| ६७) | इनामदार जुबेर | गटनेता, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| ६८) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| ६९) | म्हात्रे सुर्यकांत खंडोजी | सदस्य |
| ७०) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ७१) | कासोदरिया अश्विन श्यामजी | सदस्य |
| ७२) | डॉ. नयना मनोज वसानी | सदस्या |
| ७३) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ७४) | भट्ट दिप्ती शेखर | सदस्या |
| ७५) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ७६) | विराणी रेखा अनिल | सदस्या |
| ७७) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ७८) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ७९) | म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ८०) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ८१) | वेंचर गिल्बर्ट मॅन्डोंसा | सदस्य |
| ८२) | अरोरा दिपिका पंकज | सदस्या |
| ८३) | भावसार शिल्पा कमलेश | सदस्या |
| ८४) | वंदना रामदास चक्रे | सदस्या |
| ८५) | कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| ८६) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ८७) | प्रभाकर पद्माकर म्हात्रे | सदस्य |
| ८८) | मीरादेवी रामलाल यादव | सदस्या |
| ८९) | अनिल बाबुराव भोसले | सदस्य |
| ९०) | रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ९१) | दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |

**<u>गैरहजर सदस्य –</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |

**रजेचा अर्ज –**

१) सुमबंड महरुन्नीसा हारूनरशीद सदस्या

**मा. महापौर :-**

आजच्या सभेकरीतां उपस्थित सर्व सन्मा. सदस्यांचे मी स्वागत करीत आहे. सदरची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडावी अशी माझी विनंती आहे. तसेच श्रीराम नवमी, हनुमान जयंती, महावीर जयंती व महाराष्ट्र दिनानिमित्त सर्वांना हार्दीक शुभेच्छा देत आहे.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा गुरुवार दि. १८/०४/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०१, दि. ०६/०४/२०१३ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होत आहे. ११ वाजुन ३० मिनिटे झालेली आहेत. सन्मा. सदस्य श्री. नरेंद्र एल. मेहता यांचा प्रश्न आहे.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, मागच्या मिटींगमध्ये अनुपालन अहवाल/शासनाचे पत्रक किंवा काही आले असतील तेही आमच्याकडे गेल्या सहा महीन्यात एकही पत्रक दिले गेलेले नाही. सहा महिन्यात एकही आले नाही?

**नगरसचिव :-**

माझ्याकडे अजुन प्राप्त झाले नाहीत. प्रशासनाकडुन आल्यानंतर पुढच्या सभेत सर्वांना देण्यात येतील.

**नरेंद्र मेहता :-**

ठिक आहे. आम्ही मागितल्यानंतर तुम्ही देणार पण सहा महिन्यात आले नाहीत का? अजेंडावर ती हेडींग आहे. तरी आपल्याकडुन का देण्यात येत नाहीत?

**नगरसचिव :-**

पुढच्या सभेत देण्यात येतील.

**नरेंद्र मेहता :-**

म्हणजे आलेले आहेत? मा. महापौर मॅडम, अनुपालन अहवालामध्ये सभागृहात अनेक चर्चा होतात. त्यामध्ये महत्वाचे आपलेही रुलींग असतात. त्यावर पालिकेने, प्रशासनाने निर्णय करायचे असतात. हे आत्ता दिले आहे, ते पुर्ण वाचायला वेळ जाईल. त्या संदर्भात आम्ही पुढच्या सभेत चर्चा करु पण जो विषय होता, आपल्याकडे जे संगणक चालक आहेत, त्यावेळी सभागृहाची अनेक भावना झाली. मागच्या वेळी विषय होता की, यांना कायम करुन घ्या आणि काही अडचणी असतील तर शासनाकडे ती दाद मागा. तेही झाले नाही दुसरे आम्ही नविन ठेका पध्दतीने अपॉईंट करणार होतो. त्याची मा. महासभेने मान्यता दिली की, ९५०० रुपयांनी नविन अपॉईंटमेंट करायची आणि जे जुने गेल्या सात-आठ वर्षे, दहा वर्षे जे काही काम करतात त्यांचे मानधन जे आहे, ते सात हजार त्यावेळी सभागृहाने सर्वानुमते हे ठरवले होते की, जे तुम्ही आत्ता नविनला देणार आहात ते त्यांनापण द्या. तेही तुम्ही ठेका पध्दतीने घेता त्यांना साडेनऊ आणि जे दहा वर्षापासुन करतात त्यांना सात हजार म्हणजे एकाच महापालिकेत दोन न्याय होऊ शकत नाही तर त्यावेळी ठरले होते की, साडेनऊ द्यायचे तरीही अनुपालनाच्या हिशोबाने प्रशासनाने, मा. आयुक्त साहेबांनी त्याचे पालन केले पाहिजे होते पण अजुनपर्यंत त्यांना साडेनऊ हजार दिले गेले नाही त्याचे कारण आपण सांगितले.

**मा. महापौर :-**

या महिन्यात देण्यात येईल.

**नरेंद्र मेहता :-**

जानेवारीपासुन?

**मा. महापौर :-**

नो, एप्रिल, आफ्टर मार्च.

**नरेंद्र मेहता :-**

पण मॅडम आपले ठरले होते की...

**मा. महापौर :-**

आपण त्यांना वेळ वगैरे काही दिलेली नव्हती आपण फक्त पास केलेले, कारण श्री. विक्रम कुमार साहेब मा. आयुक्त असताना त्यांनी मला सांगितलेले की, मॅडम यु पास नाऊ व्हेन वी वील हॅव द फंड, दॅट टाईम वी वील गिव्ह. आत्ता माझी आणि साहेबांची गोष्ट झाली तर आपण या महिन्यापासुन देऊ.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, १८ नंबरमध्ये म्हटले आहे की, ॲमिनीटी स्पेस ताब्यात घ्यायची. मा. आयुक्त महोदय, सर्वात मोठी ॲमिनीटी स्पेस एक लाख स्वेअर फीट, त्या डीबी रियाल्टीमध्ये आपली अजुन पेंडींग आहे. अजुन आपण ताब्यात घेतलेली नाही त्यावेळी श्री. विक्रम कुमार साहेबांनी सांगितले की, एक महिन्याच्या आत आम्ही प्रोसेस

करु ती जागा आपण का ताब्यात घेत नाही? मॅडम, जे अनुपालन दिले त्याचे पालनच होत नाही. आम्ही फक्त कार्यवाही करत आहोत. कार्यवाही चालु आहे अशीच आपण उत्तरे दिलेली आहेत.

**सत्यवान धनेगावे :-**

मा. महापौर महोदयांच्या परवानगीने बोलतो, मागच्या बैठकीमध्ये ज्यावेळी हा ॲमिनीटी स्पेसचा विषय निघाला होता त्यावेळी तत्कालीन मा. आयुक्त साहेबांनी एक महिन्यात वगैरे घेतो असे आश्वासन आपल्याला दिलेले नव्हते. घेऊ, टाईम लिमिट आम्हाला सांगता येणार नाही असे त्यामध्ये स्पष्टपण नमुद केलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मग आत्ता तरी सांगा की, टाईम लिमिट काय आहे?

**सत्यवान धनेगावे :-**

आमची प्रोसेस चालु आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम आपण जागा ताब्यात घ्यायची आहे आपली जागा आहे आपण त्याला कॉम्पेनसेशन दिलेले आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

साहेब, जागा आपली नाही. या विषयावर मागेपण भरपुर विस्तृतपणे चर्चा झालेली.

**नरेंद्र मेहता :-**

त्यावेळी आपण सांगितले की, आम्ही ताब्यात घेतो. आत्ता आपण सांगता की, आम्ही वेळ दिलेला आहे याचे मिनींग काय समजायचे?

**सत्यवान धनेगावे :-**

जागा ही आपली नाही जागा त्यांची आहे.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, आपण त्यांना कॉम्पेनसेशन केलेले आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

कॉम्पेनसेशन दिलेले नाही हे मी मागेपण सांगितलेले. आत्ताही सांगतो की, कॉम्पेनसेशन दिलेले नाही.

**नरेंद्र मेहता :-**

त्याला एफएसआय दिलेला आहे आणि आपल्याला टाऊन प्लानींगमध्ये जास्त ज्ञान आहे. त्यामध्ये कुठलेही एवढे मोठे लेआऊट मंजुर करताना ॲमिनिटी स्पेस हे ठेवणे बंधनकारक आहे तुम्ही कसे बोलणार की, घेतले नाही किंवा दिले नाही? मग परवानगी कशी दिली?

**सत्यवान धनेगावे :-**

बंधनकारक आहे त्यांनी हॅन्ड ओव्हर केलेले नाही त्याचे बेनीफिट त्यांना दिलेले नाही. हे अगोदरपण आपल्याला सांगितलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मग मला सांगा नंतर दिले नाही तर काय होणार? तोपर्यंत हे कम्प्लीट होत चालले आहे आणि या अगोदर हे घडलेले आहेत आपल्या ॲमिनीटी स्पेसवर अतिक्रमण झालेले आहेत.

**सत्यवान धनेगावे :-**

बिफोर ओ.सी. आम्ही घेणार आहोत.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय, ॲमिनीटी स्पेस ताब्यात घ्यायला हरकत काय आहे?

**सत्यवान धनेगावे :-**

आम्ही निश्चित घेणार आहोत.

**नरेंद्र मेहता :-**

पण कधी?

**सत्यवान धनेगावे :-**

त्याचा दुरुपयोग होणार नाही आम्ही घेणार आहोत.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, ही उत्तरे आहेत का? आपली महापालिकेची जागा, आम्ही घेणार आहोत. ओ.सी वर घेणार आहोत ओ.सी ला आलाच नाही तर? याच बिल्डरची कल्पतरु म्हणून बिल्डींग्स चालु आहेत. सगळे पझेशन झाले ओ.सी ला आला का ते विचारा. ओ.सी. ला आला नाही नंतर तुम्ही काय घेणार? याच डिजबी. रियालीटीची कल्पतरु म्हणून वसाहत सुरु आहे. त्यामध्ये ओ.सी. ला कुठे आले? त्याने ऑक्युपेशन घेतलच नाही, पजेशन दिले ना. निघून गेला तर तुम्ही काय केले? आणि तो ओ.सी.ला येईल किंवा नाही याची तुम्हाला काय काळजी आहे? आपली जागा आहे, ताब्यात घ्या. विषय संपला. हे होऊन जवळ जवळ अडीज तीन वर्षे झालेली आहेत. आपल्याला घ्यायला पाहिजे होते तुम्ही घेतले नाही त्यावेळी विनंती केली की, आम्ही घेऊ आत्ता तरी आम्हाला सांगा की, कधी?

**सत्यवान धनेगावे :-**

त्यामध्ये डेव्हलपर्सचे गव्हर्नमेंटकडे रिप्रेझेंटेशन्स आहेत. गव्हर्नमेंटकडे रिपोर्ट केलेले आहेत. जे काही करायचे असेल ती, प्रोसीजर कायद्यानुसार करायला पाहिजे तुम्ही बोलले आणि मी केले असे होणार नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, हे तसेच होते की, आपण परवानगी दिली त्यावेळी हे सगळे घेतले नाही. मग त्याला कुठेतरी कल फुटतात कोणी कोर्टात जातो कोणी गव्हर्नमेंटकडे जातो आणि आपल्या जागेचा बळी पडतो.

**सत्यवान धनेगावे :-**

साहेब, आम्ही प्रयत्न करुन घेऊ.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, प्रश्नोत्तराचा तास आत्ता चालु होईल.

**नगरसचिव :-**

११.४० झालेले आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय, मागच्या वेळी मिटींग मध्ये आपले ठरले होते की, एखादे आरक्षण बदलायचे असेल, एकाच मालकाची जमिन असेल तर आपल्याला मा. आयुक्त म्हणून ते संपुर्ण अधिकार आहेत. आपण ते बदलु शकतो पण कुठेही असे म्हटलेले नाही की, आपले आरक्षण हे डीपी रोडवर आहे. तुम्ही त्याला इंटरनल कॉम्प्लेक्समध्ये टाकलेले आहे. उद्या कॉम्प्लेक्सवाल्यांनी गेट लावला. आतमध्ये शिरु दिले नाही तर आपण काय करणार? हा एक मुद्दा होता आपले जे आरक्षण होते ते तुम्ही सीआरझेड मध्ये टाकले आणि त्यांचे जे आर झोन आहे ते तुम्ही नॉन सीआरझेड मध्ये केले ही आपल्याला गरज काय होती?

**सत्यवान धनेगावे :-**

आपले सर्व मुद्दे सांगा मी खुलासा करतो.

**नरेंद्र मेहता :-**

आरक्षणाचा तोच आहे, का केले? सदर जागेत असलेल्या आरक्षणाचे महानगरपालिकेने फेरचित केले आहेत. हे सीआरझेड ने आपले आरक्षण बाधित करुन घेतले त्याचे आर झोन क्लीअर करुन घेतले काय गरज होती?

**सत्यवान धनेगावे :-**

मौजे नवघर सर्व्हे क्र. ४३५, ४३६ चा २, ४३७ चा १,२,३,५,८ ते ११, ४३८ चा १,२,३ या जागेमध्ये लेआऊट मंजुर आहे. या लेआऊटमध्ये आरक्षण क्र.२८३, प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान आणि आरक्षण क्र. २८५, या दोन आरक्षणाचे आम्ही रिलोकेशन केलेले आहे. मिरा भाईंदरचे डी.पी १९९७ ला सॅक्शन झालेले आहे. डी सी रुल्स सॅन्क्शन आहेत. त्या डि सी रुलच्या १०/४ नुसार मा. आयुक्तांना अधिकार आहेत जो एरीया डीपी रिपोर्टमध्ये आहेत, तोच एरीया तिकडे लोकेशन केलेला आहे. त्यात एरीया कमी जास्त वगैरे नाही आणि आपण जे सांगता की, लेआऊटमध्ये जाऊ देणार नाही, असे होऊ शकत नाही. कारण लेआऊटमध्ये रस्ता आहे. त्यामध्ये सुध्दा डी पी रोड आहे त्या रोडलाच आरक्षण आहे. त्याला ॲक्सेस आहे. त्यामध्ये काही प्रॉब्लेम नाही आणि सीआरझेड चा जो मुद्दा आहे, प्रायमरी स्कुल आणि प्ले ग्राऊंडचे जे आरक्षण आहे यामध्ये स्कुलसाठी जो बिल्डेबल एरीया आहे तितका बिल्डेबल एरीया हा नॉन सीआरझेड मध्ये आहे. पुर्णच्या पुर्ण सीआरझेड मध्ये टाकला असे नाही हे सगळे मेरीट त्या त्या वेळी तपासलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय, आपण जरा गांभिर्याने बघा आम्हाला काही हरकत नाही, आपण बदल केले आहेत पण एका शहरात दुसरी व्यक्ती आली आणि बोलली की, सीआरझेड मलापण बदल करुन द्या. आरक्षण सीआरझेड मध्ये टाका हे आपण करणार का? त्यावेळी तुम्ही वेगळा कायदा लावणार.

**सत्यवान धनेगावे :-**

साहेब, त्यांच्या आरक्षणाची फेररचना जरी केलेली असेल तरी त्यांची कोणतीही परवानगी दिलेली नाही त्यांना एमसीझेड ची परवानगी घ्यावी लागेल.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, आर-झोन मध्ये परवानगी दिली.

**सत्यवान धनेगावे :-**

कुठे दिली?

**नरेंद्र मेहता :-**

आर झोन मध्ये

**सत्यवान धनेगावे :-**

रिझर्व्हेशनची परवानगी दिली नाही ना?

**नरेंद्र मेहता :-**

रिझर्व्हेशन आपले आहे. मा. आयुक्त महोदय श्री सुहास रकवी यांनी जो प्रस्ताव उपस्थित केला की, त्यांची जागापण बाधित आहे तुम्ही सर्वांना बदल करुन देणार का? तुम्ही तसे करत असाल तरी आमची हरकत नाही की, एखादे कोणाचे आरक्षण सीआरझेड मध्ये असेल, त्याला सोडवायचे असेल.

**सत्यवान धनेगावे :-**

हे असे जनरलाईज स्टेटमेंट करता येत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

हे केलेले आहे तुम्हाला गरज काय होती?

**सत्यवान धनेगावे :-**

हा केस टु केस डिसीजन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम आपले महापालिकेचे आरक्षण हे सीआरझेड मध्ये घ्यायचे आणि त्याची जागा नॉन सीआरझेड मधुन आर-झोन तिकडे अदलाबदल करायची मग त्यांनी बिल्डींग बांधुन घरी जायचे आम्ही ते सीआरझेड चे आरक्षण तसेच ठेवायचे आपल्याला काय गरज होती?

**सत्यवान धनेगावे :-**

बिल्डींग बांधुन कोणी घरी जाते का? दुसरी बिल्डींग बांधण्यासाठी परत येणारच.

**नरेंद्र मेहता :-**

बिल्डींग बांधायचा विषय वेगळा आहे आम्हाला याच्यावर न्याय द्या मा. आयुक्त महोदय आम्हाला आपली भुमिका सांगा.

**मा. आयुक्त :-**

यामध्ये आरक्षण क्र. २८३ आणि २८५ याची आपण जर पाहणी केली तर २८३ हे आरक्षण प्रायमरी स्कुल आणि प्ले ग्राऊंड साठी होते आणि २८५ हे गार्डनसाठी होते तर जे २८५ होते ते सीआरझेड एरीयामध्येच होते त्यापैकी अर्धा भाग सीआरझेड मध्ये होता, अर्धा भाग सीआरझेड मध्ये नव्हता तो सीआरझेड मध्ये आलेला आहे आणि एन्वायरमेंटल डिपार्टमेंटच्या आदेशांन्वये आपल्याला सीआरझेड एरीयामध्ये गार्डन किंवा ॲग्रीकल्चर ॲक्टीव्हीटी, हॉर्टीकल्चर, प्लेग्राऊंड, प्लेफिल्ड, पार्क हे डेव्हलप करण्याची आपल्याला अनुमती आहे आणि दुसरा भाग जो होता तो शाळा आणि प्रायमरी स्कुल त्यामध्ये शाळा आणि प्रायमरी स्कुलचे जे आरक्षण होते ते नॉन सीआरझेड मध्ये होते. त्यापैकी अर्धा भाग सीआरझेड मध्ये आणि अर्धा भाग नॉन सीआरझेड मध्ये आत्ता यामध्ये हे आरक्षण सामाईक आरक्षण आहे, प्रायमरी स्कुल आणि प्लेग्राऊंड मी सांगितल्याप्रमाणे जे प्रायमरी स्कुलचे आरक्षण आहे ते नॉन सीआरझेड एरीयामध्ये आहे कारण हे आरक्षण आपल्याला ५०-५० टक्क्यांप्रमाणे विकसीत करावे लागते, ५० टक्के प्लेग्राऊंडसाठी, ५० टक्के शाळेसांठी, तर नॉन सीआरझेड मधील एरीया हा रिलोकेशन केल्यानंतर ५० टक्क्यांच्या वरचा आहे. तर त्या नॉन सीआरझेड च्या आरक्षणामध्ये आपल्याला शाळेचे बांधकाम करता येणार आहे आणि सीआरझेड मध्ये जो एरीया आहे तो प्लेग्राऊंड, मी आपल्याला वाचून दाखविल्याप्रमाणे माझ्यासमोर ०४/०३/२०१० चा महाराष्ट्र शासनाचा जीआर आहे त्यांच्या मुद्दा क्र.१ मध्ये स्पष्टपणे म्हटलेले आहे मी आपल्याला वाचून दाखवतो. द एरीया अपटु २०० मीटर फ्रॉम द एसटीएल इज नो डेव्हलपमेंट झोन. हेन्स, नो कंस्ट्रक्शन शॅल बी परमिटेड विदईन दिस झोन एक्सेप्ट फॉर रीपेअर इन ऑथोराईज स्ट्रक्चरर्स ॲन्ड ॲक्टीविटीस सच ॲज ॲग्रीकल्चर, हॉर्टीकल्चर, गार्डन्स, पाश्चर्स, पार्कस, प्ले फिल्ड ॲन्ड फॉरेस्ट्री. म्हणजे जो सीआरझेड एरीयामध्ये आहे तिथे आपल्याला प्लेग्राऊंड आणि फॉरेस्ट्री करता येईल. ही वस्तुस्थिती मी आपल्या निदर्शनास आणली आत्ता हे जे निर्णय घेतलेले आहेत, हे तत्कालीन महापालिका आयुक्तांनी घेतलेले आहेत त्यांनी हे निर्णय घेताना जे डेव्हलपमेंट कंट्रोल रेग्युलेशन च्या १९९१ नंतर जे १९९७ ला आपल्याकडे लागु झालेले आहेत. त्याच्या कलम १० (४) अन्वये त्यांनी निर्णय घेतलेला आहे. निर्णय घेताना जे उपलब्ध रेकॉर्डवर आहे, त्यामध्ये त्यांनी कारणमिमांसा स्पष्ट केलेली आहे की, हे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आहे आपला तिसरा मुद्दा होता की, हे आरक्षण विकसीत करण्यासाठी आपण का जावे? आणि चौथा मुद्दा होता की, यामध्ये जर रस्ता मिळाला नाही तो कॉम्प्लेक्स जर लॉक झाला तर आपण काय तरतुद करणार आहात? तर मी सांगु इच्छितो की, हे आरक्षण जरी कॉम्प्लेक्समधील असले तरी त्याला ॲप्रोच शेड असल्याशिवाय आपण त्याला पुढे कुठलीही ओसी देणार नाही आणि हे गार्डन विकसीत केल्यानंतरच आपल्याला तीसुध्दा काळजी घेण्यात येईल याच्यानंतर आपला पाचवा मुद्दा हा होता की, अशी प्रकरणे जर आपल्याकडे आली तर त्याचा आपण काय निर्णय घ्याल? तर मी इथे स्पष्ट करु इच्छितो की, प्रत्येक प्रकरणाचा गुणवत्तेनुसार निर्णय घेण्यात येईल जे अधिकार असतील त्या अधिकारांचा विचार करुन आणि सार्वजनिक हित विचारात घेऊन पुढील निर्णय घेण्यात येतील.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय, आपण जे सांगितले की, ५०-५० टक्क्यांप्रमाणे बिल्ट अप आणि ५० टक्के मध्ये गार्डन, प्लेग्राऊंड करता येईल पण आपल्या माहितीसाठी सांगतो ५० टक्क्यांमध्ये आरजी विकसीत करायची असेल तर ५० टक्के त्याचा एफएसआय कुठे जाणार? ते तुम्ही कसे देणार?

**सत्यवान धनेगावे :-**

त्यामध्ये एफएसआय बसतो.

**नरेंद्र मेहता :-**

जे अर्धे सीआरझेड मध्ये बाधित होते त्याचा एफएसआय कसा घेणार?

**मा. आयुक्त :-**

त्यालाही शासनाचे नियम असे आहेत की, समजा एखादा प्लॉट एकाच मालकीचा असेल, आत्ता हा प्लॉट जेव्हा एका डेव्हलपरच्या मालकीचा असेल किंवा ॲमिनीटी स्पेस म्हणून महानगरपालिकेकडे हस्तांतरीत होत असेल तर सीआरझेड एरीयामधील जो एफएस आय आहे तो जो सीआरझेड मध्ये एरीया अफेक्टेड नाही त्याच्यावर लोड करण्याचे सुध्दा शासन निर्णय आपल्याकडे आहे त्याप्रमाणे ..

**नरेंद्र मेहता :-**

श्री. धनेगावे साहेब, आहे का?

**मा. आयुक्त :-**

तो निर्णय आहे.

**नरेंद्र मेहता :-**

साहेबांचे म्हणणे आहे की, पार्टली एखादा ओनर आहे. अर्धे सी.आर.झेड. मध्ये आहे, अर्धे नॉन सी.आर.झेड. मध्ये आहे. त्याचा एफ.एस.आय. इकडे वापरु शकतो.

**सत्यवान धनेगावे :-**

शासनाची पूर्वमंजूरी घेऊन वापरता येतो.

**नरेंद्र मेहता :-**

पूर्वमंजूरी, मंजूरी नाही ना? शासन मंजूरी देईल का? आतापर्यंत शासनाने पन्नास प्रकरणे तरी फेकून दिली? मंजूरी कूठे दिली ते मला सांगा.

**मा. आयुक्त :-**

तशी परवानगी आहे. आणि तसे देता येईल.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय, आपल्या माहितीसाठी सांगतो. महापालिकेची अनेक प्रकरणे गेली. अजूनपर्यंत शासनाने एकालाही मान्यता दिलेली नाही.

**मा. आयुक्त :-**

ते प्रकरण वेगळे असेल. मी हे जे म्हणतो आहे की, एकाच मालकाच्या जमिनिचा अर्धा भाग सी.आर.झेड. मध्ये आणि अर्धा भाग नॉन सी.आर.झेड मध्ये असेल. तर त्या सी.आर.झेड. एरियाचा एफ.एस.आय. नॉन सी.आर.झेड मध्ये वापरता येतो. त्याला शासनाची पूर्व अनुमती लागते. पूर्व अनुमती घेण्याची जबाबदारी माझी राहिल. ती मी पूर्णपणे पार पाडेन. त्यामध्ये फक्त एकच बंधन आहे की, त्याचा पूर्ण एफ.एस.आय. आपल्याकडे जो १.८ चा एफ.एस.आय. आहे, १.८ ची अप्पर लिमिट आहे ती फक्त क्रॉस होता कामा नये, ही एकच अट शासनाने त्यामध्ये टाकलेली आहे. त्या अटीचे पालन करण्यांत येईल.

**नरेंद्र मेहता :-**

उडवा-उडवीची उत्तरे द्यायची. ही उडवा-उडवीची उत्तरे आहेत. माझे म्हणणे आहे की, शासनाकडे आपण का जावे? त्या बिल्डरने जावे. पहिलेच परवानगी आणावी की, हे सी.आर.झेड. नॉन सी.आर.झेड मध्ये करतो म्हणून आम्हाला पूर्ण एफ.एस.आय. मिळावा. तुम्ही आता करुन घेतले. आता आम्ही कामाला लागायचे का? महापालिकेच्या बिल्डींगला पाच माळयाची सी.सी. आहे. चार वर्षापूर्वी किंवा सात वर्षापूर्वी निर्णय घेतलेला की, पाचवा माळा बांधायचा. जागा अपूर्ण पडते. तुम्ही परवानगी आणली का? गव्हर्नमेंटने दिली का? आपल्याला पाचव्या माळ्याची परवानगी असून पाचवा माळा बांधायला परवानगी मिळत नाही. तर या शाळेत तुम्हाला कोण परवानगी देणार आहे? आणि आतापर्यंत किती दिली ते मला सांगा की, आठ-दहा परवानगी तुम्ही आणलेल्या आहेत. फक्त बोलायला काहीतरी बोलायचे की, गव्हर्नमेंट परवानगी देईल, हे देतील, ते देतील. गव्हर्नमेंटने तर मॅंग्रोज कापून एअरपोर्टलापण दिली. पण आपल्याला देणार आहे का? वाशीला एअरपोर्ट होतो आहे. तिकडे श्री. प्रफुल्ल पाटील साहेबांनी परवानगी आणली. तर आपण पण तेच करायचे का? बिल्डरने बिल्डींग बांधून निघून जायचे. आणि आम्ही परवानगी मागत राहायचे आणि आपल्याला वाटते की, येतील. मला सांगा की, आतापर्यंत किती सी.आर.झेड ची परवानगी महापालिकेने मिळवून आणली आहे, किंवा इतर दुसऱ्या विकासकाने मिळवून आणलेली आहे? किंवा इतर दुसऱ्या विकासकाने मिळवून आणलेली आहे. आपले सी.आर.झेड. धोक्यात टाकण्याची आवश्यकता काय? मॅडम, दरवेळी आम्हाला शेवटी इकडे न्याय नाही. आता मा. आयुक्त साहेबांनी सांगितले की, तत्कालीन आयुक्त साहेबांनी निर्णय घेतला. आणि जो काही निर्णय घेतला असेल तो नियमात घेतला. ते सभागृहाला पटले नाही. म्हणून सर्व लोकप्रतिनिधी या सभागृहात न्याय मागायला येतात. त्यामध्ये पण अशीच उत्तरे दिली की, आम्ही जे केलेले ते बरे आहे. मग, शेवटी कुठे जायचे? दरवेळी कोर्टात जायचे का? हे असेच होते. आजचा एक कॉप्शनचा विषय आहे. त्याच्यामध्ये तसेच झाले. मी ती चर्चा करत नाही. माझे एवढेच म्हणणे आहे की, दरवेळी कोर्टात जायचे का?

फक्त तो जातो त्याची फी लागत नाही. महापालिका एका केस मागे ४-५ लाख खर्च करते. त्या बिल्डरने बिल्डींग बांधून जायचे आणि महापालिकेने एका केस मागे ५-५ लाख रुपये खर्च करायचे का? इकडे कोणाला काही पडलेले नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. Combination on public purpose reservation, where the council or appropriate authority proposes to land, building, premises, shifting & interchanging of the purpose designated for the reservations in the case of specific designations of the reservation in the development plan, the chief officer in consultation with the Regional Deputy Director, Konkan Bhavan with the consent of this interest personshift interchange the designation / reservation in the same or on the adjoining lands, buildings to which an access is available or has to be provided, the same is not encombord provided that the area of such designation / reservation is not be reduced.

**नरेंद्र मेहता :-**

कोकण कमिशनर, डेप्युटी डायरेक्टर हे काय म्हटले आहे?

**सत्यवान धनेगावे :-**

कोकण कमिशनरचे अधिकार मा. आयुक्तांना आलेले आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

डेप्युटी डायरेक्टरचे? तेही आले.

**सत्यवान धनेगावे :-**

२००४ मध्ये आले आहेत. त्याची कॉपीपण मागे मी आपल्याला दिलेली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आम्हाला इकडे न्याय मिळणार नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

साहेब, जी गोष्ट क्लीअरकट आहे. कायद्याच्या प्रोव्हीजन नुसार केलेले आहे, त्याचे मिसइंटरप्रेट करुन म्हणता की, आम्हाला न्याय पाहिजे.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, मला माहिती आहे की, आपल्याकडे अशी प्रकरणे आली तर आपण करणार नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

गुणवत्ता तपासून करणार.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, तुम्ही केले पण कोणाचे ? त्या बिल्डरचे नाव रवी ग्रुप. आता तुम्ही मला मागे उत्तर दिले की, त्याच्या कमीत कमी दहा इलिगल बिल्डींग चालू आहेत. या मिरा भाईंदरमध्ये सर्वात जास्त एन.ए. ओपन लॅन्ड टॅक्स सर्वात जास्त, चार करोड रुपये त्याच बिल्डरचा बाकी आहे. अशा बिल्डरला आम्ही मदत करत आहोत.

**सत्यवान धनेगावे :-**

साहेब, रवी ग्रुप इथे आज काम करत नाही. मिरा भाईंदर नगरपालिका असल्यापासून काम करतो आहे.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, रवी ग्रुप कधीपासून आहे तो आमचा विषय नाही. माझे म्हणणे असे आहे की, या बिल्डरला केले आहे, ज्याचे आज चार करोड रुपये एन.ए. ओपन लँड थकबाकी एकाच व्यक्तीचे बाकी आहेत. चारशे रुपये बाकी असले तर तुम्ही घरी जाऊन टाळे मारता. त्यांना घरातून बाहेर काढता. या चार-चार करोड रुपयांसाठी कुठलेही प्रयत्न होत नाहीत. त्यानंतर दुसरा प्रश्न पण त्याचाच आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

व्हॅकेंट लँड टॅक्सचा विषय आहे. सी.सी. टू ओ.सी. आहे. ओ.सी. च्या पूर्वी घेणारच आहे. या २००८ च्या पूर्वीच्यापण काही परवानगी आहेत. तुमच्या सेकंड चाप्टरमध्ये............

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय, मा. महापौर मॅडम, आपल्याकडे न्याय मिळावा ........................

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त श्री. विक्रम कुमार साहेब होते, ते गेले. He used his power & here you & he are arguing. The thing is, What we will do is, जोपर्यंत त्यांचे सी.आर.झेड चे परमिशन येत नाही, वी विल नॉट गिवींग परमिशन.

**नरेंद्र मेहता :-**

यू हॅव ऑलरेडी गिवन. द वर्क हॅज स्टार्टेड.

**मा. महापौर :-**

वी टेल हिम टू स्टॉप.

**नरेंद्र मेहता :-**

दॅट्स वॉट आय ॲम सेईंग.

**मा. महापौर :-**

टील द ऑक्यूपेशन सर्टिफिकेट कम .....................

**नरेंद्र मेहता :-**

मी बोलतो, तो बिल्डर माझा दुश्मन नाही. रवी ग्रुपने मिरा भाईंदरमध्ये आठशे बिल्डींग बांधल्या असतील तर सातशे नव्वदची त्यांची ओ.सी. च घेतली नाही. आणि हा बिल्डर ओ.सी. घ्यायला येणारच नाही. ज्याच्याकडे मध्ये गडबड, तो कशाला येतो, आ बैल मुझे मार. ही परिस्थिती आहे. तुम्ही मला जे बोलले की, त्यांनी आम्हाला परवानगी आणून द्यावी, सी.आर.झेड मध्ये बांधकाम करता येईल. ठिक आहे, तुम्ही बदल केला तरी आमची काही हरकत नाही. भविष्यात आपण शाळा बांधू. सी.आर.झेड. मध्ये परवानगी आहे, ठिक आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

शाळेचा आपण निर्णय घ्या. परवानगीसाठी आम्ही फॉलो-अप करतो.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, मग तोपर्यंत ते काम थांबवा.

**सत्यवान धनेगावे :-**

कसले काम थांबवायचे आहे?

**नरेंद्र मेहता :-**

रवी ग्रुपचे.

**सत्यवान धनेगावे :-**

शाळा डेव्हलप करायची असेल तर तुम्ही अगोदर निर्णय घ्या.

**नरेंद्र मेहता :-**

मी मा. महापौरांशी बोलतो. तुमच्याशी बोलत नाही. मला असे उत्तर देऊ नका. मा. महापौर मॅडम, यांनी आपल्याला रस्त्यावर सोडून जाता कामा नये. धिस बिल्डींग इज जी प्लस ५ फ्लोअर बिल्डींग. मा. महासभेने मान्यता दिली. तरी आपल्याला अजून परवानगी मिळालेली नाही. पाचवा माळा बांधायचा आहे. सी.आर.झेड. मध्ये आदर्श झाल्यानंतर कोणताही मंत्री किंवा कोणताही अधिकारी सी.आर.झेड. ला हातच लावत नाही.

**मा. महापौर :-**

श्री. धनेगावे आणि त्या बिल्डरला आपण बोलवून मी साहेबांना, हाऊ वी कॅन स्टॉप देर वर्क, आय विल ट्राय ॲन्ड डू इट.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय, दुसरा प्रश्न आहे. नगररचना विभागाने प्रभाग ३० मध्ये विकास प्रविण यांना ज्या परवानगी दिल्या आहेत, त्या संदर्भात प्रश्न. मॅडम, आता आपण हे बघून घ्या. सर्व बिल्डींग इलिगल आहेत. मा. आयुक्त साहेब, आपण मला एक खुलासा करावा. पहिल्यामध्ये आपण म्हटले आहे की, वाढीव बांधकाम केले आहे. नोटिस दिली आहे. काम बंद आहे. वाढीव बांधकाम नाही. नंतर वाढीव बांधकाम नोटिस दिली आहे. काम बंद आहे. वाढीव बांधकाम नियमित करणेबाबत सुधारील प्रस्ताव सादर केला आहे. वाढीव बांधकाम कार्यवाही करण्यांत आलेली आहे. जागेवर काम सुरु नाही. वाढीव बांधकाम नियमाकूल करणेस प्रस्ताव आहे. ऑल आर इलिगल. मॅडम, प्रॉब्लेम इज दॅट की, याआधी सर्व फ्लॅट विकून हे मोकळे झाले आहेत. एका संदर्भात मी टाऊन प्लानिंगकडे आलो होतो. स्टील्टमध्ये त्यांनी दुकान विकून गेला आहे. आता ती परवानगी नाही. काम बंद झाले आहे, ते श्री. धनेगावे साहेबांकडे विनंती करायला आले की, त्या बिल्डरला सांगा, त्याचे पैसे तरी परत द्या. या परिस्थितीमध्ये, सर्वच बिल्डींग इलिगल. एखादी समजू शकले असते. त्याला रेग्युलाईज करायचे असेल तरी आमचे काही नाही. कायद्यात तरतूद आहे. त्यांनी रेग्युलाईज करावी. पण जर रेग्युलाईज पण करायची नाही. आणि बांधायची पण नाही. आता या पिरेडमध्ये ज्या लोकांनी फ्लॅट विकत घेतले आहेत, त्यांची काय हालत होईल. मा. आयुक्त महोदय, जी नोटिस दिलेली आहे, कार्यवाही का होत नाही? तुम्ही कोर्टात स्टे आणायची वाट बघता का? एवढे प्रस्ताव आहेत. तुम्ही नियमीत करा. आम्ही काही बंधन टाकत नाही. पण होत नसेल तर निर्णय पण द्या. धिस क्वेशन इज फ्रॉम द लास्ट फोर मन्थस्. आणि या ज्या बिल्डींग आहेत, त्याच्या परवानगी कमीत कमी दिड-दोन वर्षापूर्वीच्या आहेत.

**सत्यवान धनेगावे :-**

आणखीन मुद्दे असतील तर सांगा.

**नरेंद्र मेहता :-**

हे जे इलिगल बांधकाम आहेत, त्यावर कारवाई का होत नाही ? आता तो तुमचा विषय नक्कीच नाही. कारण इट् इज द डिपार्टमेंट ऑफ इलिगल.

**सत्यवान धनेगावे :-**

मा. महापौर महोदयांच्या परवानगीने बोलतो. रवी डेव्हलपमेंटच्या बाबतीत श्री. मेहता साहेबांनी प्रश्न विचारला होता. त्यांच्या प्रभात क्र. ३१ मध्ये फक्त रवी डेव्हलपरची किती बांधकामे चालू आहेत, किती परवानग्या आहेत, किती अनधिकृत बांधकामे आहेत? काय कारवाई केली? हा सगळा त्या प्रश्नाचा तपशिल होता. प्रश्नात उपस्थित केलेल्या प्रत्येक मुद्दयानुसार विस्तृत उत्तर आपल्याला दिलेले आहे. त्या उत्तराच्या अनुषंगाने आम्ही सगळी तपासणी केलेली आहे. त्यात जी काही वाढीव बांधकामे आहेत, त्याबाबतचा रिपोर्ट प्रभाग अधिकाऱ्यांना दिलेला आहे. प्रभाग अधिकाऱ्यांनी नोटिस इश्यु केलेल्या आहेत. त्यात हेअरिंग पण झालेले आहेत. आणि काही प्रकरणांमध्ये डिसीजन पण पारित झालेले आहेत. त्यामध्ये सन २००८-०९ मध्ये रवी डेव्हलपमेंटने हायकोर्टामध्ये एक रिट पिटीशन फाईल केले होते की, सी.सी. रोडचा टी.डी.आर. मिळण्या संदर्भात. त्यावेळी महापालिकेने ॲफिडेवहीट फाईल केले होते की, त्यांचे जे काही सी.सी. रोड केला त्याचा टी.डी.आर. देऊ अशी महापालिकेची कमिटमेंट आहे. तद्नंतर मा. हायकोर्टाच्या डिसीजननंतर महापालिकेने त्याला स्टॅंडर्ड क्रॉस सेक्शन अप्रूव्ह करुन दिला होता. सिमेंट कॉंक्रीट रोड करण्यासाठी तत्कालीन मा. आयुक्तांच्या अधिकारामध्ये त्यानुसार त्यांनी काही पोरशनचा सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार केलेला आहे. काही पोरशनचे काम अर्धवट आहे. त्यात त्याच्या टी.डी.आर. मागणीचा विषय महापालिकेकडे पेंडींग आहे. शॉर्टली त्यामध्ये मा. आयुक्त साहेब डिसीजन घेणार आहेत आणि तो डिसीजन झाल्यानंतर त्या प्रत्येक बांधकामावर कारवाई करणार.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, द टोटल आन्सर इज मिसगाईडींग. मी प्रश्न काय विचारतो आणि ते उत्तर काय देतात? रवी ग्रुपने या भागात काही कॉंक्रीट रोड केलेले आहेत. मागच्या वेळी आपण ठराव केला होता की, जो कोणी कॉंक्रीट रोड बांधेल त्याला आपण मोबदल्यात टी.डी.आर. देणार. असे आपण कायद्यात अमेंड करत होतो. आपले काम कायद्यात बदल करता येत नाही. ॲन्ड वी हॅव रिकमेंट टू द गव्हर्नमेंट. गव्हर्नमेंटने अजून त्याला काही मान्यता दिलेली नाही. आता ते मान्यता होईल, मला येणार आहे म्हणून मी करुन मोकळा होऊ का? मा. आयुक्त महोदयांनी किंवा श्री. धनेगावे साहेबांनी हे ॲफिडेव्हीट केले असेल, देन अगेन्स्ट इट इज रॉंग. वेन द गव्हर्नमेंट हॅज नॉट सेक्यूर. हाव यू कॅन गो ॲन्ड डू द ॲफिडेव्हीट? तुम्ही ॲफिडेव्हीट कसे करणार की, आम्ही मोबदला देऊ? पहिले गव्हर्नमेंटने डी.सी. रुलमध्ये अमेंड करु द्या. आणि तो कायदा एकट्यालाच का? या शहरामध्ये अनेक बिल्डर आहेत, जे रोड करायला तयार आहेत. त्याला एकट्यालाच त्याने रोड करुन घेतला. अर्धा बंद ठेवला. आज अशी परिस्थिती झाली आहे, काम झाले नसते तरी चांगले होते. किंवा काम पूर्ण झाले असते तरी चांगले आहे. हे अर्धवट सोडले आहे. म्हणजे एक रस्ता असा आहे. आणि एक रस्ता असा आहे. म्हणजे दोन गाड्या जाऊ शकत नाहीत. ही परिस्थिती आहे. तो पुढे काम करत नाही. श्री. विक्रम कुमार साहेब आल्यानंतर त्यांनी काम स्टॉप केले की, हे नियमात बसत नाही. म्हणून ते काम बंद आहे. आता इलिगल बिल्डींग बांधली, त्याचा आणि या टी.डी.आर. चा काय संबंध आहे. टी.डी.आर इज सर्टिफाईड. वी कॅन गिव्ह ऐनीटाईम. त्याला असेल तर त्याने त्याची बिल्डींग रेग्युलराईज करावी. समजा एखादा शासनाने निर्णय दिला, गव्हर्नमेंटने दिला, कोर्टाने दिला, वी कॅन गिव हिम सर्टीफिकेट. आम्ही देऊ शकतो. त्यासाठी इलिगल बिल्डींग बांधून मोकळे होणार का? मला महापालिकेकडून घ्यायचे आहे. असे होईल का? मला मानधन घ्यायचे आहे म्हणून टॅक्स भरला नाही तर चालले का?

**सत्यवान धनेगावे :-**

आपण अधिकार नाही असे म्हणता ते चुकीचे आहे. नियमात प्रोव्हीजन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

पण ते अजून अमेंड झाले नाही. आणि असेल तर सर्वांनाच द्या. एकालाच कशाला?

**सत्यवान धनेगावे :-**

जो नियम आहे तो अमेंडमेंट करण्याचा विषय आहे. सध्या नियमात तरतुद नाही असा विषय नाही. नियमात तरतुद आहे.

**नरेंद्र मेहता :-**

अमेंड करायचा विषय आहे ना?

**सत्यवान धनेगावे :-**

साहेब, नियमात सध्या एक एफ.एस.आय. देण्याची तरतुद आहे. एक एफ.एस.आय. हा जास्त होतो. म्हणून खर्चावर आधारीत टी.डी.आर. दिला पाहिजे हा नियम आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मग मला एक सांगा, सी.आर.झेड मध्ये बदल करायचा नियम रवी ग्रुपलाच लागू. रोड बांधायचा नियम रवी ग्रुपलाच लागु. या शहरात दुसऱ्या कोणाला हा लागू नाही का?

**सत्यवान धनेगावे :-**

अन्य कोणाचा प्रस्तावाच नाही. आपल्या कंपनीचा प्रस्ताव आल्यावर सुध्दा आम्ही त्याच्यावर सिरिअसली विचार करु.

**प्रमोद सामंत :-**

मा. महापौर मॅडम, आपण तो प्रस्ताव शासनाकडे पाठवलेला आहे आणि शासनाकडे प्रस्ताव पाठवल्यानंतर आपल्याकडे अजून अप्रूव्हल आलेले नाही. आणि अप्रूव्हल आलेले नसताना एखादा विकासक जर माळ्यावर माळे चढवून आपल्याला टी.डी.आर. मिळणार म्हणून तो जर माळे बनवत असेल आणि लोकांना विकत असेल तर तो दिशाभूल करतो, फसवणूक करतो. त्यामुळे असे जे विकासक आहेत ते रेग्युलराईज करणार. तर अशावर अशी वेळ आहे की, सभागृहाने कार्यवाही केली पाहिजे. आणि काहीतरी ठोस निर्णय घेतला पाहिजे.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, आता श्री. धनेगावे साहेबांनी सांगितले की, कायद्यात तरतूद आहे. अमेंड करता येते. देन व्हेअर इट इज द निड. तुम्ही पहिल्याच दिवशी द्यायला पाहिजे. मा. हायकोर्टात जा, वकिलाचा खर्च करा, हे कशाला केले? व्हेअर इट द पावर विथ यू. तुम्ही ते देऊन मोकळे व्हायला पाहिजे. त्यांचे म्हणणे आहे की, दुसरे आले नाहीत. मग त्याला का दिले नाही? मॅडम, कायद्यात स्पष्ट आहे, इट इज नॉट अनलेस ॲन्ड अनटील आपण गव्हर्नमेंटकडे अप्रूव्ह करुन घेत नाही. आपल्याला करता येत नाही. तरी त्यांना वाटते तर कोर्टात जायची आवश्यकता होती का? त्याच वेळी सांगितले असते की, ही तरतुद आहे. हे घ्या आणि तुम्ही बांधा. विषय संपला. पण देअर इज नो प्रोव्हीजन इन धिस ॲक्ट. आता दोन्ही बाजूने बोलतात. एका बाजूला आम्ही कोर्टात जो निर्णय होईल तो मान्य करु. दुसऱ्या बाजूला बोलता की, आम्हाला अधिकार आहे. म्हणजे नक्की काय? आणि अधिकार आहे तर मग रोडचे काम का बंद आहे?

**सत्यवान धनेगावे :-**

काम आम्ही बंद ठेवायला लावले.

**नरेंद्र मेहता :-**

एका बाजूला तुम्ही बोलता की, परवानगी पण आहे. एका बाजूला कामही बंद करायला लावले.

**सत्यवान धनेगावे :-**

आम्ही डेव्हलपरचे काम जानेवारी २०१२ पासून बंद केले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

का बंद केले?

**सत्यवान धनेगावे :-**

रस्त्याच्या कामाचे टी.डी.आर. देत होतो त्यावेळी तुम्ही हरकत घेतली होती.

**नरेंद्र मेहता :-**

हरकत तर आजही घेत आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

तत्कालीन मा. आयुक्तांच्या काळात तुम्ही तक्रार केली की, बोगस टी.डी.आर. देत आहोत.

**नरेंद्र मेहता :-**

हरकत घेतली म्हणून थांबायचे का?

**सत्यवान धनेगावे :-**

तुम्ही ते काम थांबवले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्हाला वाटते की, तुम्ही बरोबर आहात तर तुम्ही द्यायला पाहिजे. मी हरकत घेतली, मला वाटले की, बेकायदेशीर चालले आहे. म्हणून हरकत घेतली.

**सत्यवान धनेगावे :-**

सिमेंट काँक्रीटचे काम तुम्ही थांबवले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, आम्ही हरकत घेतली, आमचा अधिकार आहे. आम्हाला ज्या वाटतील त्या हरकत घेऊ. प्रशासनाला वाटते की, योग्य आहे. त्यांनी करावे. आम्ही हरकत घेऊन सगळी कामे थांबतात का? आम्हाला वाटले की, अयोग्य चालू आहे. म्हणून आम्ही हरकत घेतली, आणि त्या हरकतीप्रमाणे तुम्ही कामही थांबवले. रस्ता पण बंद करायला लावला. बिल्डींगही बंद करायला लावली. सगळेच केले. आतापर्यंत किती दिवस, तीन वर्षे, दोन वर्षे, ज्या लोकांनी फ्लॅट घेतला आहे. आता ठाण्यामध्ये बिल्डींग कोणी बांधली? बिल्डींग कोसळली. तिकडचा नगरसेवकही गेला. आता मी ही जाऊ का? आता रवि ग्रुप बरोबर, आय हॅव द बिजनेस रिलेशन विथ हिम. आय ऑलवेज कॉल ऑन फोन. मी त्यांच्याशी फोनवर बोलत असतो. आमचे देणे-घेणे, व्यवहारीक चालू असते. मग उद्या त्यांनी इलिगल बांधायची, पडली तर श्री. नरेंद्र मेहता पण आतमध्ये जायचे का? अधिकाऱ्यांना एकच आहे, लिगल आहे. तुम्ही परवानगी द्या. तुम्हाला वाटते की, टी.डी.आर. देता येईल, तुम्ही

आजच द्या. तुम्ही टी.डी.आर. देत नाही, रस्ता करु देत नाही, बिल्डींगला परवानगी देत नाही. आणि सगळे पेन्डींग ठेवलेले आहे. यू गिव मी द अेनी डीसीजन. मग आम्हाला वाटले तर आम्ही न्याय मागायला जाऊ. तुम्ही कुठलेही डिसीजन देत नाही. सगळे गोल-गोल पेन्डींग ठेवलेले आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

मा. महापौर महोदयांच्या परवानगीने बोलतो. अनधिकृत बांधकाम, वाढीव बांधकाम झाले आहेत हे निश्चित आहे. सी.सी. रोडचा विषय मा. हायकोर्टामध्ये पेन्डींग होता. तो सध्या आमच्याकडे पेन्डींग आहे. आम्ही लवकर त्याचा निर्णय घेणार आहे.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, एक बिल्डींग समजते. एक बांधली, दोन बांधल्या, तीन बांधल्या, चार बांधल्या, पाच बांधल्या, किती बिल्डींग बांधायच्या?

**सत्यवान धनेगावे :-**

आम्ही त्यामध्ये शॉर्टली कार्यवाही करणार आहोत.

**नरेंद्र मेहता :-**

काय कार्यवाही, म्हणजे टी.डी.आर. देणार की, बिल्डींग?

**सुहास रकवी :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो. आता श्री. धनेगावे साहेबांनी सांगितल्याप्रमाणे आपण शासनाकडे प्रस्ताव पाठवलेला आहे. आणि तो नियमीत करण्याकरीता किंवा सुधारीत करण्याकरीता, पण तिथून जोपर्यंत येत नाही, तर त्यांनी वाढीव बांधकाम करू नये असे आमचे म्हणणे आहे. दुसरी गोष्ट, तसे असेल तर आता सी.आर.झेड. उठणार आहे असे तुम्ही म्हणता. आम्ही आमच्या समाजाचे बांधकाम ते येईल या हिशोबाने चालू करतो. नंतर आम्हाला परवानगी मिळेल. या उद्देशाने सांगतो की, कुठलेही बांधकाम अनधिकृत असेल तर पहिले पूर्णपणे बंद करा, शासनाकडून आल्यानंतर तुम्ही चालू करा. आणि श्री. मेहता साहेब म्हणतात की, त्यांच्यावर रेक्टीफिकेशन किंवा सुधारीत, ती प्रोव्हीजन ठेवू नका. जे बंद करायचे आहे, ते बंदच ठेवा. असे आमचे म्हणणे आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त महोदय, खरे तर हा लक्षवेधीच्या माध्यमातून आला पाहिजे होता. अतिशय चांगला विषय आहे. आज मुंब्राची परिस्थिती आपल्या डोळ्यासमोर आहे, ती मिरा भाईंदरमध्ये होणार नाही हे सांगता येत नाही. अनधिकृत बांधकाम, म्हणजे रवी बिल्डरने ५ ते १० माळे वर जास्त बांधले. ते एका दिवसामध्ये बांधले नाहीत. टी.डी.आर. च्या आधारावर उद्या रस्ते कॉंक्रीटीकरण करणार त्याचा टी.डी.आर. त्याला उपलब्ध होणार या आधारावर त्यांनी ५ ते १० माळे वर बांधलेले. साहेब ते काम एका दिवसामध्ये झालेले नाही. विषय चांगला आहे. तुमचे लक्ष याच्यावर केंद्रीत करावेच लागेल. दुसरे असे आहे की, ज्या प्रभाग अधिकाऱ्याच्या किंवा ज्या अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये हा विषय येतो. त्यांच्यावर सक्तीची कार्यवाही करा. ही खरी परिस्थती आहे. कारण ज्या लोकांनी त्यांच्याकडून फ्लॅट विकत घेतले असतील किंवा बुक केले असतील त्यांची त्यांनी फसवणूक केलेली आहे. फक्त त्यांनी नाही तर महापालिकेचे अधिकारी ही याला कारणीभूत आहेत. म्हणून त्यांचयावरही कार्यवाही झालीच पाहिजे. फक्त काम थांबवून होणार नाही. पाच ते दहा माळे एका दिवसामध्ये बांधून होत नाहीत.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, दुसरे उत्तर पण, म्हणजे श्री. धनेगावे साहेबांनी कुठेतरी हे दाखवायचा प्रयत्न केला आहे की, वी आर अंडर प्रोसेस आणि हे सगळे नियमित होईल. दुसऱ्या बाजूला मी विचारले की, कार्यवाही का केली नाही तर सांगतात की, प्रभाग अधिकाऱ्यांना कार्यवाही करायला सांगितले आहे. त्यांचे काम आहे. आता एका बाजूला तुम्ही मला बोलता की, नियमीत आहे. दुसऱ्या बाजूला प्रभाग अधिकाऱ्यांना सांगता की, हे इलिगल आहे, कार्यवाही करणे.

**सत्यवान धनेगावे :-**

साहेब, आपल्याला उत्तर दिलेले आहे. त्याच्या नंतरची आताची अपडेट पोजीशन आपल्याला सांगतो.

**नरेंद्र मेहता :-**

ठिक आहे. त्यावेळी का कार्यवाही केली नाही ते सांगा. आता राहू द्या. म्हणजे मी प्रश्न आणला म्हणून हे करायचे का?

**सत्यवान धनेगावे :-**

साहेब, आपले हे म्हणणे चुकीचे आहे. २०१२ पासून सर्व कामे बंद ठेवलेली आहे. प्रश्न सभागृहात येण्यापूर्वी.

**नरेंद्र मेहता :-**

का बंद ठेवली?

**सत्यवान धनेगावे :-**

एक्सेस बांधकाम आहे म्हणून.

**नरेंद्र मेहता :-**

मग एक्सेस बांधकाम पाडायला नको का? नाहीतर रेग्युलराइज करायला नको का? आयदर यु रेगयुलाईज इट.

**सत्यवान धनेगावे :-**

त्याचे काही रेफरन्सेस आमच्याकडे पेन्डींग आहेत. तोपण डिसीजन घ्यावा लागेल.

**फरिद कुरेशी :-**

श्री. मेहता साहेबांचा सब्जेक्ट बरोबर आहे. मॅडम, हा विषय इलिगल कन्स्ट्रक्शनचा झाला. त्याच्यावर श्री. जुबेर साहेबांनी पण सांगितले. आपण प्रॉपर रुलिंग देणार अशी मला खात्री आहे. पण इलिगल बद्दल १०० टक्के पूर्ण हाऊस त्याला ऑब्जेक्ट करणारच. आणि इलिगल स्टॉप झालेच पाहिजे. मॅडम, इथे विषय लिगल बिल्डींगचा पण आहे. आपण जेव्हा परवानगी देतो त्यांना सी.सी. देतो. त्याच्यात आपल्या काही कंडीशन्स असतात, ड्रेनेज बांधले पाहिजे किंवा रोड केले पाहिजे, किंवा स्ट्रीट लाईट किंवा वॉटर असे काही बेसीक सब्जेक्ट असतात. मी मागच्या वेळी सुध्दा श्री. विक्रम कुमार साहेब असताना अशी मागणी केली होती की, *काही बिल्डर आमच्या हायवे पट्टयामध्ये, मी राहायला तिकडे आहे, तिकडे अंडरग्राऊंड ड्रेनेजचे प्रोव्हीजन* नाही. स्टॉर्म वॉटरचे प्रोव्हीजन नाही. वॉटर टँकचे प्रॉपर जसे प्रोव्हीजन असले पाहिजे, तसे महापालिकेने तिकडे काही ॲडीशनल फॅसिलीटी केली नाही. आणि बिल्डरला संघवी बिल्डर्स, असे एक-दोन बिल्डर्स तिकडे आहे, डी.बी. रियाल्टीपण जवळच आहे, तर त्या लोकांनी तिथे त्यांचे कन्स्ट्रक्शन चालू केले आहे, ज्या बेसिक कन्डीशन्स आहेत, त्यांना वॉयलेट करुन तर अशा परिस्थितीमध्ये आपण लिगल लोकांना पण स्टॉप केले पाहिजे की नाही? आता तिकडे स्टॉर्म वॉटरचे काही प्रोव्हीजन नाही. उद्या काही कमी-जास्त झाले, पाऊस येणार आहे, २६ जुलैसारखे परत काही प्रकरण झाले तर त्याला जबाबदार कोण राहणार? सच वर्क शुल्ड बी स्टॉप. आता मी स्टॉप वर्कची पण मागणी केली पण त्याच्यावर प्रशासनाने अजून काहीच स्टेप घेतलेली नाही. इलिगल बद्दल आपण सगळेच बोलतो. पण लिगलमध्ये पण जे वायोलेशन्स होतात त्याच्यावर पण आपल्याला काहीतरी स्टेप घ्यावी लागेल असे चालत राहणार नाही. मॅडम, तुम्हाला अशी विनंती आहे की, त्याच्यावर प्रॉपर रुलींग द्या आणि ते काम स्टॉप करा.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, माझा विषय डायवर्ट झालेला आहे. माझे हे म्हणणे आहे की, टी.डी.आर. ज्यावेळी त्याला एखादा मा. *हायकोर्टाने निर्णय घेईल किंवा महापालिकेला वाटेल किंवा गव्हर्नमेंटला वाटेल त्यावेळी* तुम्ही त्याल डी.आर.सी. द्या. पण याच्यामध्ये हे आहे की, मला येणार आहे म्हणून मी इलिगल करुन मोकळा होऊ? मॅडम, एक माळा नाही, पाच ते सात माळे इलिगल आहेत. काल आपण बघितले, इंद्रलोकला पूर्ण तयार झालेल्या बिल्डींगमध्ये आपण तीन माळे तोडले. म्हणजे लोक राहायला येणार. म्हणजे कलरपासून सगळे झाले होते. शेवटी ज्या व्यक्तीने फ्लॅट घेतला असेल, तो कुठे जाईल? त्याला बिल्डर बांधून देणार नाही. आणि शेवटी तो बोंबलत राहिल. आणि हे सात-सात माळे ज्यावेही होतात श्री. धनेगावे साहेबांनी सांगितले की, काम बंद करायला लावले. मग आपण त्याचवेळी लावायला पाहिजे. सात माळे झाल्यानंतर, एक्स्ट्रा झाल्यानंतर आपण बंद करायला लावतो.

**सत्यवान धनेगावे :-**

पूर्ण महानगरपालिका क्षेत्राचे सर्व्हेक्षण करुन जे जास्तीचे वाढीव बांधकाम आहे ते जानेवारी २०१२ पासून बंद ठेवलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, पाच-सात माळे एका दिवसात होतात का? एक माळा झाला असता तर ठिक आहे. तुम्ही सात माळे आणि इलिगल काम बंद केले तर सर्व विषय संपले का? मा. आयुक्त महोदय आपण खुलासा करावा की, ठाण्यामध्ये उपायुक्तांपासून, प्रभाग अधिकाऱ्यांपासून, सिविअर पी.आय. पासून, नगरसेवकांपासून सगळ्यांना आतमध्ये टाकले आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

आपला जो अनधिकृत बांधकाम, वाढीव बांधकामाचा जो विषय आहे, रवि डेव्हलपमेंटस् प्रभाग क्र. ३१ याबाबतीत सर्व बांधकामाच्या अनुषंगाने तपासणी करन याबाबतचा निर्णय आम्ही लवकरात लवकर घेणार आहे, तोडण्याबाबत किंवा रेग्युलराईज करण्याबाबत.

**नरेंद मेहता :-**

अगेन आय ॲम सेईंग, माय टॉपीक इज टोटली डिफरंट. मी इकडे काही इलिगल विषय घेऊन आलेलो नाही. माझे म्हणणे असे आहे की, एखादा अधिकारी, युअर पिक्चर शुल्ड बी क्लीअर की, हे रेगयलराईज करतो. यांचे तर टी.डी.आर देतो, हे देतो, काय मार्ग आणि लोकांचे फ्लॅट, सात-सात माळे एक्स्ट्रा बांधलेले आहेत. एक नाही आठ-दहा टॉवर आहेत. या सर्व बिल्डींग बंद पडल्या असतील तरी त्यांचा प्रॉब्लेम सुटत नाही. एका दुकानात, मी आलो होतो की, साहेब त्याला पैसे द्यायला सांगा. पैसेही परत देत नाही. आणि फ्लॅटही देत नाही. बिल्डींग होत पण नाही आणि तुटतपण नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

साहेब, टी.डी.आर. चा विषय झाला नाही तर आम्ही बिल्डींग तोडणार.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, टी.डी.आर. चा काय संबंध आहे?

**मा. महापौर :-**

जानेवारी २०१२ पासून त्यांचे काम बंद आहे. मी साहेबांशी बोलली आहे, या दोन महिन्यामध्ये आपण त्यांना बोलवून त्यांना काय करायचे आहे, रेग्युलराईज करायचे आहे की, त्यांना ..............................

**नरेंद्र मेहता :-**

आमचे काम नाही. वी हॅव ऑलरेडी इश्युड इन द नोटीस. त्यांनी करायचे आहे. आपल्याला काय करायचे आहे की, त्यांनी येऊन करा. यू हॅव इश्युड द नोटीस. त्याला वाटते तर रेग्युलराईज करा. नियमात बसेल तर मंजूर करा. आम्ही बोलत नाही की, तोडा. त्याला वाटत नाही की, रेग्युलराईज करायचे. तो आरामात घरी बसला आहे.

**मा. महापौर :-**

आपल्या कॉर्पोरेशनने नोटीस पाठवली आहे. मा. आयुक्त साहेबांना मी सांगते की, त्यांना बोलवून त्यांना काय करायचे आहे, नाहीतर वी वील टेक अ डिसीजन ऑन दॅट.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, याच्यावर आपल्या सभागृहाचे निश्चित धोरण झाले पाहिजे. आपण एका व्यक्तीसाठी बोलत नाही. रवि ग्रुपच्या बद्दल तक्रार ..............................

**मा. महापौर :-**

रवि ग्रुप असे नाही. जेवढे आहेत आणि सर्वांची नावे याच्यात नाहीत. भाईंदरमध्ये फक्त पाच-दहा बिल्डींग नाहीत. अशा कितीतरी बिल्डींग असतील. तर साहेबांना सांगून, मा. आयुक्त साहेबांना मी आज रुलिंग देते की, सर्वांना बोलवून, ज्यांचे आहे, नाहीतर वी विल टेक अ कॉंक्रिट डिसीजन.

**रोहिदास पाटील :-**

आजची सभा ही अपेक्षा करते की, जसे मुंब्रात झाल्यानंतर शासन जागृत झाले. आणि मग मा. मुख्यमंत्री घोषणा करतात. आपण असे म्हणतो की, मुंब्रात झाल्यानंतर आपल्या महापालिकेचे काय धोरण राहील. हे धोरण राहिल की, या दृष्टीकोनातून आम्ही ही कामे करु देणार नाही. मा. आयुक्त साहेब, आपल्याकडून लोक अशी अपेक्षा करतात की, जे चालू बांधकाम आहे, ज्याच्यामध्ये लोक राहायला आले नाहीत. आणि जी तुमच्या निदर्शनात आलेली आहेत की, हे अनधिकृत आहे, याच्यावर तुमचा हाथोडा चालू झाला का? नाही झाला. ज्याचा रंग लागला आहे, त्याच्यावर झाला. आमचे असे म्हणणे आहे आणि या सभेचेही म्हणणे असेच राहील की, जे डोके वर काढतात त्याच्यावर पहिला हाथोडा मारा. तोपर्यंत दुसरे जे चालले आहे, रंगरंगोटी आहे त्यांच्यावर मारा. तिसरा महत्वाचा जो विषय असा आहे की, आपण सांगतो बिल्डींग खाली करा. याला दोन बाजू आहेत. मानवतेचीपण बाजू आहे, कायद्याची पण बाजू आहे. तुम्ही ज्या बाजूने बोलाल, आम्हाला जर विरोधच करायचा असेल तर ती बाजू आम्ही उलटी बोलू शकतो. पण एक बाजू खरी आहे की, जेव्हा ती बिल्डींग खाली होते, तर ती लोक कुठे, आपण आपल्या महापालिकेचा प्लान तयार करा की, जर धोकादायक बिल्डींग कोसळली किंवा पाडली, आपण मध्ये एक बिझनेस केला. तुमच्या लक्षात आहे का ते माहिती नाही. श्री. विक्रम कुमार साहेब नाहीत म्हणून बोलत नाही. मी त्यांच्या समोर बोलून गेलो होतो. हा तुमचा बिझनेस नाही. साहेब, आपल्याकडून एक निर्णय इकडे झाला होता की, जी धोकादायक बिल्डींग आहे, खाली करणे. जिवीत होनी होऊ नये, मनुष्यहानी होऊ नये इथपर्यंत बरोबर आहे. पण ती बिल्डींग आपण खाली केली. महापालिकेने भुईसपाट केली. मी नक्की सांगतो की, हे मिरा भाईंदर आहे. इथे जमिनीचे टायटल क्लीअर नाहीत. आज नगररचना खाते एकही एन.ओ.सी. देऊ शकत नाही. माझ्या वॉर्डमध्ये अठ्ठावीस बिल्डींग आहेत. आणि त्याच बिल्डींग धोकादायक आहेत. त्यापैकी सहा बिल्डींग महापालिकेने पाडल्या. पाडतेवेळी घाई केली. लोक सैरावैरा फिरत आहेत. त्यांना कुठेही राहायला जागा नाही. आज पाच-सहा हजार मिळत नाहीत. म्हातारी बाई चौथ्या माळ्यावर जाऊ शकत नाही. मुलांच्या परिक्षा आल्या. रुम खाली करा. असे चित्र या शहरात होते आहे. मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब, आपला निश्चित प्लान तयार करा. एका व्यक्तीसाठी नाही, एका बिल्डींगसाठी नाही, एका बिल्डरसाठी नाही की, ही धोकादायक बिल्डींग आपण खाली करतो. त्यातून जे रहिवासी बाहेर निघतील, स्वाती बिल्डींग, डी.जी.मार्केट, न्यु प्रकाश, वसुंधरा, लोक रस्त्यावर आहेत. दोन-दोन पाच-पाच वर्षे झाली. त्याच्यावर आपल्याकडे काय पर्याय आहे? आम्ही प्रतिनिधी म्हणून काम करतो. त्यांना उत्तर काय द्यायचे?

**मा. महापौर :-**

सर्वांनी बसून घ्या. साहेब, तुम्ही काय करणार ते त्यांना सांगा.

**सुजाता शिंदे :-**

मॅडम, तुम्ही माझे पण म्हणणे ऐकून घ्या. त्या बिल्डींगला तडे गेले आहेत. लोक राहतात. ती बिल्डींग कधीपण कोसळेल. त्याला जबाबदार कोण? गौरव एन्क्लेव्ह बिल्डींगला पूर्ण तडे गेले आहेत. मग त्याला

जबाबदार कोण? मी काल श्री. धनेगावे साहेबांना फोन केला होता. तर ते बोलले की, श्री. खांबित यांच्याशी बोलून घ्या. याला जबाबदार कोण?

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, सत्यपरिस्थिती आहे. आता एकच शेवटची लाईन आहे. ओपन लॅन्ड टॅक्स ही कर आकारणी आपण करतो. आता उत्तर बघा किती मजेशीर दिले आहे. मी विचारले की, आतापर्यंत आठ वर्षापासून टॅक्स का घेतला नाही. २००८ ला झाले म्हणजे पाच वर्षे. मला उत्तर देतात की, ओ.सी. घेणार त्यावेळी घेऊ. मला एक सांगा की, याला मी काय उत्तर देऊ? दरवर्षी ही कर आकारणी करायची आहे. त्यांचे उत्तर असे आहे की, ज्यावेळी ओ.सी. देऊ त्यावेळी घेऊ. ओ.सी. ला आलाच नाही तर घ्यायचेच नाही. इट इज द फोर करोर रुपीज. त्याच बिल्डरचे आरक्षण बदलतो. तोच बिल्डर इलिगल करतो. आपले चार करोड रुपये बाकी ठेवतो. श्री. सावंत साहेबांनी का वसुल केले नाहीत? मॅडम, दोन-पाच हजार रुपये बाकी असतात. ८० टक्के टॅक्स भरला तरी आपण जाऊन पाण्याची लाईन कापतो. त्या बिल्डरच्या बाकी बिल्डींग चालू आहेत त्या बंद करता येत नाहीत का? काम बंद करता येत नाही का?

**मा. महापौर :-**

मी मा. आयुक्त साहेबांना आता बोलले की, दोन महिन्यामध्ये ज्या इलिगल बिल्डींग आहे, त्याबद्दल आपण स्ट्राँग डिसीजन घेऊ की, वी विल डिमॉलीश दोज बिल्डींगस्.

**नरेंद्र मेहता :-**

हा इलिगलचा विषय नाही. त्याचे चार करोड, जर आपण इलिगलचे बोलतो तर चार आणि चार, आठ होईल. ज्यावेळी रेग्युलराईज करु त्यावेळी आठ करोड होईल. चार करोड ओरिजनल बाकी आहेत. मग आपण ते का घेत नाहीत? चार-पाच वर्षापासून त्याच्याकडून का वसुल केले नाहीत? त्याला किती नोटिस दिल्या, त्याला किती सील केले, काय केले ते आम्हाला सांगा.

**मा. आयुक्त :-**

या प्रश्नामध्ये काही मुद्दे उपस्थित झालेले आहेत, ते म्हणजे, या ठिकाणी बांधकाम परवानगी दिल्यानंतर जी बांधकाम परवानगी दिली होती त्याचे उल्लंघन झाले आहे आणि त्यांनी जास्त बांधकाम केलेले आहे. हे बांधकाम करताना जो लेआऊटमध्ये किंवा ज्या जागेवर जो बेस एफ.एस.आय. होता. त्याचा त्यांनी वापर केलेला आहे. त्या व्यतिरिक्त मध्यंतरी मा. महासभेने घेतलेला निर्णय आणि त्या दरम्यान उद्‌भवलेली न्यायालयीन प्रकरणे, याचा देखील विचार करुन त्यांना टी.डी.आर. देय आहे, अनुज्ञेय आहे की नाही, डी.सी. रुलमधील तरतुदी, या सभा आणि त्यानंतर आपला जो ओपन लॅन्ड टॅक्सचा मुद्दा होता. या सगळ्या मुद्दयांवर येत्या दोन महिन्यांमध्ये मी स्वतः तपासणी करेन. आता आपण थोड्या वेळापूर्वी सांगितले की, जी रेग्युलराईज असेल तर आम्हाला रेग्युलराईज करायला काही हरकत नाही. मला अधिकार असतील तर त्या अधिकाराचा वापर करुन, जो काही अधिकार असेल, पाडण्याचा अधिकार असेल किंवा रेग्युलराईज करण्याचा अधिकार असेल, त्याचा वापर करुन येत्या दोन महिन्यांमध्ये, आपण जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत, विशेषतः जे वाढीव मजले बांधकाम केलेले आहे ते एक त्यानंतर ओपन लॅन्ड टॅक्स वसुल करण्याबाबतचा जो मुद्दा होता तो दोन आणि याच्या अनुषंगाने उपस्थित झालेले सगळे मुद्दे, या सगळ्या मुद्दयांचा येत्या दोन महिन्यामध्ये आवश्यक तो निर्णय घेण्यांत येईल.

**नरेंद्र मेहता :-**

दोन महिने पाहिजे? या बिल्डींगला रेग्युलराइज करायचे की, तोडायचे यासाठी दोन महिने लागतील का?

**मा. आयुक्त :-**

दोन महिने म्हणजे मी अप्पर लिमिट सांगितलेली आहे. तो निर्णय दोन महिन्यांच्या अगोदर घेण्यात येईल असे मी बोललो आहे,

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, दोन महिने? वाय यु वॉन्ट सो मच टाईम? ८ डेज, १५ डेज. म्हणजे बिल्डरला बोलवून त्याने रेग्युलराईज केले तर रेग्युलराईज करा. आयदर यू टेक युअर डिसीजन. आम्हाला तुम्ही दोन महिन्यात करणार, मध्ये मी श्री. धनेगावे साहेबांना विचारले की, अजूनपर्यंत जागा का घेत नाही? ते बोलतात की, ॲक्वायर करणार सांगितलेले. पण कधी करणार हे कुठे सांगितले आहे, मग तसेच राहील की, दोन महिने म्हणजे साठव्या दिवशी आम्ही विचारायचं गीव अस सॅटीसफॅक्टरी आनसर. मॅडम, आपण याच्यावर रुलिंग द्या. प्रश्न घेऊन आम्ही तुमच्याकडे आलो आहे.

**मा. महापौर :-**

साहेब, डोन्ट वेट फॉर दोन महिने. तुम्ही या एका महिन्यामध्ये वर्कआऊट करुन त्यांना डिसीजन द्या.

**नरेंद्र मेहता :-**

धन्यवाद मॅडम.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

मा. आयुक्त साहेब, आपण धोकादायक म्हणून बिल्डींग खाली करण्यासाठी नोटीस पाठवता. त्यांना खाली करायला लावता आणि ते रस्त्यावर येतात. तर त्यांना आपण बांधायची परमिशन का देत नाही? मी सांगतो जेवढे फुट आहे तेवढेच. त्यांना वर पाच किंवा दहा फुटसुध्दा नको आहे. त्यांना तेवढीच परमिशन द्यावी, जेवढे ते चाळीस-पन्नास वर्षापासून राहतात. जेवढे फुट त्यांचे बांधकाम आहे, तेवढेच बांधकाम त्यांना द्यावे. तरच त्यांना खाली करायला लावा. खाली करुन रस्त्यावर जाऊन त्यांना झोपडी कधी मिळणार. आज मुंबईमध्ये स्लममधील लोकांना बिल्डींगमध्ये राहायला जागा देतात. आपल्याकडे चाळीस वर्षापासुन राहून त्या बिल्डींग तोडतात आणि रस्त्यावर राहायला देतात. भाईंदरमध्ये हा उलटा न्याय चालू आहे. मी मा. आयुक्त साहेबांना विनंती करतो की, त्यांचे तोडण्यापूर्वी त्यांना परवानगी द्यावी.

**गिता जैन :-**

साहेब, त्यामध्ये एक असाही मुद्दा आहे की, ज्या बिल्डींगचे साहेब बोलतात, ती पाडली की, त्यांची तेवढी ऐपत नाही की, ते रिकन्स्ट्रक्ट करु शकतात. जरी तुम्ही तेवढी बांधायला परमिशन दिली, तरी त्यांची तेवढी ऐपत नाही. मग त्याच्यावर आपण काही ठोस निर्णय घ्यायचा. आयदर वी गिव्ह एक्झीस्टींग प्लस वन. आपण ते ऑलरेडी मांडलेले आहेच आणि त्यावर आपण काहीं निर्णय घ्यावा असे मला वाटते.

**मा. आयुक्त :-**

यामध्ये मी दोन्ही मुद्दयांचा खुलासा करु इच्छितो सध्याचे जे धोरण आहे, म्हणजे पुर्नविकास करताना आत्ता एक एफएसआय म्हणजे जो बांधकामाचा एक एफएसआय आणि वर एक इन्सेन्टीव्ह एफएसआय हे दोन एफएसआय देण्याची सध्या तरतुद आहे पण आपण शासनाकडे अशी मागणी केली होती मला वाटते मा. महासभेने ठरावदेखील केला होता की, जो एफएसआय वापरलेला आहे तो वापरलेला एफएसआय आणि त्याच्यावर एक इन्सेन्टीव्ह एफएसआय तो आपल्या शासनाकडे प्रलंबित आहे. समजा एखादी बिल्डींग, एक एफएसआय म्हणजे वापरलेला एफएसआय एक एफएसआय पर्यंत मर्यादित असेल, तो एक एफएसआय आणि एक इन्सेन्टीव्ह एफएसआय असेल तर त्याला परवानगी देता येईल. त्याला काही अडचण होणार नाही. परंतु एखाद्या जागेचे एक एफएसआय पेक्षा जास्त बांधकाम केलेले असेल, आपल्याला सर्वांना कल्पना आहे की, ज्यादा बांधकाम केले असेल तर त्याला काही मर्यादा घालणे आवश्यक आहे, शहराच्या एकुण अॅबीलीटीजची उपलब्धता विचारात घेऊन तर ती किती असावी, काय असावी याबद्दल थोडा विचार होणे आवश्यक आहे. पण असाही निर्णय घेणे म्हणजे थोडेसे धाडसाचे ठरेल की, जितका एफएसआय वापरलेला आहे आणि त्याच्यावर एक एफएसआय आणखीन द्या, हे थोडेसे धाडसाचे ठरेल असे माझे वैयक्तीक मत आहे. आपल्या अगोदरच्या प्रस्तावाबद्दल मी बोलत नाही, पण माझे वैयक्तिक मत आहे. परंतु, आपला प्रस्ताव, मी आणखीन स्पष्ट करु इच्छितो की, आपला प्रस्ताव शासनाकडे गेलेला आहे. त्यामध्ये वापरलेला एफएसआय आणि वापरलेल्या एफएसआयवर आणखीन एक अतिरिक्त एफएसआय द्यावा असा प्रस्ताव आपण पाठवलेला आहे. दुसरा मुद्दा या प्रस्तावाचा, आता आपल्या ठाणे जिल्ह्यामध्ये इतरत्र जी घटना घडलेली आहे, त्या प्रस्तावाला गती येईल असे मा. मुख्यमंत्री महोदयांनी देखील काल विधानसभेमध्ये सभागृहास आश्वासीन केलेले आहे. कदाचित त्याचा आपल्याला लाभ घेऊन आणखीन काही प्रस्ताव पुढे रेटता येईल का याचासुध्दा प्रयत्न करण्यांत येईल.

**सुहास रकवी :-**

साहेब, तुम्ही आता म्हटल्याप्रमाणे आपण ज्या धोकादायक इमारती व्हॅकेंट करुन त्यांना रिकन्स्ट्रक्शन करण्याकरिता आपण प्लान पास करायचा आहे. पण भाईंदर ईस्टला व्हॅकेंट केलेल्या आहे. त्यांचा कन्वेअन्स वगैरे सगळे आहे. पण आपल्या इथे कम्प्युटरवर प्लान पास करणार असे काहीतरी आहे. तर त्याकरिता सहा-सात महिने झाले. तर ज्या इमारती आपण खाली केलेल्या आहेत. त्याचा प्लान लवकरात लवकर पास करावा. जसे श्री. रोहिदास पाटील साहेबांनी सांगितल्याप्रमाणे लोक इथे-तिथे भटकत आहेत. तर त्याकरिता आपण काही तरतुद करावी ही विनंती आहे.

**मा. आयुक्त :-**

पुर्नःविकासामध्ये ज्या काही अडचणी येणार आहेत, त्याचे निराकारण निश्चितपणे करण्यात येईल.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, मिरा भाईंदर शहरात अनेक धोकादायक इमारती आहेत. आम्ही ज्यावेळी शहरात फिरतो तेव्हा आम्हाला दिसते की, ही बिल्डींग धोकादायक आहे, तरी त्याला नोटीस नाही. आणि काही बिल्डींग आपल्याला दिसतात की, ही धोकादायक, त्याला नोटीस. हल्ली सगळ्या बिल्डरने दुसरे कामकाज चालू केले आहे की, बिल्डींग शोधायची. महापालिकेच्या अधिकाऱ्यांना येऊन सांगायचे की, याला नोटीस पाठव. आणि त्या प्रकारच्या नोटीस पाठवल्या जातात. स्पेशली आपले ते उल्हास, ते हेच करतात. आता काही सोसायटी समोरुन येऊन पत्र देतात की, आमची बिल्डींग धोकादायक आहे. कारण बिल्डरने सांगितले तर खाली करणार नाही. महापालिकेने हाथोडा मारता तर चेअरमेन, सेक्रेटरी यांच्या संगनमताने हे चाललेले आहे. म्हणजे धोकादायला खाली करा, तोडा, तो तुमचा निर्णय आहे. पण बिल्डर बोलतो, त्यांना बिल्डींग खाली होत नाही म्हणून महापालिकेने जाऊन त्यांचे बिल्डींग व्हॅकेंटचे काम करुन द्यायचे. सध्या या महापालिकेत हेच कामकाज चाललेले आहे. मॅडम, दुसरे असे आहे की, ज्यावेळी आपण बिल्डींग ऑडिट करतो, त्या आपल्या

पॅनलवर सात-आठ लोक आहेत. आता आठमधून एकाने ठरवले की, धोकादायक आहे. त्याला परत रिऑडीट करायचे असेल तर ते सात लोक करतच नाहीत. ते बोलतात की, त्यांनी केलेले आहे, आम्ही परत कसे करायचे? म्हणून त्याला अपील पण नाही. आणि प्रायव्हेट आणले तर चालेल, पण तुम्ही त्याला ॲक्सेप्ट करत नाही. देर आर एट पर्सन इन द पॅनल. इफ समबडी हॅज डिसाइड दॅट इट इज डेंजरस. मग एखाद्या सोसायटीला वाटते की, आमची धोकादायक कशी होऊ शकते. रिपेअरेबल होऊ शकते. तर दुसऱ्यांकडे गेले तर श्री. खांबित साहेबांचे म्हणणे आहे की, ही यादी आहे, यांच्याकडेच जा. काही लोक दिड लाख बोलतात, काही लोक एक लाख बोलतात, काही पन्नास. ती पैशाची बाब जाऊ द्या. पण त्याचे असल्याने कोणीही हात टाकत नाही. कारण एखाद्या पॅनलवाल्यांनी धोकादायक म्हणून सांगितले आणि दुसऱ्याने सांगितले की, धोकादायक नाही. मग जायचे कुठे? ती रिपेअरेबल आहेत किंवा रिऑडीट होऊन स्टेबल स्ट्रक्चर आहेत, हे त्यांनी कसे प्रुफ करायचे? मी एक-दोन लोकांना अनेकदा फोन केले की, तुम्ही रिऑडिट करा. श्री. खांबित साहेबांनी यादी दिली. पण कोणी हातच टाकत नाही. ते बोलतात की, मेहता साहेब उन्होंने किया है। अननेसेसरी वो झगडेवाला काम है। मग कसे करायचे? काही बिल्डींग रिपेअरेबल असतात. पण आपल्याकडे कोणीही असे ऑडिट करतच नाही. बिकॉज द एट पर्सन ऑन द पॅनल. तर त्यासाठी दुसरा काहीतरी उपाय सांगा की, ज्या इमारत, जे आर्किटेक्ट आहेत, स्ट्रक्चरल इंजिनिअर आहेत, त्यांची पण डीग्री होल्डर आहेत. त्यांनी जरी रिपेअरेबल दिले, ते तरी ऐका.

**मा. महापौर :-**

काही बिल्डींग रिपेअरेबल आहेत. परंतु आता आमच्या वेस्टला पण झालेले आहे, त्यांना पूर्वी आपण सांगितलेले आहे की, रिपेअरींग करा. तरीसुध्दा ते खाली पडले. देन वॉट वी शुल्ड डू फॉर दॅट.

**नरेंद्र मेहता :-**

माझा विषय तो नाही की, तुम्ही करु नका. माझे एकच म्हणणे आहे की, एखाद्या व्यक्तीला तुम्ही धोकादायक सांगितले. मला असे वाटते की, धोकादायक नाही. आय हॅव टू रिऑडीट, मग कुठे काही अपीलच नाही. यांचे म्हणणे आहे की, त्या सातला सांगा. सात बोलतात की, आम्ही करणार नाही. कारण आमच्याच एका व्यक्तीने केलेले आहे. मग त्यांनी प्रायव्हेट करुन आणले, तुम्ही जे बोलता ते ठिक आहे, पण सर्व असे होऊ शकत नाही. मग ते बाकी लोकांना हे सर्व भोगावे लागते. आणि मा. आयुक्त महोदय, आपल्याकडे जेवढे आज पुटअप करतात, ते फक्त ज्यामध्ये बिल्डरचे ॲग्रीमेंट झालेले आहे, ते खाली करण्यासाठी आपला वापर करुन घेतात की, त्यांच्याने ते खाली होत नाही. दहा लोक ॲक्सेप्ट करत नाही. मग महापालिकेला बोलवा आणि ते खाली करायला लावा हीच पध्दत चालू आहे. त्यांनाच नोटीस दिल्या जातात. मा. आयुक्त महोदय, आपण याच्यावर विशेष काळजी घ्या ज्यावेळी आपण इमारत खाली करायला सांगता ती खरोखर रिऑडीट होऊ शकते का? त्यांना संधी तरी द्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, माझ्याच वॉर्डमधील जवाहर नगर इमारत आहे त्याच्याबाजुला गायत्री नगर इमारत आहे. गायत्री नगर इमारतीची कंडीशन एवढी खराब आहे की, त्याला धोकादायक डिक्लेअर केलेली असताना ती तोडायला अजून कोण आलेले नाहीत, त्याचे टेंडरपण झालेले आहे पण बाजूची जवाहर नगर इमारत यांच्या सोसायटीने महानगरपालिकेला पत्र दिलेले आहे की, आमची धोकादायक डिक्लेअर करा आणि त्या बिल्डींगला वरुन न तोडता सर्व दुकानांचे शटर काढून तोडायला चालू केले आहे मग हा रिपोर्ट या लोकांना कोणी दिला? बिल्डींगच्या एकाही माणसाला माहिती नाही की, नगरपालिका आमची बिल्डींग तोडायला येत आहे ते नोटीस सेक्रेटरी, चेअरमनला देतात की, प्रत्येक रुमवाल्याला देतात? त्याचा जरा खुलासा करा फक्त चेअरमन, सेक्रेटरीच्या संगनमताने त्यांनी चार नोटीस त्यांच्याकडे ठेवल्या आणि नंतर ते डायरेक्ट तोडायला आले.

**मा. महापौर :-**

चेअरमन, सेक्रेटरीलाच नोटीस जाते ना?

**प्रेमनाथ पाटील :-**

सर्व रहिवाशांना द्यावी लागते हे लोक तसे करत नाहीत हे लोक त्यांच्या अंडरस्टॅंडींगमुळे ती बिल्डींग डायरेक्ट धोकादायक डिक्लेअर केली त्याविषयी वरुन न तोडता, खालून दुकानदाराकडुन तोडत होते कारण तीन दुकानदार त्याचा विरोध करतात की, आम्हाला हा बिल्डर नको आहे आणि बिल्डरच्या सांगण्यावरुन ती बिल्डींग धोकादायक डिक्लेअर केली आहे तरी आपण त्या संबंधीत अधिकाऱ्यांना सांगून ठेवा की, असे काही करु नका.

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो, प्रभाग क्र.३८ शांती नगर वसाहत, सेक्टर ४ मध्ये गेल्या चार वर्षापूर्वी एक इमारत नगरपालिकेमार्फत अनधिकृत घोषित करुन तोडण्यात आली ते लोक आजही वाऱ्यावर आहेत म्हणजे आज इकडे अकरा महिने, तिकडे अकरा महिने असे सतत फिरत आहेत मी या विषयी पालिकेला पत्र दिलेले आहे की, सदर इमारतीला वाढीव चटई क्षेत्र मंजुर करावे आणि त्यांचे पुर्नवसन करावे.

**मा. महापौर :-**

साहेब, पहीले तेच बोलले की, आपण ऑलरेडी प्रपोजल पाठविलेले आहे आणि वाढीवसाठी मागितलेले आहे.

**प्रशांत दळवी :-**

त्याचे उत्तरदेखील मला अजूनपर्यंत आलेले नाही परंतु, आशिया खंडातील अशी एकमेव इमारत जी शांती स्टार बिल्डरने बांधलेली आहे साडेशे पन्नास इमारती आहेत आज माझ्या प्रभागामध्ये, मी त्यांना लेटर देऊन चार महिने झाले की, ज्या अनधिकृत बिल्डींग असतील त्या घोषित कराव्या पण मला अजूनही पत्राचे उत्तर मिळालेले नाही त्यांचे स्ट्रक्चर ऑडीट त्या सोसायटीने करुन घेतलेले नाही त्यांचे स्ट्रक्चर ऑडीट आम्ही तपासले त्याच्यावर रिमार्क आहे त्या बिल्डींगला तडे गेलेले आहेत मग त्या अनधिकृत घोषित केव्हा करणार? आम्हाला कधी कळवणार? आज चार महिने झाले आम्ही त्याचा सतत पाठपुरावा करत आहोत ज्यावेळेला तुम्ही ती धोकादायक घोषित कराल आणि त्यावेळेला तुम्ही त्या सर्व रहिवाशांना खाली उतरवून ती बिल्डींग तोडायला घ्याल मग त्या रहिवाशांचे पुर्नवसन करणार आहात का? आणि तसे जर झाले नाही तर आज ठाणे आणि मुंब्याप्रमाणे सर्व पक्षीय एकत्र येऊन जे ठाणा बंदची हाक दिलेली आहे तसे मिरा भाईंदरला करावे लागणार आहे माझी तुम्हाला विनंती आहे की, मी जे पत्र दिलेले आहे त्याचे मला उत्तर मिळावे आणि जिथे अनधिकृत बांधकाम होणार आहे, पूर्वी आपल्या महानगरपालिकेमध्ये तसे होते....

**मा. महापौर :-**

ठिक आहे तुम्हाला उत्तर द्यायला सांगते.

**प्रशांत दळवी :-**

जिथे अनधिकृत बांधकाम होत आहे किंवा झालेले आहे तिकडे महानगरपालिकेतर्फे बोर्ड लावण्यात यावा जेणेकरुन जे लोक तिकडचे फ्लॅट खरेदी करत आहेत, त्यांची दिशाभुल होणार नाही त्या ठिकाणी महानगरपालिकेतर्फे बोर्ड लावण्यात यावा की, सदरची इमारत अनधिकृत आहे.

**दिनेश जैन :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, प्रभाग क्र. ३७ मध्ये शांती नगर मिरा भाईंदर जे विकर सेक्शनच्या हिशोबाने डेव्हलप केलेले आहे तिकडे आत्ता सेक्टर नं.७ मध्ये कमीत कमी वीस ते पंचवीस वर्षे जुन्या बिल्डींग आहेत आणि तिकडे शांती स्टार बिल्डरने एक शाळेची जागा ठेवलेली होती आत्ता आपण मागे एका मिटींगमध्ये केले होते की, एक किलोमीटरच्या आतमध्ये आपल्याला शाळा झाली पाहिजे आणि मिरारोडमध्ये शांतीस्टार बिल्डरची एकच शाळा आहे दुसरी कुठेही शाळा नाही आणि ती शाळा काढून तिकडे त्यांना टॉवरची परमिशन दिलेली आहे आणि ज्या पंचवीस-तीस वर्षे पूर्वीच्या जून्या बिल्डींग आहेत त्या पायलिंग करताना हलतात जे पायलिंग करतात त्या हिशोबाने बाजूच्या इमारतीमध्ये दरार पडलेली आहे तिकडचे लोक कम्प्लेंट करतात की, त्यांचे सामान वगैरे सगळे खाली पडते.

**दिनेश जैन :-**

त्याच्यावर कारवाई करुन त्यांना थांबायला लागेल. नाहीतर सेक्टर सातमध्ये धोकादायक होणार अशी शक्यता आहे.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्तांना एक पत्र द्या.

**दिनेश जैन :-**

मी पत्र दिले होते त्याचे उत्तर मला भेटले नाही.

**दिप्ती भट :-**

शांतीनगर सेक्टरची गोष्ट निघाली आहे. मी लेटरपण दिले आहे. शांती स्टार बिल्डर आणि हर्षद भाई ह्यांच्या दोघांवर गुन्हा दाखल केलेला आहे. परंतु नगरपालिकेने त्याच्यावर काही कारवाई केली नाही. त्याचे ऑफिस इनलिगल जागेवर बांधलेले आहे. ती जागा महानगरपालिकेची बी.पी. रोड आहे. ते पण आतापर्यंत त्यांनी तोडलेले नाही. त्यांनी आजपर्यंत एकही आर.जी. आम्हाला डेव्हलप करुन दिलेली नाही. ते महानगरपालिकेने केलेले आहे. तो लोकांना कन्व्हेन्स पण देत नाही. जेव्हा बिल्डींग खाली करायला लावतो. त्यांच्या बाप दादाची जागा आहे की, एकानंतर मुलांनी वापरायची त्याच्यानंतर त्याच्या मुलांनी वापरायची. ॲटलिस्ट त्यांना कन्व्हेन्स तरी द्या. त्यांना आपण ओ.सी. पण देऊन टाकतो त्यांनी रोड बनवले नाहीत. तिथे महानगरपालिकेने स्ट्रीट लाईट का बनवली? त्यांना परमिशन दिल्यावर त्यांना सांगितले होते की, रोड, ड्रेनेज लाईन आणि स्ट्रीट लाईट बिल्डरने लावायच्या म्हणून आपण त्यांना परमिशन दिली. त्याच्यामध्ये त्यांनी रोड बनवला पण स्ट्रीट लाईट नगरपालिकेने का लावली? त्याचे उत्तर पाहिजे. तेव्हा पण मी सांगितले रोड आणि सगळ आपण त्यांना टी.डी.आर. सगळ देतो. त्याच्याकडून बांधून घ्या. पण त्यांनी अजूनपर्यंत बांधलेले नाही. त्याच्यावर ॲक्शन घेण्यात यावी.

**मर्लिन डिसा :-**

मॅडम, विथ यूअर परमिशन शितल नगरमध्ये शितल डेव्हलपर्स त्याचे पण खूप कंस्ट्रक्शन विक झाले आहेत. आणि आर.जी. प्लॉट त्यांनी अजून डेव्हलप केले नाहीत. मी त्यांना पाच वर्षापासून फॉलोअप करत

आहे. पण त्यांनी काहीच केलेले नाही. त्यांचे कंस्ट्रक्शन रोखण्यासाठी मी टाऊन प्लानिंगला लेटर दिले होते आणि सिमला कॉम्पलेक्समध्ये काही बिल्डींग ऑलरेडी सिलींग आर फॉलिंग इमारती धोकादायक आहेत. दॅट इज वी नीड टू टेक केर ऑफ धिस बिल्डींग.

**मा. महापौर :-**

ओके. लक्षवेधी घ्या.

**दिनेश जैन :-**

शांतीस्टार बिल्डरने जे कॉनरचे प्लॉट ठेवले आहे ना. त्याच्यावर पुन्हा इनलिगल बांधकाम चालू केलेले आहे.

**नगरसचिव :-**

आजच्या सभेसाठी तीन लक्षवेधी आलेल्या आहेत. पहिली लक्षवेधी सन्मा. प्रशांत केळूसकर, दुसरी लक्षवेधी सन्मा. प्रभात पाटील ह्यांची आहे. तीसरी लक्षवेधी सन्मा. नरेंद्र एल. मेहता ह्यांची आहे. मी मा. महापौराना तीनही लक्षवेधी सूपुर्द करतो.

**मा. महापौर :-**

सन्मा. प्रभात पाटील ह्यांची लक्षवेधी मी स्विकारत आहे व इतर दोन लक्षवेधी मी फेटाळत आहे.

**प्रभात पाटील :-**

मिरा भाईंदर शहरामध्ये असलेल्या गॅरेजेस बाबत मग ते अधिकृत आहेत की, अनधिकृत आहेत हे प्रशासन बघून घेईल. मॅडम, ह्याच्यात गॅरेजेस तीन प्रकारे आहेत. एकतर मोटर ट्रेनिंग गॅरेज हा एक प्रकार, दुसरा प्रकार आहे मोटार रिपेयरींग गॅरेजेस आणि तीसरा प्रकार आहे गाड्या विक्री केंद्र त्याला कार पॉईंट असे मस्त पैकी नाव देतात. आणि तिकडे काय अपॉइंट करतात मला माहित नाही त्या तिकडे फॉर सेल म्हणून लिहीलेले असतात. आणि हा सगळा प्रकार मी पश्चिमेचे फार काही सांगू शकणार नाही. आपण तिथल लिडींग करता पण भाईंदर पूर्व आणि मिरारोड जेवढे महत्वाचे रस्ते आहेत. त्या प्रत्येक रस्त्यावर असे गॅरेजेस दिसणार. एखाद्या बिल्डींगमध्ये छोटासा गाळा घ्यायचा आणि सो ॲन्ड सो नाव द्यायचे अमूक-अमूक गॅरेज किंवा अमूक-अमूक रिपेयरींग सेंटर, किंवा मोटर ट्रेनिंग सेंटर जे काय असेल ते. तो छोटासा गाळा आणि त्याच्या समोर फूटपाथ आपल्याच मालकीचे, रस्ता आपल्याच बापाचा आहे, रस्ता हा नागरिकांसाठी चालायचा आहे, त्याच्या गाड्या चालायचा आहे हा प्रश्न इथे नाहीच आहे. मी जे बोलते त्याच्याशी बहुतेक नगरसेवक सहमत असतील. आपले अधिकारी देखील सहमत असतील. त्या छोट्याशा गाळ्यामध्ये फक्त पाटी लावायची आहे. आपण बसायचे आहे. तिथल्या मालकाने आणि फूटपाथ आणि रस्त्यावर आपला व्यापर, उद्योग सुरु ठेवायचा आहे. मा. आयुक्त साहेब त्या छोट्याशा गाळ्यामध्ये गाड्या धुवायला पाण्याची टाकी केली जाते. इकडे भयानक प्रकार आपल्याकडे चालू आहेत. तुम्ही रस्त्यावर जाताना बघा त्या पार्क केलेल्या गाड्यांवर इंच-इंच मातीचा थर असतो. त्या किती दिवसापासून तिकडे आहेत त्याचा तुम्ही अंदाज करु शकतात. रोज आपण पेपरमध्ये टिव्हीवर बघतो की आमच्या कारमध्ये स्फोट झाला. त्या कारमध्ये काय आणून ठेवणार ते तुम्हाला कसे माहित पडणार कारण त्यांना कधी हस्तक्षेपच होत नाही. त्या फक्त तिथे लावलेल्या असतात. मला असे वाटते की, कार पार्किंगचा दुसरा उद्योग केला असेल ते काही सांगता येणार नाही. नागरिकांना मात्र वळण घेत घेत गाड्या काढायच्या, तुम्हाला इंद्रलोक मधली एक घटना सांगते. गोल्डन नेस्ट इंद्रलोकचा रस्ता तिथे मोठमोठे रिलायन्सचे टॉवर आहेत. कारण तिकडे मोठ्या वाहिन्या तिथून गेल्या आहेत. त्यांचा मोठा घेर आहे. ह्या बाजूनेग गाडी काढत असताना समोरुन काय येते ते दिसत नाही. परंतु ह्या टॉवरचा वापर इंद्रलोकमध्ये तुम्हाला दिसेल. आणि मला वाटते सिल्वर पार्कचा रस्ता आहे तिकडे सुध्दा दिसेल. त्या बाजूला आणि ह्या बाजूला एक मस्तपैकी सेंटर असते. तिथे गाडी रिपेयरींगसाठी उभी असते त्याच्याखाली माणूस घुसून असतो तो झोपून काम करत असतो. साहेब, त्याचे ॲक्सीडेंट झाले ना जाणाऱ्या गाडीने माझ्या किंवा तुमच्या तर आपल्याला पोलिसवाले उचलून नेतील. परंतु त्याला काय होणार नाही कारण त्याच्या माणसाला दुखापत झालेली असते. हे सगळे नाहक्र भूर्दंड आम्ही सोसायचे, नागरिकांनी सोसायचे. आणि ठोकतात वर साधत्वाने सांगते जे आपल्याला भावते. रस्त्यावर एखादी फेरीवाली बाई बसली असेल, भैया बसला असेल भैयाचा कोणी राग मानू नये तर त्याच्या जवळ आपल्या महापालिकेचा ठेकेदार असतो तो जातो आणि पावती निकाल आणि एवढी मोठी दुकान तिथे थाटून बसली आहेत. तुमचा रस्ता वापरतात, तुमचा फूटपाथ वापरतात त्याच्याजवळून तुम्हाला किती उत्पन्न मिळते. ते काय आपले जावई आहेत का? की, आपण त्यांना पोसायला घेतले आहे. हा सगळा गंभीर प्रकार आहे आणि ह्याच्याकडे प्रशासनाचे लक्ष नाही. तुम्हाला त्याच्यातून उत्पन्न नको आहे. जर तुम्हाला फेरीवाला, भाजीपाण्याचे उत्पन्न हवे तर ह्या लोकांना योजना करुन सगळे फूकट दिले आहे का? आणि कारवाल्याचे मस्त पैकी त्या गाडीवर लिहीलेले असते फॉर सेल. मा. महापौर मॅडम, मोठ्या मोठ्या शहरामध्ये गाड्यांचे शोरुम असतात. महेंद्राच फिॲट, टाटाचे मला तर असे वाटते की, ह्या कंपन्यांना सांगावे की, तुम्ही कशाला मोठी मोठी शोरुम टाकता तुम्ही लाखो करोडोचा त्या शोरुमसाठी खर्च करता या मिरा भाईंदर आपलच असा पैसे खर्च करु नका. इथे कुठेपण तुम्हाला शोरुम उघडता येते. आमच्या प्रशासनाने डोळ्यावर पट्टी बांधलेली आहे. आम्हाला पैशाची गरज नाही. आमची गर्भश्रीमंत महापालिका आहे. हे सगळे प्रकार आहेत. दुसरी गोष्ट की मोटार ट्रेनिंग स्कूलकडे मी आता येते. एक छोटासा गाळा घ्यायचा

आणि तिकडे मोटार ट्रेनिंग स्कूल त्याच्या ४-५ गाड्या रस्त्यावर उभ्या असतात. ज्या ट्रेनिंगला वापरतो. काय हे सगळ? कशासाठी हे सगळ? कशासाठी हे सगळ? आपण त्याच्याकडे दुर्लक्ष करतो. काही करत नाही. महत्वाची गोष्ट अशी की, काल मी महापालिकेकडे माहिती घेतली सन २०१२-१३ मध्ये आपण फक्त दोन गॅरेजेसना परवानगी दिली. आणि शहरात १०० पेक्षा जास्त गॅरेज असतील म्हणजे आपण विचार करु शकतो की, बिना परमिशन किती गॅरेजेस चालतात. गोल्डन नेस्ट, इंद्रलोक भागामध्ये सगळ्या शहरातील सर्वात महत्वाची करोडोची कामे आपल्या महापालिकेची चालू आहेत. हे आपल्याला माहित आहे. शहरातले मोठे पाणी वाहून नेणाऱ्या नाल्याचे काम सुरु आहे. पण ह्या नाले बांधकामाच्या ठेकेदाराला सुध्दा काम करत असताना एकही गाडी हललेली दिसत नाही. त्याचे गाळे तिकडेच आहे तो ठेकेदार इकडे काम करतो पण गाड्या हलत नाही. तुम्ही ठेकेदाराचे पण ओपिनियन घ्या की, तुम्हाला तिकडे काय त्रास होतो. मला एकच म्हणायचे आहे की, आपला परवाना विभाग आपला वाहन विभाग आणि एकंदर सगळे ज्यांच्या हातामध्ये ह्या गोष्टी आहेत ते विभाग प्रमुख त्यांचे उपायुक्त काय करत असतात किती पैसा ते आपल्याकडे आणतात किंवा किती पैशाचा किंवा नागरिकांना त्रास देतात. मी तर म्हणेन पैसा सोडून द्या. हा नागरिकांना त्रास आहे. मी एखादे गॅरेज टाकायचे म्हटले तर दुसऱ्यादिवशी तुमच्याकडे तक्रार येईल. मग आपण ज्यांना पोसतो ते आपले कोण लागतात, हा सगळा पैसा आपल्याला नको आहे का? आपण हे खुले आम सोडून द्यायचे आहे का? ह्या विषयावर तुम्हाला माझी विनंती आहे की, ब-याचदा आपल्याकडे लक्षवेधी येतात लक्षवेधी हा निर्णायक विषय ठरु शकत नाही. परंतु त्याची तुम्ही अंमलबजावणी करु शकता म्हणून मॅडम मला सांगायचे आहे जेव्हा लक्षवेधी येते काही विषयामध्ये तुम्ही ईस्ट्रक्शन देऊ शकता. प्रशासनाला देऊ शकता कमिशनर आपल्या प्रशासनाला देऊ शकतात. परंतु काही विषय असे असतात की, तै पटलावर आणून त्या विषयाला धरुन हा विषय पटलावर नाही. परंतु हा पटलावर असाच एखादा विषय पटलावर घ्या. त्याचे कायद्यात रुपांत व्हावे की, राष्ट्रवादीची सुचना किंवा चर्चा झाली आणि उद्या ती विसरुन गेली असे व्हायला नको. माझी तुम्हाला एक विनंती आहे. ह्या संदर्भामध्ये की, आजपासून ह्या गॅरेजेसना जे लोकांच्या भावनेशी खेळतात म्हणजे आपण त्यांना व्यापार पेठ करुन दिलेली आहे. आणि आपल्याला त्यांच्यापासून एका छदामाचं उत्पन्न नाही. तर ते उत्पन्न आपल्याकडे कसे येईल त्याची चर्चा व्हायला पाहिजे. आपण ह्यांना काही करत नाही. माझ्या वॉर्डमध्ये सोसायटीने आतमध्ये चार फुटाची भिंत बांधली होती की, पावसाचे पाणी येते आणि मिटरमध्ये शिरते. तर आपल्या प्रशासनाने ती भिंत जाऊन तोडली. आणि हे सगळे प्रशासनाला दिसत नाही. आणि त्यांना नोटिस दिली की, आम्हाला पाडल्याचा खर्च द्या म्हणून. म्हात्रे साहेब आता इथे नाहीत पण आंधळ दळते आणि कुत्र पिठ खाते असेच सगळे चाललेले आहे. ह्या विषयावर ठोस असा निर्णय व्हावा.

**मा. महापौर :-**

बसून घ्या मी डिसीजन देते. सन्मा. प्रभात मॅडमनी जो विषय मांडला आहे तो खरोखर चांगला विषय आहे. तुम्ही वेस्टचे म्हणाला वेस्टमध्ये मी जेव्हा नगरसेविका असताना मेनरोड आणि तो माझाच वॉर्ड आहे. आणि त्याच्यावर सतत पाठपुरावा करुन ते मी थांबवले. तुम्ही सांगताना त्याच्या मी आणि खंडेलवालजी अजूनही त्याच्याचपाठी लागलो आहेत की, रोडवर गाड्या पार्किंग करु नका. ज्या बिल्डींगमध्ये गॅरेजेस आहेत ते ही मी ज्यावेळेला स्वतः उभे राहून तोडलेले आहे. कारण ते बिल्डींगला डेंजर आहे. बिल्डींगची लोकपण बोलायची की, बिल्डींगमध्ये गॅरेजेसना परमिशन देऊ नका. कारण ते जे गॅसचा जो वापर करतात ते खरोखर डेंजर आहे. ते नेहमी सांगायचे आता मी मा. आयुक्तांना सांगते की, साहेब तुम्ही ह्याच्यावर थोडेसे लक्ष द्या. आणि रोडवर जी कार पार्किंग करतात आणि गॅरेजेस जे फॉर सेल लावतात. आणि २-२, ३-३ वर्ष गाडी धूळ खाते परंतु ती विक्री होत नाही. तर त्यांच्यावर ॲक्शन घेऊन त्या गाड्या काढायला सांगा किंवा त्यांना गीव देन परमिशन आपले जे ग्राऊंड आहेत त्यांना तुम्ही कुठेतरी परमिशन द्या. त्यांच्याकडून भाडे वसूल करा. आणि तिथे त्यांना त्यांच्या गाड्या विक्री करु द्या. जे कार पॉइंट आहेत, पॉप्युलर वाले आहेत असे कितीतरी असतील त्यांची मिटींग घ्या. आपल्या चारही प्रभाग अधिकाऱ्यांना मी सांगते की, सर्वांची मिटींग घ्या. आणि साहेब आपले ग्राऊंड व्हेकेंट असेल तिथे त्यांना परवानगी द्या. देयर फॉर समटाईम व्हॅकेंट सेल देयर कार गो अदर आणि असे करुन वी कॅन स्टॉप दिज ठीक आहे.

**राजेंद्र जेन :-**

मा. महापौर मॅडम, आपने बहुत अच्छा बोला। आपके सुचना में सिर्फ रोड नही युज हो रहा है, बल्की कार पॉईंट जो वर्धमान गार्डन है। उसके बाहर जो पार्किंग है, वह बडे दादागिरी से यूज होते है।

**मा. महापौर :-**

वही मैंने बोला की, यूज पार्किंग और सब हो रहा है।

**राजेंद्र जैन :-**

मैंने वहाँ शिकायत भी किया। तो उन लोगो को डर भी नहीं अधिकारी साथ में है वर्धमान डेव्हलपर जो गार्डन है, उसके पार्किंग के अंदर सेल वाली कार पार्क हो रही है। बडे मजे से वो कार ला रहा है, दिखा रहा है। अधिकारीयों का संरक्षण मिलता है, इसिलिए ऐसा होता है। अधिकारीयों का संरक्षण नहीं मिलना चाहिए।

**दिपीका अरोरा :-**

मिरारोड में जो आर.जी. प्लॉट है। और ओपन व्हेकेंट प्लान्ट है। भले ओन हो या पालिका के हो। वहाँ सब जगह पे यह गॅरेज का काम चालू है। डिव्हायडर लगने के बाद बी.एस.टी. बस को जाने के लिए रस्ता नहीं है। वहाँ पर रस्ते पर रोककर काम हो रहा है। महोदयजी, आर.टी.ओ. को मैंने बुलाया था। दो गाडीया वहाँ पर से खूद उठवाई खडे होकर के, तो आर.टी.ओ. का काम भी हम करे और पालिका का काम जो है ..................

**मा. महापौर :-**

सेम काम मैने भी किया था।

**दिपीका अरोरा :-**

७००० का नगरसेविका का जो इन्कम है। सॅलरी बढा दो ना उनका काटके हम को दो।

**मा. महापौर :-**

इतनी पुरानी गाडी रोड पे खडी है। कितनी बार मैंने खूद लेटर दिया है।

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त महोदय, ह्याच सभागृहामध्ये दोन महिन्यांआधी पार्किंगच्या विषयावर मंजुरी दिलेली आहे. शहरात २५ ठिकाणी पार्किंग झोन करुन पार्किंगचे ठेके खाजगी पध्दतीने काढायचे होते. त्याचा पाठपुरावा झाला तर त्याला बऱ्याच प्रमाणात नियंत्रण लागेल. त्याचा पाठपुरावा करावा.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १, दि. २०/०२/२०१३ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**प्रशांत केळूसकर :-**

पान क्र. १३ मध्ये प्रॉपर्टी टॅक्स मध्ये रवि ग्रुपची जी ॲड होते त्याबद्दल मागच्या वेळेस खुलासा करणार म्हणून सांगितले होते. त्याचा अजून खुलासा केलेला नाही. रश्मी गृप.

**मा. महापौर :-**

रवि ग्रुप डोक्यातच बसला आहे रश्मी ग्रुप होता.

**प्रशांत केळूसकर :-**

तो धोकादायक माणूस आहे म्हणून त्याचा खुलासा कधी करणार?

**मा. महापौर :-**

ते आपण नंतर बोलू आता बसा. आता महासभेला सुरुवात झाली आहे. एवढे टाईम होते त्यावेळेला तुम्ही उभे राहून बोलले नाहीत.

**प्रशांत केळूसकर :-**

आता इतिवृत्तांत कायम करण्याचा प्रश्न आलेला आहे. पान नं. १३ मध्ये तो विषय आहे. पान नं. २९ वर मा. आयुक्तांनी सांगितले होते की, मी स्वतः डिव्हायडरची पाहणी करेन. नंतर जे नको आहेत ते काढून घेईन. त्याबाबत काही कारवाई झाली नाही.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त साहेब, आपले जे डिव्हायडर आहेत ते आपण काढून घेऊ या.

**प्रशांत केळूसकर :-**

मा. महापौर मॅडम, मा. आयुक्तांनी आमच्या वॉर्डमध्ये पाहणी केली आहे.

**मा. महापौर :-**

मी सांगितले ते आता काढून घेतील.

**राजेंद्र जैन :-**

जो डिव्हायडर बनाए गये तो अब सभासदो का ऑब्जेक्शन आया तो उसे निकालने की बात की गई पहला सवाल यह है की, अगर सभासदो की मंजुरी लेनी थी तो पहले क्यों नहीं ली गई। खर्चा जो किया वह कौन भूगतेगा। दुसरी बात इतने घटीया डिव्हायडर लगाए गए की हमारे सन्मा. काका ने भी ऑब्जेक्शन लिया था की वह घटीया लगाए है। हम जाँच करेंगे। मैंने उसकी वेबकॉस रिपोर्ट निकाली इसके रिपोर्ट में आप देखे क्या लिखा हुआ है। इसके रिपोर्ट में लिखा है की फिनीशिंग एक बार बन रहा है। तब का काम किया है, एक ही बारकी रिपोर्ट है फिनिशिंग फाऊंड सॅटीसफॅक्टरी उसके निचे लिखा है। अलायमेंट ऑफ पेव्हर ब्लॉक, साहब आपने खुदने देखा है, कैसे आढे तिरछे लगाए गए है। आपको दिख रहा है। दी अलायमेंट ऑफ पेव्हर ब्लॉक इज फाऊंड ओके. नो हेरलाइन क्रॅश. इतने मोटे-मोटे क्रॅश पडे है, अगर फोटो लेकर आऐंगे तो आपको दिखाऐंगे, मोटे-मोटे क्रॅश पडे है। No hairline इधर लिखा है। और लिखा है, oil paint or finishing उसको बहुत अच्छा फिनीशिंग किया हुआ है। जबकी उसको दुसरी बार थोडा ठिक करने की कोशीश की इतना घटीया काम किया है। और ॲक्सेस मटेरीयल अभी भर वहाँ तूटा हुआ पडा और इधर लिखा है, ॲक्सेस मटेरीयल क्लीन फ्रॉम द साईट. यह वेब कॉसकी रिपोर्ट है। आधार करते है, की पुरा पी.डब्ल्यू.डी. का काम अच्छा होता है। यह किलनी मॅनेज रिपोर्ट है, आप देखीए हमारे मेहता साहब ने बोला की, रि-ऑडीट की बात नहीं होती वैसे रि-डेव्हलपमेंट की। यह ऑडीट की रि-ऑडिट होनी जरुरी है। पुरी मॅनेज है। उसको ब्लॅकमेल

करना चाहिए। और नया पॅनल बनाना चाहिए कितनी मॅनेज रिपोर्ट है। और कितना काम मॅनेजमेंट तरीकेसे हो रहा है। यह नजर में लाने की बात है।

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, विषय छोटासा आहे. पण महत्वाचा आहे. छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर एक छत्रपती शिवाजी महाराज मार्ग मुख्य रस्ता त्या रस्त्यावर आडव्या अशा नाली पडल्या आहेत. त्या ताबडतोब बंद करायला पाहिजेत. आणि जिथे चेंबर्स आहेत. त्या चेंबर्सच्या बाजूची झाकण आहेत. त्यामध्ये गॅप आहे. त्याच्यात मोटर सायकलचे बरेच अॅक्सीडंट होतात. त्याच्यावर लक्ष देऊन ताबडतोब ते करायला पाहिजे.

**मा. महापौर :-**

करुन घेऊ.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, काशिमिरा रोडला रस्ता खोदायची परवानगी कोणी दिली. छत्रपती शिवाजी मार्ग हा मेन रोड आहे. त्याला खोदायची परमिशन कशी दिली. विदाऊट परमिशन घेतली आहे का? मागे पण सांगितले होते की, ह्याच्यावर परमिशन देऊ नका. साहेब त्यांनी परमिशन दिली.

**प्रशांत केळूसकर :-**

डिव्हायडर किती दिवसात काढणार?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, हा जो डक्ट आहे ना प्रत्येक ठिकाणी हा डक्ट करुन ठेवलेला आहे. एम.टी.एन.एल., रिलायन्स, टाटा साहेब त्याच्यामध्ये खूप प्रॉब्लेम होणार आहे.

**दिपक खांबित :-**

परवानगी दिलेली आहे. दोन ठिकाणी दिलेली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पूर्ण अख्खा रस्ता.

**दिपक खांबित :-**

चर्चच्या इकडे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

रिपेयरींग कधी करणार?

**दिपक खांबित :-**

आज रात्री.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

खोदून आठ दिवस झाले. ट्राफिकमुळे जाम होत. तरी साहेब ते अजून केले नाही.

**प्रशांत केळूसकर :-**

साहेब ते डिव्हायडर कधी काढणार.

**दिपक खांबित :-**

टप्प्याटप्याने काढून घेऊ.

**प्रशात केळूसकर :-**

म्हणजे टप्पा चालू कधी होईल.

**मा. आयुक्त :-**

मी त्याची स्वतः पाहणी केलेली आहे.

**प्रशांत केळूसकर :-**

साहेब, आपण पाहणी केली ते माझ्या निदर्शनास आले आहे.

**मा. आयुक्त :-**

मी स्वतः पाहणी केली. सन्मा. नगरसेवक माझ्या सोबत होते. मी त्यांना सांगितले आहे. कशा पध्दतीने काढावे. त्या पध्दतीने काढण्यात येईल.

**असेन्ला मेंन्डोंसा :-**

Madam, it's request. Whenever the dividers are removed please see to it that the road is rectified immediately.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

दि. २०/०२/२०१३ रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**रोहिदास पाटील :-**

विषय छोटा आहे. गटाराचे झाकण ह्या झाकणामुळे सर्वच नगरसेवकांची तक्रार आहे.

**मा. महापौर :-**

काका जे जुने कॉन्ट्रॅक्टर आहेत, त्यांना ब्लॅकलिस्ट केले आहे. मी नविन टेंडर काढायला सांगितले आहे. दोन-दोन दिवसात ते सगळे होऊन जाईल. कारण मिरा भाईंदरचाच प्रॉब्लेम झालेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

प्रत्येक येणारा बाहेरचा माणूस, चालणारा नागरीक हे मा. आयुक्तांच्या, मा. महापौराच्या नावाने विचारतात. तिकडचा लोकल जो नगरसेवक आहे.

**मा. महापौर :-**

मी स्वतः त्यांना सांगितले आहे, ते दोन दिवसात टेंडर काढतील आणि ते झाकण लावून घेऊ या.

**मदन उदितनारायण सिंग :-**

पान क्र. ३७, वर माझे विधान आहे. त्यानंतर संबंधीत विषयावर बरीच चर्चा झाली होती. पण काय कुठे आलेच नाही. विधानच गायब झाले आहे.

**नगरसचिव :-**

तपासून बघून घेतो.

**मा. महापौर :-**

तपासून घ्या.

**प्रभात पाटील :-**

३७ लोगोचा विषय होता त्याचे काय झाले?

**नगरसचिव :-**

फॉर्म आणले आहेत.

**मा. महापौर :-**

रजिस्ट्रेशनची प्रोसेस आता चालू करण्यात येईल. फॉर्म घेतले आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, पान नं. २५ वर आपण मार्केटचा ठेका द्यायचा होता त्याची निविदा काढली की नाही त्याची माहिती नाही. मच्छिमार्केट ज्या निविदा काढायच्या होत्या ठेक्याप्रमाणे त्या अजुनपर्यंत काढल्या नाहीत.

**दिपक खांबित :-**

साहेब, ११० स्वेअर मीटर जागा ज्यांची निघालेली आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

एका मार्केटच्या विषयी मी नाही सांगत मिरा भाईंदर पुर्ण मार्केट ठेका बेसीसने द्यायचे होते पुर्ण मिरा भाईंदरचे.

**दिपक खांबित :-**

तुम्ही कंस्ट्रक्शन बद्दल नाही बोलत लिलावा बद्दल बोलता.

**प्रेमनाथ पाटील :-**

तेच कधी करणार? ते विचारतो.

**दिपक खांबित :-**

ह्या महिन्यात ३१ तारखेपर्यंत करण्यात येईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, आता तो विषय काढतो. मच्छीमार्केटचे काय? ११० स्वेअर मिटरचे.

**दिपक खांबित :-**

आपण सर्व्हे केला तर ११० स्वेअर मिटर जागा खाजगी मालकाची निघाली आपण टी.एल. आर ला पत्र दिले आहे त्या मालकाने सांगितले की, रेडीरेकनर प्रमाणे पैसे द्या. आम्ही तुम्हाला जागा देतो ७/१२ तुमच्या नावावर करुन देतो. त्यानंतर आपण ते टी.एल.आर. कडे पाठवले आहे.टी.एल.आर कडुन सर्व्हे होऊन आला की, त्यांना पैसे द्यायचा विषय आणु पैसे दिल्यावर त्या मार्केटचे इस्टीमेट पुन्हा रिव्हाईज करायला लागेल. कारण तीन लाखाच्या वर आहे त्या मार्केटकरीता तरतुद केलेली आहे. त्याप्रमाणे पुन्हा टेंडर मागवुन ते काम करायला लागेल.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्यांचा मोबदला दिल्यानंतरच.

**दिपक खांबित :-**

मोबदला दिल्यानंतर.

**मा. महापौर :-**

पुढचा विषय घ्या.

**वंदना पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते, तो मार्केटचा विषय निघालेल्या त्या मार्केटच्या विषयावर गावकऱ्याचा आणि ह्यांच लेटरवर्क चाललेलं आहे. त्या विषयावर मला बोलायचे आहे त्याचं काय झालं? कशी काय जागा निघाली नकाशे आणि कागदपत्र सबमिट केले आहे का? त्याचा खुलासा करावा.

**दिपक खांबित :-**

ज्यांची जागा आहे त्याचे ७/१२ उतारे काढले म्हणुनच त्यांची पुढची प्रोसेस केली आणि जे सत्यनारायण मंदीर ट्रस्टने सांगितले की, आमची जागा आहे त्यांना २-३ वेळा पत्र दिले आहे. ते कुठलेच कागदपत्रं सादर करु शकले नाही त्यांची जागा नाहीच आहे ती. खारी स्मशान आणि बाकीची जागा ही तुकाराम भार्गव पाटील ह्यांच्या नावावर आहे.

**वंदना पाटील :-**

त्यांनी कागदपत्र सबमिट केले आहेत का?

**दिपक खांबित :-**

केले आहेत.

**वंदना पाटील :-**

त्यांनी नकाशे सबमिट केले आहेत का?

**दिपक खांबित :-**

केले आणि आपण टी.एल.आर कडे पाठवले आहे.

**वंदना पाटील :-**

*गावकऱ्यांनी काय पत्रव्यवहार केला आहे?*

**दिपक खांबित :-**

ती आमची जागा आहे म्हणुन.

**वंदना पाटील :-**

मग त्यांना तुम्ही काय उत्तर दिले?

**दिपक खांबित :-**

उत्तर काय त्यांना कागदपत्रं द्या म्हणुन त्यांनी कागदपत्र आपल्याकडे दिली नाहीत.

**वंदना पाटील :-**

त्यांना तसे लेटर पाठवले आहे का?

**दिपक खांबित :-**

त्यांनी आम्हाला कागदपत्र द्यायला पाहिजे आम्ही त्यांना उत्तर देऊ.

**वंदना पाटील :-**

तुम्ही त्यांचे पेपर मागवले तुम्ही गावकऱ्यांना पाठवायला पाहिजे होते गावकऱ्यांनी सांगितले की, ती जागा आमची आहे आणि.....

**दिपक खांबित :-**

गावकरी सत्यनारायण मंदीर ट्रस्ट ह्यांनी सांगितले ती आमची जागा त्यांना आम्ही पत्र दिले की तुमच्याकडे ...

**वंदना पाटील :-**

तीस वर्षापासुन खारी स्मशान भुमी, स्मशान भुमी दफन भुमी होती लहान मुलांची तेव्ही ते गावकरी जागे झाले नाहीत का? आज तिथे गरीब बायका, मजुर मच्छी विकतात आणि आज त्यांना देतात हे योग्य आहे का?

**दिपक खांबित :-**

ते मार्केट १९८६-८७ साली बांधलेले आहे ते आताचे नाही ते मोडकळीस आले म्हणुन रिनोव्हेशन करतो बाकी काहीच करत नाही. ते एक्झेस्टींग १९८६-८७ साली बांधलेले मार्केट आहे त्याचे आपण रिनोव्हेशन करतो.

**वंदना पाटील :-**

पण गावकऱ्यांनी त्याचा हक्क सांगितले आहे तर तुम्ही दोघानाही लेटर पाठवयाला पाहिजे होते.

**दिपक खांबित :-**

गावकी हा कन्सेप्ट आता राहीला नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, माझी अशी विनंती आहे की, मा. आयुक्त दालनामध्ये एक मिटींग बोलवा. संबंधीत नगरसेवक, गावकऱ्यांना आणि ह्यांना आणि ह्या विषयावर तोडगा काढा.

**प्रशांत दळवी :-**

एक शोकसभेचा प्रस्ताव होता त्यामध्ये नयना वसानीने शोकसभेचा प्रस्ताव मांडलेला आहे त्या जागी सीमा जैनचे नाव आलेले आहे.

**प्रकरण क्र. ०१ :-**

दि. २०/०२/२०१३ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ०१ :-**

दि. २०/०२/२०१३ रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.२, महिला व बालकल्याण समितीच्या योजना राबविण्यासाठी महिला व बालकल्याण समितीच्या कामकाजाबाबत अधिकार व कर्तव्य समितीला देणेबाबत. (दि. २१/०१/२०१३ रोजीच्या मा. महिला व बालकल्याण समितीने शिफारस केलेला ठराव क्र. ५)

**नरेंद्र मेहता :-**

मा. सचिव साहेब, मागे हा विषय आला होता आणि नियमाप्रमाणे कोणताही विषय तीन महिन्याच्या अगोदर येता कामा नये. माझ्या माहिती प्रमाणे मा. महापौरांनी ठराव मंजुर असे मतदान झाल्यानंतर सांगितले होते मग परत विषय कसा काय आला?

**नगरसचिव :-**

हा प्रस्ताव सदर महिला बालकल्याण समितीपुढे शिफारस करुन सचिव कार्यालयात आला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

पहिला कोणी केलेला?

**नगरसचिव :-**

हा शिफारशीचा ठराव आहे.

**नरेंद्र मेहता :-**

पहिला प्रशासनानी केला आणि आताही प्रशासनानेच दिला.

**नगरसचिव :-**

हा समितीकडुन आलेला आहे समितीने शिफारस केली आहे समितीने शिफारस केलेला ठराव आहे.

**नरेंद्र मेहता :-**

माझे म्हणणे आहे समितीने कोणाकडे दिला असेल प्रशासनाकडे ना?

**नगरसचिव :-**

डायरेक्ट सचिवाकडे येतो.

**नरेंद्र मेहता :-**

पहिला आयुक्तांनी कोणाकडे दिला?

**नगरसचिव :-**

सचिवाकडे.

**नरेंद्र मेहता :-**

मग एकदा त्याच्यावर निर्णय झाला आहे तीन महीने झाले नाही परत तुम्ही प्रस्ताव का देता दुसरी गोष्ट मा. महापौर मॅडम त्याच्यावर निर्णय आहे बहुमतानी मंजुर मग परत विषय कशाला?

**नगरसचिव :-**

जो मागचा ठराव झालेला आहे तो बहुमताने झाला असेल परंतु त्याला आवश्यक मतदान लागते.

**नरेंद्र मेहता :-**

ते बहुमताने आणि मा. महापौरांनी निर्णय दिले आहे त्या रुलींगचे काय? मंजुर म्हटले आहे ना?

**नगरसचिव :-**

२/३ बहुमताने ठराव मंजुर कारवाई होत नाही,

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, त्या प्रोसिडींगमध्ये आले आहे की, हा ठराव मंजुर. मग त्याचे काय झाले आपण विखंडीत केले की रद्द केलं काय केलं त्याचे काय झाले

**नगरसचिव :-**

त्याच्यावर काही कारवाई झाली नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मग तुम्ही आज माहिती द्यायला नको का? की असा असा विषय आहे तो ठराव मंजुर झाला होता पण मंजुर प्रमाण अशी अशी संख्या पाहिजे म्हणुन ते वैध धरता येणार नाही काहीच नाही ना.

**नगरसचिव :-**

मी आत्ता देतो.

**नरेंद्र मेहता :-**

काय देता?

**नगरसचिव :-**

हा ठराव मंजुर करणार कुठच्याही समितीला अधिकार द्यायचा असेल तर ३० कलम..

**नरेंद्र मेहता :-**

मी तसे नाही बोलत, सभागृहामध्ये तो विषय आला होता मा. महापौरांनी त्याच्यावर निर्णय दिला बहुमताने मंजुर आता तुम्हाला वाटते की, टेक्नीकली बरोबर नाही. जो मंजुर झालेला तर शासनाला विखंडीत करायला पाठवला का? किंवा मा. आयुक्तांनी त्याच्यावर त्याचा अभिप्राय किंवा सचिवांनी हे मंजुर करता येणार नाही किंवा हा गृहीत धरता येणार नाही मग तुम्ही आज विषय आणता त्याचा उल्लेख करायला नको की, मागच्या वेळी असा ठराव झाला होता तो ठराव गृहीत धरता येणार नाही असे म्हणायला नको.

**नगरसचिव :-**

सभागृहात सांगताना सांगतो विषयाला सुरुवात..

**नरेंद्र मेहता :-**

सचिवांना खर म्हणजे विचारायचे नसते हे मी विचारतो म्हणुन सचिवांचा ह्याच्यात काय संबंध तुम्ही देताना ह्याच्यात काही माहिती दिली नाही.

**नगरसचिव :-**

शिफारस केलेली आहे असे म्हटलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मागचा ठराव विखंडीत झाला.

**नगरसचिव :-**

त्याच्यावर कारवाई चालु आहे.

**नरेंद्र मेहता :-**

काय झालं काय?

**नगरसचिव :-**

त्याच्यावर कारवाईच नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय, ह्या सभागृहातुन ठराव तुमच्याकडे दिलेला आहे. त्याच्यावर अंतिम निर्णय काय झाला म्हणजे ईट इज पेंडींग लाईक दिस ओनली असाच पेंडींग आहे त्याच्यात आपण निर्णय द्यायला पाहिजे. हा गृहीत धरता येणार नाही, कॅन्सलेशन किंवा विखंडीत काय?

**नगरसचिव :-**

तो ठराव आवश्यक ती २/३ संख्या नसल्यामुळे तो कारवाईसाठी प्रशासनाने पाठविलेला नाही.

**नरेंद्र मेहता :-**

त्या दिवशी ऐकले असते तर आज मला बोलायला लागले नसते पण ते नामंजुरच आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महिला बालकल्याण समिती गठीत करण्यात आलेली आहे. मा. महिला व बालकल्याण समिती द्वारे शहरातील महिला व बालकांसाठी शासनाकडून जाहिर झालेल्या अतिमहत्वाच्या विविध योजना राबविल्या जात आहेत. महिला व बालकल्याण समितीद्वारे राबविल्या जाणाऱ्या विविध योजना तसेच उपक्रमासाठी सद्यस्थितीत मा. महासभेपुढे विषय घेऊन प्रशासकीय व आर्थिक मान्यता घेण्यात येते. यामुळे एखाद्या प्रस्तावावर तात्काळ निर्णय घ्यावयाचा असल्यास महिला व बालकल्याण समितीपुढे निर्णय घेता येत नाही तसेच काही योजना, उपक्रमासाठी शासनाकडून वेळ मर्यादा घालून दिलेली असते. अशा योजना उपक्रमावर त्वरीत निर्णय घेणे आवश्यक असते. मा. महासभेपुढे मान्यता घेणेच्या प्रक्रियेमुळे महत्वाच्या योजना, उपक्रम राबविणेसाठी तात्काळ निर्णय न होता विलंब होतो. करीता मा. महिला

व बालकल्याण समितीस प्रशासकीय व आर्थिक मान्यतेचे संपूर्ण अधिकार दिल्यास समितीच्या निगडीत प्रस्तावांवर तात्काळ निर्णय होऊन योजना, उपक्रम विनाविलंब राबविले जातील.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९, चे प्रकरण २ नियम ३०(२) नुसार महानगरपालिकेस, ठरावाद्वारे आपले अधिकार व कर्तव्ये यापैकी कोणतेही अधिकार व कर्तव्ये विनिर्दिष्ट केलेल्या विशेष समित्यांकडे प्रत्यायोजित करता येतील अशी तरतुद आहे.

मा. महिला व बालकल्याण समितीने आर्थिक व प्रशासकीय अधिकार देण्यासाठी मा. महासभेस शिफारस केलेले आहे. त्यानुसार ह्यापुढे महिला व बालकल्याण समितीचे सर्व प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मंजुरीचे अधिकार मा. महिला व बालकल्याण समितीस ही महासभा देत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**शरद पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महिला बालकल्याण समिती गठीत करण्यात आलेली आहे. मा. महिला व बालकल्याण समिती द्वारे शहरातील महिला व बालकांसाठी शासनाकडून जाहिर झालेल्या अतिमहत्वाच्या विविध योजना राबविल्या जात आहेत. महिला व बालकल्याण समितीद्वारे राबविल्या जाणाऱ्या विविध योजना तसेच उपक्रमासाठी सद्यस्थितीत मा. महासभेपुढे विषय घेऊन प्रशासकीय व आर्थिक मान्यता घेण्यात येते. यामुळे एखाद्या प्रस्तावावर तात्काळ निर्णय घ्यावयाचा असल्यास महिला व बालकल्याण समितीपुढे निर्णय घेता येत नाही तसेच काही योजना, उपक्रमासाठी शासनाकडून वेळ मर्यादा घालून दिलेली असते. अशा योजना उपक्रमावर त्वरीत निर्णय घेणे आवश्यक असते. मा. महासभेपुढे मान्यता घेणेच्या प्रक्रियेमुळे महत्वाच्या योजना, उपक्रम राबविणेसाठी तात्काळ निर्णय न होता विलंब होतो. करीता मा. महिला व बालकल्याण समितीस प्रशासकीय व आर्थिक मान्यतेचे संपूर्ण अधिकार दिल्यास समितीच्या निगडीत प्रस्तावांवर तात्काळ निर्णय होऊन योजना, उपक्रम विनाविलंब राबविले जातील.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९, चे प्रकरण २ नियम ३०(२) नुसार महानगरपालिकेस, ठरावाद्वारे आपले अधिकार व कर्तव्ये यापैकी कोणतेही अधिकार व कर्तव्ये विनिर्दिष्ट केलेल्या विशेष समित्यांकडे प्रत्यायोजित करता येतील अशी तरतुद आहे.

उपरोक्त तरतुदीनुसार मा. महिला व बालकल्याण समिती निगडत सर्व प्रस्ताव यापुढे प्रशासकीय व आर्थिक मान्यतेसाठी मा. महासभेपुढे न घेता, मा. महिला व बालकल्याण समितीमध्ये घेण्यात यावा यासाठी मा. महासभेपुढे शिफारस केलेले आहे.

सदर विषय मा. महासभा फेटाळत आहे असे ठराव मांडत आहे.

**वर्षा भानुशाली :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २ करीता दोन ठराव आलेले आहेत पहिला ठराव सुचक ध्रुवकिशोर पाटील अनुमोदन जुबेर इनामदार, दुसरा ठराव सुचक शरद पाटील अनुमोदन वर्षा भानुशाली अनुक्रमे दुसरा ठराव मी मतदानास टाकतो.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, विरोधी पक्षनेत्यास विनंती आहे मी मागच्या वेळेला पण बोलली होती आणि आजपण बोलते की, महिलांची धोरणं आहेत महिलांचे उपक्रम आहेत त्याच्यामध्ये बालकाचे स्वास्थ्य आणि विकास आहे अशा योजनसाठी पुन्हा एकदा सांगते मन मोठ करा आपण जर एक संधी दिली तर त्या संधीचे नक्कीच सोन होईल आपलेही सदस्य त्याच्यामध्ये आहे. संपुर्ण शहराचा प्रश्न आहे आपण सगळ्याच गोष्टी बोटावर मोजल्या किंवा संख्याबळ काऊंट केले तर होणार नाही. तर पुन्हा एकदा तुम्हाला रिक्वेस्ट आहे की, मन मोठे करा.

**नरेंद्र मेहता :-**

प्रभात ताई मी आपल्या मताशी सहमत आहे. तरी मागच्या वेळेला मा. आयुक्तानी संभाषण केले होते की, महिला बालकल्याण समिती आर्थिक, प्रशासकीय मान्यता नाही. डायरेक्ट निविदा काढली होती. मा. आयुक्तांनी खेद व्यक्त केला की, हे चुकीचे झाले. ह्यापुढे होणार नाही. मी असे नाही बोलत की, महिला बालकल्याण समितीमध्ये चांगला निर्णय घेता येईल. आणि ह्यासाठी आपण तीन दिवसांची विशेष सभा लावा. तरी आम्ही येवू आणि ताबड़तोब मान्यता देऊ. अशी मी विरोधी पक्ष नेता म्हणून ग्वाही देतो.

**नगरसचिव :-**

दुसरा ठराव प्रथम मतदानास टाकतो, सुचक शरद पाटील, अनुमोदक वर्षा भानुशाली ह्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी आहेत का. पहिला ठराव सुचक ध्रुवकिशोर पाटील, अनुमोदक जुबेर इनामदार. ह्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी आहेत का. ठरावाचे मतदान मी मा. महापौराना देतो.

**मा. महापौर :-**

सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४८, विरोधात ४२, तटस्थ कोणी नाही. इतकी मते पडलेली आहेत. श्री. ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यात येत आहे. ह्या २/३ ची आय डू अंडरस्टँड यू नीड ऑफ मेजॉरीटी ऑफ २/३.

**नरेंद्र मेहता :-**

बहुमताने मंजूर?

**मा. महापौर :-**

हो ठीक आहे. पुढे ऐका तरी.

**नगरसचिव :-**

कलम ३० प्रमाणे महिला बालकल्याण समितीला कोणतेही अधिकार द्यायचे असतील तर त्याच्या बाजूने २/३ सदस्य संख्या असावी लागते. २/३ सदस्य संख्येप्रमाणे ५९ संख्या पाहिजे होती. तशी संख्या नसल्यामुळे ठराव कार्यन्वीत करता येणार नाही.

**नरेंद्र मेहता :-**

ह्याच्यावर रुलिंग कोण देणार?

**नगरसचिव :-**

मॅडम देणार.

**नरेंद्र मेहता :-**

मग त्यांना सांगा.

**नगरसचिव :-**

मी माझे मत सांगीतले.

**मा. महापौर :-**

तुम्हाला एवढी घाई कशाला. एक मिनीट थांबा तरी. पुढे ऐका. तुम्ही खूप ज्ञानी आहात. यू नो ऑल रुल्स अ‍ॅन्ड रेग्यूलेशन्स. आम्हाला पण माहिती आहे. आम्हाला पण थोडे बोलू द्या.

**हेलन जॉर्जी :-**

सन्मा. मेहता साहेब, तुम्ही महिलांच्या विरोधामध्ये बोलता. हे चूकीचे आहे. महिलांच्या प्रश्नांवर तरी राजकारण नको आहे.

**मा. महापौर :-**

बहुमताने २/३ लागते. म्हणून हे मंजूर होत नाही असे सांगत आहे.

**(सदरचा ठराव फेटाळण्यात आला.)**

**नरगसचिव :-**

प्रकरण क्र. ३, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण क्रमांक २, नियम ५ (२) (ब) अन्वये तसेच महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेवर पाच नामनिर्देशित पालिका सदस्यांची नियुक्ती करणे. प्रकरण ३ मागे घेण्यात येत आहे.

**(सदरचा ठराव मागे घेण्यात आला.)**

**नरगसचिव :-**

प्रकरण क्र. ४, महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्यापूर्वी कच्चे पक्के नाले सफाई / खोदाई अंतर्गत येणाऱ्या कामाच्या प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात महानगरपालिकेच्या क्षेत्रातील कच्चे / पक्के नाले सफाई, खोदाई करणे, गाळ / माती वाहतुक करणे आदी कामे पावसाळ्यापूर्वी करणे कामी भाड्याने जे.सी.बी., पोकलन, बोटपोकलन मशिन, हायड्रा मशीन, क्रेन, डंम्पर, टोरस तसेच इमारतीच्या प्रवेश द्वाराजवळ तसेच रोड क्रॉसिंग करुन पावसाच्या पाण्याचा निचरा करणे कामी विविध व्यासाचे आर.सी.सी. पाईप आवश्यकतेनुसार खरेदी करणे, कच्चे / पक्के नाले सफाई करण्यासाठी कंत्राटी मजुर घेणे त्याचप्रमाणे शहरामध्ये काही ठिकाणी अति सखल परिसर असुन त्या ठिकाणी पावसाळ्या दरम्यान थोडा फार पाऊस झाल्यास त्या परिसरातील नागरी वसाहतीतील घरात व इमारतीमध्ये पावसाचे पाणी शिरुन नागरीकांची गैरसोय होत असते. अशाठिकाणी कायमस्वरुपी पावसाच्या पाण्याचा उपसा करणे कामी विविध क्षमतेचे संक्शन पंप ठेवण्यात यावे. याकरीता निविदामध्ये मासिक दर मागविण्यात यावे व अन्य ठिकाणाकरीता प्रती तासाप्रमाणे दर मागविण्यात यावे जेणेकरुन पावसाळ्यात नागरीकांची गैरसोय होणार नाही. वरील कामाच्या निविदा मागविण्यास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत असून सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील वॉर्ड सफाई / नाले सफाई या लेखाशिर्षातील तरतुद अपुरी पडल्यास या कामी आरोग्य व सोयी तसेच रुग्णालये व दवाखाने अंतर्गत असलेल्या लेखा शिर्षातील शिल्लक तरतुदीतून पुर्नःविनियोजन करण्यास ही सभा मान्यता देत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत महानगरपालिका क्षेत्रातील एकात्मीक

नाले बांधणे ह्या योजनेअंतर्गत नाले बांधकाम करणेकामी ज्या नाल्यांचे बांधकाम करण्याचे कार्यादेश देण्यात आले आहेत त्या नाल्याची सफाई व खोदाई करुन निघालेला गाळ, माती, वाहतुक करणे तसेच नाल्याचा प्रवास सुरळीत करणे इत्यादी कामे संबंधीत ठेकेदाराकडुन करुन घेण्यात यावी. सदरची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण होतील ह्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने दक्षता घ्यावी.

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षातील नाले सफाई खोदाई करणेकामी झालेल्या खर्चास ही सभा कार्योत्तर आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे. ठराव वाचून कायम करण्यात येत आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

सुचना आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

मला विचारायचे आहे की, पाच वर्षामध्ये एम.एम.आर.डी.ए.ने पक्के नाले, कच्चे नाले केले. ते किती टक्के केले आहेत. किती टक्के बाकी आहेत. आतासुध्दा ह्या पाच वर्षानंतर सुध्दा नाल्याचे बांधकाम आणि सफाई करायचे बाकी आहे. ह्याचा मला पुरावा पाहिजे. एम.एम.आर.डी.ए. कडून किती टक्के नाले बांधकाम झाले, किती बाकी आहे. दरवर्षी हा खर्च आपल्याला करायला लागतो. का करायला लागतो. एम.एम.आर.डी.ए. काय करते.

**दिपक खांबित :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो, एम.एम.आर.डी.ए. ने आजपर्यंत आपल्याला कुठलेच नाले बांधून दिले नाहीत. नाल्याकरता फक्त लोन दिले होते. महाराष्ट्र सूवर्ण जयंती नगरोत्थान अभियान जी योजना आहे. त्यामध्ये महासभेने २८९ कोटीच्या प्रोजेक्टला मंजूरी दिली होती. त्यापैकी शासनाने आपल्याला १७८ कोटी मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार आपण एकूण १५ नाल्याची कामे सुरु केली आहेत. आणि ती चालू आहेत. जवळ-जवळ १८ कि.मी. चे ते नाले आहेत.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

आपल्याकडे नाले किती आहेत.

**दिपक खांबित :-**

आपल्याकडे ५४ कि.मी. नाले आहेत. नाले आणि गटारे १०० कि.मी.च्या वरती आहे. म्हणजे मोठे नाले ते ५४ कि.मी. च्या वरती आहेत.

**सुहास रकवी :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो. वॉर्ड क्र. २८ मध्ये बेकरी गल्लीमध्ये नाल्याकरीता एक टेंडर काढले होते. त्याचे पुढे काय झाले ते कळल नाही. आणि पावसाळ्यात प्रामुख्याने भाईंदर पश्चिमेला बेकरी गल्लीतच असते. त्यामुळे नागरिकांना नेहमी लाईट बंद करा. त्याच्याकरीता आपण काय केले.

**दिपक खांबित :-**

२२ नाल्याची मंजूरी घेतली होती. त्यापैकी १५ नाल्याची वर्क ऑर्डर देऊन काम सुरु केले सात जे नाले आहेत ते जय श्री. एन्टरप्राईज म्हणून कंपनी आहे त्यांनी हे टेंडर भरले होते. दोन महिन्यांपूर्वी मुंबई महापालिकेने काही ठेकेदारांना तक्रारीवरुन ब्लॅकलिस्ट करायची कारवाई सुरु केली होती. म्हणून आपण बी.एम.सी. ला पत्रव्यवहार केला की, ह्याची नक्की पार्श्वभूमी काय आहे. तुम्ही ह्यांना ब्लॅकलिस्ट करायला का घेतल आहे.

**सुहास रकवी :-**

ते बरोबर आहे. पण आता उपाययोजना काय?

**दिपक खांबित :-**

बी.एम.सी. चे कालच पत्र आलेले आहे. आम्ही त्या ठेकेदाराला सर्व कागदपत्र घेऊन शनिवारी बोलवले आहे. शनिवारी एकदा शहानिशा करु.

**सुहास रकवी :-**

संबंधीत काम सुरु कधी होणार आहे.

**दिपक खांबित :-**

शनिवारी डिसीजन होईल, आणि त्यानंतर पुढच्या कामांना .....................

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौराच्या प्ररवानगीने बोलतो, आमच्या पूर्वेस अंडरग्राऊंड ड्रेनेजचे काम पावसापूर्वी चालू करणार होते. त्याचे काय झाले. मॅडम, पावसापूर्वी गटाराच्या साफसफाईचा विषय आहे. आता झाकणाचा मोठा विषय आहे.

**मा. महापौर :-**

मी आता बोलली ना. झाकणाचे टेंडर ह्या २-३ दिवसात करु.

**अनिल भोसले :-**

*मा. महापौराच्या परवानगीने बोलतो, हायवे पट्ट्यामध्ये २६ जुलैला ९ लोक मेली होती.* म्हणून आपण बांधकाम विभागाला तीन महासभेत विनंती केली होती. अनेक ठेकेदार ब्लॅकलिस्टेड आहेत म्हणून, मांडवी पाड्याच्या नाल्याचे काम चालू झाले नाही. गावठणमध्ये नाल्याचे काम सुरु झाले नाही. २६ जुलैला ९ लोक मेली होती. कमिशनर साहेब सुध्दा आले होते. त्या नाल्याचे काम सुरु होत नाही ते कधी होणार त्याचे ठोस उत्तर देतात का?

**मा. महापौर :-**

ते बोलले ना शनिवारी बोलवले आहे. आणि शनिवारी डिसीजन झाल्यावर कामाला सुरुवात होईल.

**अनिल भोसले :-**

ठीक आहे.

**रोहिदास पाटील :-**

नाले सफाईच्या टेंडरला आपण मंजूरी दिली तर काय अडचणी यायचे कारण नाही. काम करायला पाहिजे. हे जे खाडीकडे नाले आहेत. आपण शहरातले नाले साफ करतो. खाडी जवळचे जे बॉटल नेक आहे. मूर्धा खाडीवरचा, नवघर खाडीवरचा आहे. पुढचे काम होत नाही. आपण मागे साफ करतो, पूढे होत नाही. त्याची लेवल डाऊन होत नाही. कारण नसताना पूर परिस्थती तयार होते. ह्याचे काय प्रोव्हिजन केले आहे की नाही केले. परत तुम्ही सी.आर.झेडचे काम सांगाल तिकडे कोट्यावधी रुपये निघून जातील. पाणी बाहेर जाणार नाही. तुमचा प्रोग्रॅम काय आहे तो नक्की सांगा. सर्व सभासदांना त्याची माहिती मिळेल.

**मर्लिन डिसा :-**

*मॅडम, माझ्या प्रभागात एस.के.स्टोन ते सिध्दार्थ नगरपर्यंतचा नाला कधी सुरु होणार ते खांबित* साहेबांना सांगितले तर तिकडे झाड कापायचे आहे म्हणून सांगितले आहे. वेन विल इट स्टार्ट.

**मा. महापौर :-**

वर्क ऑर्डर दिलेली आहे. केबल शिफ्टींगचे काम चालू आहे. ते झाल्यावर तुमचे काम सुरु होईल.

**मर्लिन डिसा :-**

बट धिस इज फॉर द पास्ट २० प्लस डेज.

**मा. महापौर :-**

मे पर्यंत सुरुवात होईल.

**वंदना पाटील :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलते. अंडरग्राऊंड गटाराचं काम, इस्टला केबिन रोड, सरस्वती रोड ह्यासाठी मी गेल्या पाच वर्षासाठी कामाची ठेके मंजुरी पण घेतलेली. महासभेत पण बोललेली दर वर्षी मी वाकोडेसाहेबांना लेटर देते. आणि दरवर्षी पावसानंतर चालू करणार. पावसाळा येतो जातो. पण काम होत नाही. गेली १५ वर्षे झाली त्या रोडला एकही रुपया खर्च केला नाही असे का? तिथे सरस्वती शाळा आहे. तिथे शाळेत मुल शिकतात, एवढे खड्डे पडले आहेत.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, वंदना पाटीलनी जो प्रश्न विचारला त्या प्रश्नाबाबतच आहे. केबिन रोड हा प्रत्येक वेळेला भरत असतो. करोडो रुपयाचे नुकसान लोकांचे होत असते. सगळ्या ठिकाणी शाळा आहेत. शाळेतून *जाणाऱ्या मुलांना तिकडून जाता येत नाही. गूडघाभर पाणी असते. त्याच्यासाठी मुख्य कल्वर्ट करुन* करोडो रुपये खर्च केला आहे. पण तो करोडो रुपये खर्च करताना कल्वर्टच्या मध्ये जो डिस्टन्स आहे. त्या डिस्टन्सच्या तिथपर्यंत जायला रस्ता पूर्ण झालेला नाही. आणि तो त्वरीत करावा. जर ते नाही केल तर पूर परिस्थिती केबीन रोडवर उपस्थित होईल. मधला जो पॅसेज आहे तो खोदून पूर्ण केला तर बहुतेक त्याचे पाणी जाईल. त्याचा खुलासा बांधकाम विभागाने करावा.

**मा. महापौर :-**

मी मा. आयुक्तांना सांगितले आहे. मा. आयुक्त स्वतः तिथे येतील आणि बघून घेतील. सर्वांनी बसून घ्या. ठराव ऑलरेडी मांडलेला आहे.

**प्रभात पाटील :-**

लक्षवेधीच्या संदर्भात मी बोलले आणि मी पत्र पण दिले आहे. सर्वात जास्त काम इंद्रलोक मध्ये चालली आहेत. मोठ्यात मोठे नाले तिथे बनतात. हे राहीलेले १५ आणि पुढचा एक महिना ह्या पिरेडमध्ये काम संपतील की नाही मला शंका आहे. कारण आता आम्ही फेज २ पासून फेज ४ पर्यंत जातो ना तर असे वाटते की बैलगाडीत बसून चाललो आहेत असे वाटते.

**मा. महापौर :-**

मी वाकोडे साहेबांना गेल्या हफ्त्यातच सांगितले की, जेवढ्या लवकर होईल मला एक डेडलाईन द्या की, कधी ही काम स्टॉप होऊन रस्त्याची काम स्टार्ट होणार आहेत. कारण मी जेव्हा फिरते. लोक माझ्याकडे तक्रार घेऊन येतात. मी ऑफिसला बसली तरी लोक ह्याच तक्रारी घेऊन येतात. त्यादिवशीच मी वाकोडे *साहेबांना त्या दिवशीच बोलली आहे की कुठेतरी तुम्ही आता स्टॉप करा आणि रस्त्याची कामं स्टार्ट करा*

मलाच स्वतःला शहर कुठेतरी कपडे कापले आहेत तसे आपले भाईंदर शहर झाले आहे मला स्वतःला भाईंदर शहर झाले आहे मला स्वतःला भाईंदर शहर बघुन कसं तरी झालं आहे सर्वांनी बसुन घ्या ठराव मांडलेला आहे.

**मोहम्मद कुरेशी :-**

सुचना करायची आहे माझ्या प्रभागात गटरचे काम चालु करण्यासाठी टेंडरींगपण झाले कॉन्ट्रॅक्टरला कॉन्ट्रॅक्टपण देण्यात आलेले आहे. पण तिथे एक जुनी बिल्डींग आहे ती बिल्डींग इललिगल असताना महापालिकेने त्याच्यावर कारवाई करुन तोडण्यात आली होती. त्या पर्टीक्युलर पॉईटवर कॉर्पोरेशननी त्यांना सी.सी. दिले आहे. मा. कमिश्नर साहेबांनी सुध्दा आमच्या गटनेत्यांबरोबर इन्स्पेक्शन केले आहे. मॅडम, असा विषय आहे की, तो गटर खुप इम्पोंटंट आहे आणि वेळेवर चालू केले नाही तर ते पावसापर्यंत संपणार नाही आणि तिथे भरपुर त्रास होण्याची शक्यता आहे पण त्याच्यामध्ये एक अडचण आलेली आहे की, जेव्हा आपण खांबित साहेबांशी बोलतो किंवा कन्सर्न डिपार्टमेंटला काम चालु करण्याबाबत तर नगररचनाकडुन त्यांना अहवाल पाहिजे आता हे इंटर डिपार्टमेंटल प्रॉब्लेम असल्यामुळे तिकडचे काम चालू होत नाही. कॉन्ट्रॅक्टर कधी सामान टाकतो कधी परत घेऊन जातो जर अशीच परिस्थीती राहीली तर ते काम कधी चालू होणार, कधी बंद होणार.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्तांना मी सांगते की, पावसा अगोदर सर्व नाले, जिथे पण रोड खोदलेले आहेत आपले एस.टी.पी. ची काम चालु आहेत ते एन्ड ऑफ द मन्थला स्टॉप करुन रोड, पॅचवर्क स्टार्ट करा.

**दिनेश जैन :-**

मा. महापौर मॅडम, एक सुचना आहे, मिरारोड मध्ये जी जाफरी खाडी आहे ती संपुर्ण मिरारोडच्या आतमधुन निघाली आहे तिकडे मच्छरचा खुप त्रास आहे. त्याला अजुनपर्यंत कधीही साफ केले नाही. तो एका वॉर्डचा प्रॉब्लेम नाही तर तो संपूर्ण मिरारोडचा प्रॉब्लेम आहे हा नाल्याचा विषय आहे म्हणुन मी बोलतो जाफरी खाडीला साफ केले तर मच्छर पण कमी होईल पावसामुळे मिरारोडमध्ये जो त्रास आहे तो पण कमी होणार.

**संदीप पाटील :-**

मा. महापौर मॅडम, राई मुर्धा, मोर्वा ज्या खाड्या आहेत त्या खाड्यांमध्ये अशी परिस्थीती आहे की, त्या खाड्यांमध्ये जो गाळ साचलेला आहे त्याच्यामुळे ड्रेनेजचे सांडपाणी समुद्रापर्यंत जात नाही समुद्रापर्यंत जाण्यासाठी पहिल्या खाड्या खोदा मी मा. आयुक्तांच्या नावावर तीन पत्र दिली होती ह्या खाड्या लगतचे नाले आहेत ते साफ करा ते साफ केल्यानंतर गटाराचे जे पाणी येते त्याचा चांगल्याप्रकारे निचरा होईल ह्या प्रश्नाचे मला उत्तर पण मिळाले नाही ह्याचा जरा खुलासा करुन घ्या.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, मागच्या वेळेला आपण २२ कोटीवरुन ३८ कोटीला नाले साफसफाईला दिले. ॲडजेस्टींग नाले आहेत त्याच्या ठेकेदारांनी त्या-त्या भागातले साफ करायचे. १२ करोडचे ते १४ करोड वाढ करुन दिली आहे. मा. आयुक्त महोदय, मेजॉरीटी आतापर्यंत नाला सफाई म्हणजे ज्या भागात कंस्ट्रक्शन झालेले नाही तिकडे मातीचा भराव होतो तो भराव आपण काढत असतो त्याच्या व्यतिरीक्त काही होत नाही. खाली प्लॉटवर फिलींग केली तिकडे माती आपण काढत असतो आता आपण शहरात बघितले तर २० फुट, ३० फुट, ४० फुट रुंदीचे हे नाले दिसतात पण जिकडुन शेवटी पाण्याचा निचरा होतो ती जाफरी खाडी असु द्या, राई, मुर्धा, मोर्वा असु द्या ह्या शहराचे पाणी तिकडुन खाडीत जात असते ते नाले आपण बघितले तर पाच फुटाचे राहीले आहेत. त्यामध्ये पूर्वी दोन बोटी यायच्या, एक यायची आणि एक जायची ह्या प्रकारे ती खाडी होती. आतापर्यंत जेवढ्या निविदा काढण्यात आलेल्या आहेत त्यामध्ये कधीपण त्या खाडीचा समावेश करण्यात आला नाही मग तुमच्याकडे तरतुद नसते, ठेकेदारानी निविदा भरलेली नसते. म्हणून त्याची साफसफाई कधी होतच नाही. मला मॅडम सांगायचे आहे सुचना अशी आहे की, खाडीचा जो पण काही खर्च असेल त्याला आर्थिक प्रशासकीय मान्यता द्यावी ती ही साफसफाई करुन घेण्यात यावी. मॅडम, ही खाडी साफ होत नाही म्हणून रिव्हर्स वॉटर येत नाही. शिलोत्र्यांचे मीठ पिकत नाही आणि मॅंग्रोज डे बाय डे का वाढले त्याचे मुळ कारण हाच की, पाणी ज्या वेळेला येतो तो रिव्हर्स जायला भेटत नाही तिकडे तुंबून राहतो त्यामुळे सी.आर.झेड डे बाय डे वाढलेले आहे. महानगरपालिकेपर्यंत मॅंग्रोज आलेले आहेत. आज ३५ टक्के डेव्हलपमेंट झाली आहे ६५ टक्के सी.आर.झेड मॅंग्रोज होऊन जाईल. साहेब, ह्यावेळेला आपल्याला विनंती अशी आहे की, इकडने जायला जागा नाही तुम्ही त्या खाडीच्या टोकापासुन कारण पोकलन आणि बोट उतरु शकत नाही कारण पाच फुटचे झाले आहे. त्या खाडी साईडने उतरवले तर तुम्हाला रिव्हर्स त्यामध्ये पाणी वाहून तिथपर्यंत येता येईल ते केल्याशिवाय मॅडम, पाण्याचा निचरा कधी होत नाही. मग जाफरी खाडी, राई असु द्या मुर्धा, मोर्वा सन्मा. शरद पाटील जी ने आणि वंदना पाटील जीने जो मुद्दा मांडला तो पाणी कल्वर्टच्या माध्यमाने वेस्टला येणार. वेस्टच्या माध्यमातुन राई, मुर्धा, मोर्वा खाडीतुन त्याचा निचरा होणार आहे आपल्याला विनंती राहील की, आपण स्वतःहून त्याची पाहणी करावी त्यामध्ये एक सुचना मांडत आहे तसेच तुम्ही इस्टीमेटमध्ये हे घेतलेले का?

**मा. महापौर :-**

सर्व घेतलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

माझ्या माहितीप्रमाणे घेतले नाही. घेतले असेल तर ठिक आहे आमचे काही म्हणणे नाही मग सुचना मांडत नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्याच्यामध्ये घेऊ.

**नरेंद्र मेहता :-**

घेणार ना मा. महापौर मॅडम, ज्या नाल्याचे काम आपण दिलेले आहे ते सहा महिन्याच्या आत केले नाही तर त्याची निविदा काढु नये त्याने पक्क बांधावे एखादे त्याच्याकडुन नाही झाले तर...

**मा. महापौर :-**

तुमची सुचना घेण्यात येत आहे. पुढचा विषय घ्या.

**रोहीदास पाटील :-**

चांगला विषय सांगतो ऐकुन तरी घ्या नाहीतर नका घेऊ तुम्ही चांगली सुचना घेत नाही का?

**मा. महापौर :-**

त्यांची सुचना घेतली ना त्याच्यात तुम्हाला काय सुचना द्यायची आहे ती द्या.

**रोहिदास पाटील :-**

त्याच्यात सगळं बरोबर आहे जेव्हा जाफरी खाडीचा विषय आला जाफरी खाडीची केरींग कॅपेसिटी जे दोन स्लॅब आहेत त्याच्यातुन तेवढंच पाणी जाते.

**मा. महापौर :-**

तुमची सुचना घेण्यात येत आहे.

**रोहिदास पाटील :-**

जाफरी खाडीच्या पलिकडे दहिसर आणि मिरारोड आपली नैसर्गिक जी खाडी येते दोनही बाजूने खाडी आहे. आपल्या हद्दीमध्ये जसे आपण कलवर्ट करायला ५-७ वर्षे मेहनत केली रेल्वे ब्रीजला आणखी एक कलवर्ट झाल तरच पाण्याची लेवल कमी होऊ शकेल अन्यथा आपण सफाई करत राहु. शांती नगरची जी लो लेवलची लोक आहेत ती दरवर्षी बुडतच राहतील. सुचना एवढीच आहे पुन्हा सर्व्हे व्हावा. दहिसर आणि मिरारोड अशी खाडी टर्न होते तिथे शॉट डिस्टन्स आहे जर रेल्वेची परमिशन घेऊन केले तर तेच आपल्याला फायदेशीर पडेल अशी माझी सुचना आहे.

**मा. महापौर :-**

पुढचा विषय घ्या.

**राजेंद्र जैन :-**

कार्यप्रणालीका विषय है। साफसफाई के विषय के अंदर सबसे बडी बात यह है की, साफ सफाई जब होती है। जैसे पी.डब्ल्यु.डी. मे डेली एमबी कस इम्पोंटंट समझा है नालासफाई के अंदर भी डेली एम.बी. का इम्पोंटंट हो जाता है। नालासफाई का बिल चार महिने बाद बनता है। आज पहले दिन दुसरे दिन कितने डंपर, जेसीपी कितने मजदुर कहाँ लगे कितना काम किया उसका रेकॉर्डींग चार महिने के बाद ऑडीट मे आता है। मेरी आपसे रिक्वेस्ट है की, डेली एम.बी. जो होती है डेली का ईमेल कमिश्नर ऑफिसमे आयेगा।

**मा. महापौर :-**

ओ.के. दुसरा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ०४ :-**

महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्यापूर्वी कच्चे पक्के नाले सफाई / खोदाईच्या अंतर्गत येणाऱ्या कामाच्या प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ०२ :-**

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात महानगरपालिकेच्या क्षेत्रातील कच्चे / पक्के नाले सफाई, खोदाई करणे, गाळ / माती वाहतुक करणे आदी कामे पावसाळ्यापूर्वी करणे कामी भाड्याने जे.सी.बी., पोकलन, बोटपोकलन मशिन, हायड्रा मशीन, क्रेन, डंम्पर, टोरस तसेच इमारतीच्या प्रवेश द्वाराजवळ तसेच रोड क्रॉसिंग करुन पावसाच्या पाण्याचा निचरा करणे कामी विविध व्यासाचे आर.सी.सी. पाईप आवश्यकतेनुसार खरेदी करणे, कच्चे / पक्के नाले सफाई करण्यासाठी कंत्राटी मजुर घेणे त्याचप्रमाणे शहरामध्ये काही ठिकाणी अति सखल परिसर असुन त्या ठिकाणी पावसाळ्या दरम्यान थोडा फार पाऊस झाल्यास त्या परिसरातील नागरी वसाहतीतील घरात व इमारतीमध्ये पावसाचे पाणी शिरुन नागरीकांची गैरसोय होत असते. अशाठिकाणी कायमस्वरुपी पावसाच्या पाण्याचा उपसा करणे कामी विविध क्षमतेचे संक्शन पंप ठेवण्यात यावे. याकरीता निविदामध्ये मासिक दर मागविण्यात यावे व अन्य ठिकाणाकरीता प्रती तासाप्रमाणे दर मागविण्यात यावे जेणेकरुन पावसाळ्यात नागरीकांची गैरसोय होणार नाही. वरील कामाच्या निविदा मागविण्यास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत असून सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीय

अंदाजपत्रकातील वॉर्ड सफाई / नाले सफाई या लेखाशिर्षातील तरतुद अपुरी पडल्यास या कामी आरोग्य व सोयी तसेच रुग्णालये व दवाखाने अंतर्गत असलेल्या लेखा शिर्षातील शिल्लक तरतुदीतून पुर्नःविनियोजन करण्यास ही सभा मान्यता देत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत महानगरपालिका क्षेत्रातील एकात्मीक नाले बांधणे ह्या योजनेअंतर्गत नाले बांधकाम करणेकामी ज्या नाल्यांचे बांधकाम करण्याचे कार्यादेश देण्यात आले आहेत त्या नाल्याची सफाई व खोदाई करुन निघालेला गाळ, माती, वाहतुक करणे तसेच नाल्याचा प्रवास सुरळीत करणे इत्यादी कामे संबंधीत ठेकेदाराकडुन करुन घेण्यात यावी. सदरची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण होतील ह्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने दक्षता घ्यावी.

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षातील नाले सफाई खोदाई करणेकामी झालेल्या खर्चास ही सभा कार्योत्तर आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे. ठराव वाचून कायम करण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- जुबेर इनामदार**

**सन्मा. सदस्य श्री. नरेंद्र मेहता यांनी सदर ठरावात खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

आपण शहरात बघितले तर २० फुट, ३० फुट, ४० फुट रुंदीचे हे नाले दिसतात पण जिकडुन शेवटी पाण्याचा निचरा होतो ती जाफरी खाडी असु द्या, राई, मुर्धा, मोर्वा असु द्या ह्या शहराचे पाणी तिकडुन खाडीत जात असते ते नाले आपण बघितले तर पाच फुटाचे राहीले आहेत. त्यामध्ये पूर्वी दोन बोटी यायच्या, एक यायची आणि एक जायची ह्या प्रकारे ती खाडी होती. आतापर्यंत जेवढ्या निविदा काढण्यात आलेल्या आहेत त्यामध्ये कधीपण त्या खाडीचा समावेश करण्यात आला नाही मग तुमच्याकडे तरतुद नसते, ठेकेदारानी निविदा भरलेली नसते. म्हणून त्याची साफसफाई कधी होतच नाही. सुचना अशी आहे की, खाडीचा जो काही खर्च असेल त्याला आर्थिक प्रशासकीय मान्यता द्यावी व त्या खाडीची साफसफाई करुन घेण्यात यावी.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचुन कायम करण्यात आला.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५, मिरारोड येथील मौजे पेणकरपाडा येथील विकास आराखड्यातील आरक्षण क्र. १८७, १८८, १८९, १९० संचलन व देखभाल दुरुस्ती करीता करारनाम्याचे नुतनीकरण करणेस मान्यता देणे.

**प्रमोद सामंत :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखड्यात खालीलप्रमाणे आरक्षणे आहेत.

| अ.क्र. | आरक्षण क्रमांक | क्षेत्र | प्रयोजन |
|---|---|---|---|
| १ | १८७ | ११०००.०० चौ. मिटर | बगीचा |
| | १८८ | ७६००.०० चौ. मिटर | दफनभूमी |
| | १८९ | ४७००.०० चौ. मिटर | स्मशानभूमी |
| | १९० | ४५००.०० चौ. मिटर | दफनभूमी |
| | १९६ | १०८५०.०० चौ. मिटर | बगीचा (भागशः) |

वरील आरक्षणे स्वखर्चाने विकसीत करुन त्याचे संचलन देखभाल व दुरुस्ती करण्यास प्रशासकीय ठराव क्र. ४५ दि. १९/०४/२००२ च्या निर्णयानुसार दि. १९/०४/२००२ रोजीच्या पत्रान्वये मे. अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांना परवानगी देण्यात आलेली आहे. सदर संस्थेसोबत दि. २३/०४/२००२ रोजी करारनामा करण्यात आलेला आहे. सदर करारनामा हा ११ वर्षे मुदतीकरीता असून सदर मुदत ही दि. २२/०४/२०१३ रोजी संपत आहे. सदर करारनाम्यातील अटीनुसार सदर करारनाम्याचे नुतनीकरण सदर संस्थेच्या इच्छेवर अवलंबून राहील असे नमूद आहे. सदर आरक्षणाच्या जागेचे रु. १/- प्रति महिना या नाममात्र दराने भाडे आकारण्यात येत आहे.

मे. अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांनी सदर आरक्षणाचे संचलन व देखभाल दुरुस्ती पुढील कालावधी करीता करण्याबाबत कळविलेले आहे. सदर आरक्षणापैकी आरक्षण क्र. १८७, १८८, १८९ व १९० मे. अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा. लि. या संस्थेमार्फत विकसित करण्यात आलेली असून त्याचा वापर सुरु आहे. आरक्षण क्र. १९६ ही जागा सीआरझेड क्षेत्राने बाधीत होत असल्याने विकसित करण्यात आलेली नाही.

सदरचे आरक्षण संस्थेमार्फत विकसित करुन त्यावर आवश्यक देखरेख केल्याने बांधकामावर होणा-या महानगरपालिकेच्या निधीची बचत झालेली आहे. तरी मे. अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि. या संस्थेस पुढील कालावधी सदर आरक्षणे संचलन, देखभाल व दुरुस्ती करण्याकरीत करारनाम्याचे नुतनीकरण करावे व

संस्थेला सदर जागेमध्ये होर्डीग्ज उभारुन जाहीरात करण्याचीही परवानगी देण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुहास रकवी :-**

*ठरावाला माझे अनुमोदन आहे.*

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब आपण शिफारस केली आहे. माझ्या माहितीप्रमाणे मेसर्स अस्मिता कस्ट्रंक्शन ज्या अटीशर्तीवर त्यांना अकरा वर्षे देखभाल दुरूस्तीसाठी दिले होते. त्या अटीशर्तीचे पालन केले गेले नाही आणि आपण परत त्याबद्दल शिफारस केली आहे. की ह्यानां आपण फेरप्रस्ताव मंजूरीस शिफारस केली आहे. मा. आयुक्त महोदय आरक्षण ज्यावेळी पूर्ण जागा ताब्यात देण्यात आली होती आता त्या जागेवर अतिक्रमण आहे. हयाची आपल्याला जाणीव आहे का ? हयाचा कुठेही उल्लेख केलेला नाही की, एवढा भाग अतिक्रमण झालेला आहे. ११ वर्षात महापालिकेच्या जागेवर अतिक्रमण झाले आहे ह्याबद्दल काय दुसरे अस्मिता कंस्ट्रक्शन मा. आमदार मुजफ्फर हुसैन हे लोकप्रतिनिधी आहेत त्यांची मातोश्री इकडे सभागृहात उपमहापौर म्हणून आहेत हया सगळयाचा विचार करता आपण ही शिफारस केली ती योग्य आहे का ? अतिक्रमण झाले आहे. मागील अटीशर्तीचे पालन केले गेले नाही जॉगर्स पार्क गेल्या ११ वर्षात विकसीत झालेली नाही आरक्षणामध्ये फेरबदल करण्यात आले आहे. सुखसुविधामध्ये सेक्यूरिटी असू दया इतर त्या कम्बीनी बघायचे होते ते महापालिका बघते याबद्दल आपण खुलासा केला तर आम्हाला सोयीचे होईल .

**जुबेर इनामदार :-**

त्यांचा ठराव असेल तर ठिक आहे नाही तर तो मंजुर करा.

**नरेंद्र मेहता :-**

जागेवर अतिक्रमण झाले आहे की नाही. जॉगर्स पार्क विकसीत करायचा होता तो ११ वर्षात झाला आहे का ?

**दिपक खांबित :-**

जॉगस पार्क झाला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

सभागृहात अशाप्रकारे उत्तर देतात.

**मा. महापौर :-**

you have another आपके पास ठराव है ।

**दिपक खांबित :-**

साहेब माहिती घेतलेली नाही माहिती घेतो.

**जुबेर इनामदार :-**

अतिक्रमण झालेल्या विषयाची नुतनीकरणाचा काय विषय.

**नरेंद्र मेहता :-**

ह्याच्याकडे माहितीच नाही. तुम्ही आम्हाला सांगता शिफारस करता आम्हाला सांगा तरी आम्ही विरोध *घेऊन आलो नाही. चांगले असेल तर करू ना. जिकडे अतिक्रमण झाले आहे ते तुम्हाला माहित पण नाही. मा.* आयुक्त महोदय, आपण जागेची पाहणी करायला पाहिजे.

**जुबेर इनामदार :-**

११ वर्षे सातत्याने अस्मिता कंस्ट्रक्शन त्या जागेची देखरेख करते जेव्हा महापालिकेची आर्थिक परिस्थीती चांगली नव्हती त्या काळामध्ये पालिकेनेच त्यांना बोलवून आग्रह केला की, हा जो परिसर आहे तो तुम्ही विकसीत करा.

**मा. महापौर :-**

किती वर्ष झाली?

**जुबेर इनामदार :-**

११ वर्षे झाली.

**मा. महापौर :-**

फाय इअर बिफोर आपण महापौर थे ना तब भी आपको थोड़ा लिगल ॲक्शन लेना चाहीए था। ११ साल तक आप रुके आज देख रहे है एन्क्रॉचमेंट हो रहा है। आज देख रहे है क्या-क्या हो रहा है? विरोध मे जाने के बाद बहोत कुछ सिखा है। महापौर थे तब हमको साथ मे लेकर बहोत कुछ आपने किया है।

**नरेंद्र मेहता :-**

इट इज द गुड क्वेश्चन.

**मा. महापौर :-**

आय ॲम नॉट सेयिंग इट इज अ बॅड क्वेश्चन बट ११ इअर्स होने के बाद आज आपको दिखने मे आया की सामने जो है इललिगल हो रहा है की, उसपे एन्क्रॉचमेंट हो रहा है।

**नरेंद्र मेहता :-**

त्याचे मॅडम सांगतो, त्यावेळेला सत्तेत आपण भागीदार होतो. ह्या महापालिकेत आपली सत्ता होती.

**मा. महापौर :-**

मी तेच तर बोलली तुमच्याबरोबर आम्ही पण होतो. तुम्ही आम्हाला सांगायचे तसे आम्ही पण करायचो, आम्ही पण बोलायचो आज विरोध झाल्यानंतर तुम्हाला जास्त जाण आली आहे की, इट इज इललिगल, दॅट इज इन्क्रॉचमेंट

**जुबेर इनामदार :-**

११ वर्षामध्ये लेखी स्वरुपात तक्रार केलेली नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मला वाटते हे प्रशासन काळात हे दिले गेले होत. मा. महापौर मॅडम, हे प्रशासन काळ होता तेव्हा दिले गेले आहे. महापालिकेने ज्यावेळी बॉडीत त्यावेळेला दिले गेले नाही. आपल्याला चांगले माहित आहे मेजॉरीटी त्यांची होती गेल्या सहा महिन्यात महासभा झाली नाही त्या काळात राष्ट्रवादी........

**मा. महापौर :-**

ती तर खुप नंतरची गोष्ट आहे. तुम्ही महापौर असताना मी सांगते गेल्या सहा महिन्यात तुळशीदास म्हात्रे साहेब होते आय ॲम टॉकींग ११ साल के बीच मे तो टू ॲन्ड हाल्फ इअर आप भी महापौर थे। २००७ ते २००९ तक यु आर द मेअर.

**नरेंद्र मेहता :-**

एक ऐका। हे इम्प्लीमेंट झाले त्यावेळेला मा. मायरा मेंडोंसा महापौर होत्या. त्यांच्यावर आरोप करायचा का आम्ही?

**मा. महापौर :-**

जे दोषी असतील त्यांच्यावर करा.

**नरेंद्र मेहता :-**

तो विषय नाहीच आहे इकडे, त्यावेळी मेजॉरीटी होती. ह्या महापालिकेत भगवती शर्मा आणि आमचा "ज" खाली प्रस्ताव आहे. ह्याच विषयावर रद्द करा म्हणुन मागचे सहा महिने ह्या लोकांनी मिटींग घेतली नाही हा विषय होता म्हणुन रद्द करायचे आज त्या वादात आम्ही जात नाही की, त्यांनी काय केले. आमचं तेवढच म्हणणं आहे की, ज्या अटीशर्तीवर दिले आहे त्याची पुर्तता करायला पाहिजे जॉगर्स पार्क करायला नको का? मा. आयुक्तांनी आम्हाला खरी माहिती द्यायला पाहिजे ही परिस्थीती आहे. सभागृहाने निर्णय घ्यावा मेजॉरीटी तुमची आहे आम्ही काय ठराव आणलेला नाही की, आम्ही विरोध करणार आहोत. मी पहिलंच बोललो ते चांगले कार्य आहे. मा. मुझफ्फर हुसैन साहेबांनी फ्री ऑफ कॉस्ट केले आहे. त्याबद्दल माझे काही मत नाही पण ज्या अटीशर्तीने महापालिकेचे आरक्षण ह्या लोकांचे सुख सुविधा म्हणुन बघत असतो, उत्पन्न किंवा खर्चाच्या बाबीने बघत नाही तुम्ही फुकट द्या किंवा ते तुम्हाला दहा लाख रुपये देतील. तरी आमची इच्छा असेल की, ती सुख सुविधा नागरीकांना मिळावी. अतिक्रमण झालेल्या जागा आपल्याला परत ताब्यात नको का? मग हे कोण करणार? आता निविदा काय करणार ॲग्रीमेंट करता तेव्हा तुम्ही अतिक्रमण वगळून करणार का? ह्याचा खुलासा करा. खांबित साहेब बोलले, मला माहीतच नाही मा. आयुक्त साहेब तुम्ही प्रस्ताव देता तुम्हालाच माहित नाही की, जागेवर काय आहे? तुम्ही आमच्याकडे रिन्युअलला आणले आहे आणि तुमच्याकडे उत्तर नाही.

**हंसुकुमार पांडे :-**

मा. मुझफ्फर हुसैन साहेबने ११ साल पहले अच्छा काम किया। उस वक्त शहर मे किसी भी नगरसेवक या कोई भी बडे लोगो की यह सोच नही थी जो मुझफ्फर साहब की थी। उन्होंने अच्छा काम किया। उसपे भी आज विरोध करने का है। यह लोगोंने जो जो काम किया है स्कुल कॉलेज का वह सब अटी शर्ती मे किया है क्या? इनका एक भी काम अटीशर्ती के हिसाब से है क्या? जो आज हर अच्छे काम का विरोध करते खडे होते है। इनका कौनसा काम अटी शर्ती के अंदर है। महानगरपालिका इसका जवाब दो। मा. आयुक्त साहब जवाब दो। इनका स्कूल अटीशर्ती के अंदर है क्या?

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय, मा महापौर मॅडम पर्सनली जायची आवश्यकता नाही.

**हंसुकुमार पांडे :-**

तुम्ही पण पर्सनली बोलायचे नाही.

**नरेंद्र मेहता :-**

त्यांना माहिती नसेल तर माहिती घ्यावी.

**मा. महापौर :-**

सर्वांनी बसुन घ्या.

**असेन्ला मेंन्डोंसा :-**

ते बोलत आहेत पर्सनली जायची गरज नाही तर मुझफ्फर हुसैन साहेब काय आहेत काय नाही आहेत त्याची आई कोण आहे ते बोलायची काय गरज होती.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, कायद्यात तरतुद आहे. लोकप्रतिनिधी असताना तुम्ही ह्या प्रकारचा विषय आणला आम्हाला तुम्हाला विचारायचे आहे कारण हरीभाऊंना विचारा जो सहभागी होतो तोही दोषी ठरतो म्हणुन आम्ही त्यामध्ये विचारले आहे काही चुक केली नाही.

**मा. महापौर :-**

तुम्हाला ऑब्जेक्शन असेल आणि .......

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करत आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

हिंदु, मुस्लीम, सिख, ईसाई ऐसा देखने नही मिलेगा इतना अच्छा काम किया है।

**प्रकरण क्र. ०५ :-**

मिरारोड येथील मौजे पेणकरपाडा येथील विकास आराखड्यातील आरक्षण क्र. १८७, १८८, १८९, १९० संचलन व देखभाल दुरुस्ती करीता करारनाम्याचे नुतनीकरण करणेस मान्यता देणे.

**ठराव क्र. ०३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखड्यात खालीलप्रमाणे आरक्षणे आहेत.

| अ.क्र. | अरक्षण क्रमांक | क्षेत्र | प्रयोजन |
|---|---|---|---|
| १ | १८७ | ११०००.०० चौ. मिटर | बगीचा |
| | १८८ | ७६००.०० चौ. मिटर | दफनभूमी |
| | १८९ | ४७००.०० चौ. मिटर | स्मशानभूमी |
| | १९० | ४५००.०० चौ. मिटर | दफनभूमी |
| | १९६ | १०८५०.०० चौ. मिटर | बगीचा (भागशः) |

वरील आरक्षणे स्वखर्चाने विकसीत करुन त्याचे संचलन देखभाल व दुरुस्ती करण्यास प्रशासकीय ठराव क्र. ४५ दि. १९/०४/२००२ च्या निर्णयानुसार दि. १९/०४/२००२ रोजीच्या पत्रान्वये मे. अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांना परवानगी देण्यात आलेली आहे. सदर संस्थेसोबत दि. २३/०४/२००२ रोजी करारनामा करण्यात आलेला आहे. सदर करारनामा हा ११ वर्षे मुदतीकरीता असून सदर मुदत ही दि. २२/०४/२०१३ रोजी संपत आहे. सदर करारनाम्यातील अटीनुसार सदर करारनाम्याचे नुतनीकरण सदर संस्थेच्या इच्छेवर अवलंबून राहील असे नमूद आहे. सदर आरक्षणाच्या जागेचे रु. १/- प्रति महिना या नाममात्र दराने भाडे आकारण्यात येत आहे.

मे. अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांनी सदर आरक्षणाचे संचलन व देखभाल दुरुस्ती पुढील कालावधी करीता करण्याबाबत कळविलेले आहे. सदर आरक्षणापैकी आरक्षण क्र. १८७, १८८, १८९ व १९० मे. अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा. लि. या संस्थेमार्फत विकसित करण्यात आलेली असून त्याचा वापर सुरु आहे. आरक्षण क्र. १९६ ही जागा सीआरझेड क्षेत्राने बाधीत होत असल्याने विकसित करण्यात आलेली नाही.

सदरचे आरक्षण संस्थेमार्फत विकसित करुन त्यावर आवश्यक देखरेख केल्याने बांधकामावर होणा-या महानगरपालिकेच्या निधीची बचत झालेली आहे. तरी मे. अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि. या संस्थेस पुढील कालावधी सदर आरक्षणे संचलन, देखभाल व दुरुस्ती करण्याकरीत करारनाम्याचे नुतनीकरण करावे व संस्थेला सदर जागेमध्ये होर्डीग्ज उभारुन जाहीरात करण्याचीही परवानगी देण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रमोद सामंत** **अनुमोदन :- श्री. सुहास रकवी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यांत आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.६, विकास कामांना आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा-भाईंदर महनगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक, तसेच विकास योजनेतील रस्त्याखालून विविध यंत्रणाच्या केबल्स, पाईप लाईन इ. टाकण्यात आलेल्या आहेत व येत आहेत. संबधित यंत्रणाकडून, नविन केबल्स टाकणे, जलवाहिनी टाकणे त्याची दुरूस्ती करणे इत्यादीसाठी आवश्यक परवानगी घेऊन व शुल्क भरून खोदण्यात येतात. सदर दुरूस्ती शुल्कातून बाधित रस्ते दुरूस्ती केले जातात. यासोबत अतीवृष्टीमुळे पडणारे खड्डे देखिल महानगरपालिकेकडे विविध यंत्रणामार्फत रस्ते दुरूस्तीसाठी जमा केलेल्या रक्कमेतून, दुरूस्ती करून घेण्यात येतात. मागील पाच वर्षात विविध यंत्रणाकडून रस्ते दुरूस्ती करण्यासाठी जमा केलेली रक्कम व प्रत्यक्षात खर्च झालेली रक्कम यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे :-

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | संबंधित यंत्रणाकडून जमा रक्कम | खर्च रक्कम |
|---|---|---|---|
| १ | २००८-२००९ | रू. ५.२० कोटी | रू. ८.५४ कोटी |
| २ | २००९-२०१० | रू. ८.१३ कोटी | रू. ९.२४ कोटी |
| ३ | २०१०-२०११ | रू. १३.२९ कोटी | रू. १३.६५ कोटी |
| ४ | २०११-१२ | रू. १४.३० कोटी | रू. १३.४४ कोटी |
| ५ | २०१२-१३ | रू. २४.४४ कोटी | रू. १६.०० कोटी |

महानगरपालिकेच्या वार्षिक अर्थसंकल्पात रस्ते दुरूस्ती करीता योग्य तरतुद करण्यात येते. सदर तरतुदीतून दरवर्षी आवश्यक रक्कमेच्या प्रभाग निहाय वार्षिक मुदतीच्या निविदा मागविण्यात येतात. सदर वार्षिक दर मा. स्थायी समिती सभेकडून मंजूर करून घेण्यात येतात व खोदाई परवानग्या दिल्यावर तसेच पावसाळ्यात पडणाऱ्या खड्डे दुरूस्तीसाठी आवश्यकते नूसार अंदाजपत्रक तयार करून त्यास सक्षम प्राधिकरणाची प्रशासकीय व आर्थिक मान्यता घेऊन वार्षिक मंजूर दराने संबधित ठेकेदारास कार्यादेश देऊन रस्ते दुरूस्तीची कामे करून घेण्यात येतात.

सन २०१३-१४ या वर्षाकरीता रस्ते देखभाल, दुरूस्ती, पुर्नःपृष्ठीकरण या लेखाशिर्षाखाली रू. २०.०० कोटी एवढ्या रक्कमेची तरतुद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. सदर रक्कमेपैकी रू. १६.०० कोटी रक्कमेच्या वार्षिक दराच्या प्रभाग निहाय निविदा मागवून दर निश्चित करून रस्ते दुरूस्तीची करावयाची सर्व कामे आवश्यकतेनूसार अंदाजपत्रके तयार करून संबधित ठेकेदाराकडून करून घेता येतील. तसेच पावसाळ्यात पडणारे खड्डे देखिल तातडीने अंदाजपत्रके तयार करून मंजूर दराने ठेकेदाराकडून करून घेण्यात येतील. सन २०१२-१३ या वर्षात देखभाल व दुरुस्तीची कामे वार्षिक निविदा मागवून करण्यात आली आहेत त्याकामी रु. ११.०० कोटी रकमेच्या प्रभाग निहाय निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर खर्चास प्रशासकिय / आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या सहा प्रभाग समित्या तयार करण्याचा प्रस्ताव मंजूर झालेला असून सदर प्रभाग समिती निहाय अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार वार्षिक दराच्या निविदा मागविण्यास प्रशासकिय / आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील फुटपाथ / नाले / गटारे / फुटपाथवर आर.सी.सी. / लोखंडी/ फायबर झाकणे बसविणे, स्लॅब, पेव्हर ब्लॉक, कर्बस्टोन दुरुस्ती करणे कामासाठी प्रभाग निहाय रु. ५०.०० लक्ष रक्कमेच्या निविदा मागवून कार्यादेश देण्यात आलेले होते. त्यानुसार एकुण रु. २.०० कोटी खर्च अपेक्षित होता. सदर खर्चास ही सभा प्रशासकिय / आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. तसेच चालू वर्षाकरीता गटारे, फुटपाथ व स्लॅब मधील झाकणासाठी वार्षिक निविदासाठी रु. २.०० कोटी खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास ही सभा प्रशासकिय व आर्थिक मान्यता देत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील स्ट्रीट लाईट पोल वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी निविदा मागविण्यात आली होती. मा. स्थायी समिती सभेने मंजूर केलेल्या दरानुसार रु.६०.३३६ लक्ष एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास ही सभा प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करत आहे.

**प्रकरण क्र. ६ :-**

विकास कामांना आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. ०४ :-**

मिरा-भाईंदर महनगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक, तसेच विकास योजनेतील रस्त्याखालून विविध यंत्रणाच्या केबल्स, पाईप लाईन इ. टाकण्यात आलेल्या आहेत व येत आहेत. संबधित यंत्रणाकडून, नविन

केबल्स टाकणे, जलवाहिनी टाकणे त्याची दुरूस्ती करणे इत्यादीसाठी आवश्यक परवानगी घेऊन व शुल्क भरून खोदण्यात येतात. सदर दुरूस्ती शुल्कातून बाधित रस्ते दुरूस्ती केले जातात. यासोबत अतीवृष्टीमुळे पडणारे खड्डे देखिल महानगरपालिकेकडे विविध यंत्रणामार्फत रस्ते दुरूस्तीसाठी जमा केलेल्या रक्कमेतून, दुरूस्ती करून घेण्यात येतात. मागील पाच वर्षात विविध यंत्रणाकडून रस्ते दुरूस्ती करण्यासाठी जमा केलेली रक्कम व प्रत्यक्षात खर्च झालेली रक्कम यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे :-

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | संबंधित यंत्रणाकडून जमा रक्कम | खर्च रक्कम |
|---|---|---|---|
| १ | २००८-२००९ | रू. ५.२० कोटी | रू. ८.५४ कोटी |
| २ | २००९-२०१० | रू. ८.१३ कोटी | रू. ९.२४ कोटी |
| ३ | २०१०-२०११ | रू. १३.२९ कोटी | रू. १३.६५ कोटी |
| ४ | २०११-१२ | रू. १४.३० कोटी | रू. १३.४४ कोटी |
| ५ | २०१२-१३ | रू. २४.४४ कोटी | रू. १६.०० कोटी |

महानगरपालिकेच्या वार्षिक अर्थसंकल्पात रस्ते दुरूस्ती करीता योग्य तरतुद करण्यात येते. सदर तरतुदीतून दरवर्षी आवश्यक रक्कमेच्या प्रभाग निहाय वार्षिक मुदतीच्या निविदा मागविण्यात येतात. सदर वार्षिक दर मा. स्थायी समिती सभेकडून मंजूर करून घेण्यात येतात व खोदाई परवानग्या दिल्यावर तसेच पावसाळ्यात पडणाऱ्या खड्डे दुरूस्तीसाठी आवश्यकते नूसार अंदाजपत्रक तयार करून त्यास सक्षम प्राधिकरणाची प्रशासकीय व आर्थिक मान्यता घेऊन वार्षिक मंजूर दराने संबधित ठेकेदारास कार्यादेश देऊन रस्ते दुरूस्तीची कामे करून घेण्यात येतात.

सन २०१३-१४ या वर्षाकरीता रस्ते देखभाल, दुरूस्ती, पुर्नःपृष्ठीकरण या लेखाशिर्षाखाली रू. २०.०० कोटी एवढ्या रक्कमेची तरतुद अर्थसंकेल्पात करण्यात आली आहे. सदर रक्कमेपैकी रू. १६.०० कोटी रक्कमेच्या वार्षिक दराच्या प्रभाग निहाय निविदा मागवून दर निश्चित करून रस्ते दुरूस्तीची करावयाची सर्व कामे आवश्यकतेनूसार अंदाजपत्रके तयार करून संबधित ठेकेदाराकडून करून घेता येतील. तसेच पावसाळ्यात पडणारे खड्डे देखिल तातडीने अंदाजपत्रके तयार करून मंजूर दराने ठेकेदाराकडून करून घेण्यात येतील. सन २०१२-१३ या वर्षात देखभाल व दुरुस्तीची कामे वार्षिक निविदा मागवून करण्यात आली आहेत त्याकामी रु. ११.०० कोटी रकमेच्या प्रभाग निहाय निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर खर्चास प्रशासकिय / आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या सहा प्रभाग समित्या तयार करण्याचा प्रस्ताव मंजूर झालेला असून सदर प्रभाग समिती निहाय अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार वार्षिक दराच्या निविदा मागविण्यास प्रशासकिय / आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील फुटपाथ / नाले / गटारे / फुटपाथवर आर.सी.सी. / लोखंडी/ फायबर झाकणे बसविणे, स्लॅब, पेव्हर ब्लॉक, कर्बस्टोन दुरुस्ती करणे कामासाठी प्रभाग निहाय रु. ५०.०० लक्ष रक्कमेच्या निविदा मागवून कार्यादेश देण्यात आलेले होते. त्यानुसार एकूण रु. २.०० कोटी खर्च अपेक्षित होता. सदर खर्चास ही सभा प्रशासकिय / आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. तसेच चालू वर्षाकरीता गटारे, फुटपाथ व स्लॅब मधील झाकणासाठी वार्षिक निविदासाठी रु. २.०० कोटी खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास ही सभा प्रशासकिय व आर्थिक मान्यता देत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील स्ट्रीट लाईट पोल वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी निविदा मागविण्यात आली होती. मा. स्थायी समिती सभेने मंजूर केलेल्या दरानुसार रु.६०.३३६ लक्ष एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास ही सभा प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.७, भाईंदर (पूर्व) इंद्रलोक भागातील बगीचा आरक्षण क्र. २२१ चे " हिन्दु हृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे उद्यान'' असे नामकरण करण्याबाबतच्या विनंतीवर निर्णय होणेबाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, माझी अशी विनंती आहे की, भरपुर नगरसेवकांची पत्र तुमच्याकडे आणि प्रशासनाकडे आली आहेत की, नामकरण करायचे ज्या एरीयामध्ये रस्ते आहेत चौक आहेत असे सगळे विषय

पेंडींग आहेत तर ह्या विषयावर असे सगळे विषय पेंडींग आहेत तर ह्या विषयावर आमचा विरोध नाही माझी तुम्हाला अशी विनंती होती की, सगळे प्रस्ताव एकत्र करुन महासभेत आणले तर बरं होईल.

**मा. महापौर :-**

आपण हे दुसऱ्या महासभेत घेऊ या.

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम, ह्याच्यां अगोदर पण काही प्रस्ताव आले होते त्यांना तुम्ही मान्यता दिली आहे.

**मा. महापौर :-**

माझ्याकडे खुप पत्र आली आहेत आपण सगळ्यांना एकत्र करुन वा दुसऱ्या महासभेत घेऊया.

**प्रशांत दळवी :-**

मॅडम, आज अजेंड्यावर विषय घेतला आहे आणि तुम्ही विषयाला कलाटणी देता.

**निलम ढवण :-**

मॅडम, तुमच्याकडे ह्यापूर्वी जर तुमच्याकडे एवढे विषय आलेले आहेत मग हा विषय घ्यायचा नव्हता हा विषय आता का घेतला?

**प्रशांत दळवी :-**

लोकप्रतिनिधींनी विनंती केली आहे विनंती केली आहे मग कुठे अडकलं प्रॉब्लेम काय ?

**निलम ढवण :-**

लोकप्रतिनीधींचा सम्मान नाही आहे का? हा विषय आता घ्यायचा नव्हता ना सचिव साहेब ह्या विषयावर चर्चा झाली पाहिजे.

**मा. महापौर :-**

सर्व एकत्र घेऊ.

**प्रविण पाटील :-**

मॅडम, आमचा ठराव आहे तुम्हाला काय निर्णय घ्यायचा तो घ्या आम्ही ठराव वाचतो.

**मा. महापौर :-**

मी ठराव स्विकार करणारच नाही मी सांगते की, पुढच्या वेळी घेणार आहे.

**निलम ढवण :-**

मग हा विषय आज घेतलाच का?

**प्रविण पाटील :-**

आमचा ह्या विषयावर ठराव आहे तुम्ही काय करायचे ते करा निर्णय द्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम आपल्याला अशी विनंती आहे की, ह्याचा विरोध नाही बाळासाहेब ठाकरे......

**मा. महापौर :-**

विरोध कोणी करत नाही.

**निलम ढवण :-**

मॅडम, विरोध नाही मग हा विषय आल्यावर तुम्ही त्या विषयाला मान्यता का देऊ शकत नाही? मागच्या वेळेला १५ ते २० नामकरणाचे विषय घेतले होते त्यावेळेला पाच मिनीट पण लागली नाहीत सगळ्यांनी सर्वानुमते हे केले होते आणि बाळासाहेबांच्या नावासाठी तुम्ही पुढच्या वेळेला विषय घेणार.

**मा. महापौर :-**

मी अजिबात बोलली नव्हती. बाळासाहेबांच्या नावासाठी मी विरोध केलेलाच नाही.

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखड्यात भाईंदर पूर्व इंद्रलोक भागात आरक्षण क्र. २२१ "बगीचा" करीता आरक्षीत आहे. सदर आरक्षणाचे "हिन्दु हृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे उद्यान" असे नामकरण करणेबाबत लोकप्रतिनिधी कडून मागणी करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची "ड" मधील प्रकरण क्रमांक ११ (२) (१) (अ) नुसार सदर नामकरणाबाबत उचित निर्णय होण्यास शिफारस केली आहे. सदर विषयाला मा. महासभा मान्यता देत आहे.

**प्रविण पाटील :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

मी हा ठराव स्विकार करणार नाही.

**रोहिदास पाटील :-**

मॅडम, असं होत नाही.

**निलम ढवण :-**

अस थोडी होतं.

**रोहिदास पाटील :-**

ठराव स्विकारता येत नाही असे होत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मी ठराव मांडत आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

वोटींग घ्या.

**मा. महापौर :-**

वोटींग कशाला घ्यायचे आमचे पण मत आहे माझे मत नसते तर पत्रिका घेतले नसते.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

हा विषय आणला आहे तर विषय संपवून घ्या.

**रोहिदास पाटील :-**

आमची विनंती आहे की, आपण मा. महापौरांच्या मान्यतेने विषय आणला आहे.

**मा. महापौर :-**

काका, मला पण समजते मला जर नसते तर मी विषय घेतलाच नसता.

**रोहिदास पाटील :-**

गावाला मॅसेज काय जाईल?

**मा. महापौर :-**

मी काय विरोधात बोलली नाही.

**निलम ढवण :-**

मॅडम, एवढा वेळ घालवतात त्याच्यामध्ये सगळ्यांचे मत आहे तर पास करायला काय हरकत अ

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सर्वांनी बसून घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

भाईंदर पूर्व इंद्रलोक भागातील बगीचा आरक्षणाचे "हिन्दु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे उद्यान" असे नामकरण करण्याबाबतच्या ठरावास / निर्णयास राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस व बहुजन विकास आघाडी या पक्षांचा विरोध नसून प्रशासनाकडे आलेला नामकरणाचा प्रस्ताव व सदर प्रस्ताव एकत्र आणून पुन्हा मा. महासभेत विषय आणावा असा मी ठराव मांडत आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

विरोध नाहीच आहे.

**निलम ढवण :-**

विरोध नाही मग हा प्रस्ताव आज घेतलाच का?

**प्रशांत दळवी :-**

सन्मा. जुबेर साहेब, आपण इथे गोषवाऱ्यामध्ये म्हटले आहे की, लोकप्रतिनिधी कडून ह्याला मागणी आलेली आहे आणि मग लोकप्रतिनिधीच त्याला विरोध करतात.

**मा. महापौर :-**

कोण विरोध करत नाही. दळवी साहेब तुमचे शब्द मागे घ्या. कोणी विरोध करत नाही. तुमचे शब्द परत घ्या.

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम, मी शब्द परत घेतो.

**मा. महापौर :-**

मी विरोध करत नाही.

**प्रशांत दळवी :-**

गोषवाऱ्यामध्ये तसे म्हटले आहे.

**मा. महापौर :-**

माझ्याकडे दुसऱ्या पण लोकांची इच्छा आहे की, सन्मा. बाळासाहेब ठाकरेच्या नावाने रोड आहे तर ते सगळे एकत्र करुन एकत्र घेऊ या.

**प्रशांत दळवी :-**

आम्ही ॲग्री करतो.

**निलम ढवण :-**

सगळे बाकीचे नामकरण वेगळे आणि हा इथे बाळासाहेबांच्या नावाचा प्रश्न आहे. विशेषता सर्व नगरसेवकांनी मा. आमदारानी तुमच्याकडे लेटर दिले आहे.

**मा. महापौर :-**

आमच्या पण आमदाराचे आहे.

**प्रशांत दळवी :-**

ठराव पास करुन घ्या.

**निलम ढवण :-**

एवढ होत ना. एवढा वेळ तुम्ही फुकट घालवला. विरोध नाही तर मंजूर करायला काय प्रॉब्लेम आहे.

**मा. महापौर :-**

मॅडम, तुम्ही बोलता तुमच्या मा. आमदारांनी लेटर दिले आहे तर मग आमच्या पण मा. आमदारांनी लेटर दिले आहे.

**निलम ढवण :-**

मग ठीक आहे ना. त्याचाही विरोध नाही आहे.

(सभागृहात गोंधळ)

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही सर्व मा. आमदारांचे इकडे आभार मानतो. सत्ताधारी पक्षाचे पण आभार मानतो.

**निलम ढवण :-**

तुम्ही इथे जाणून बुजून इथे का करता?

**मा. महापौर :-**

जाणून बुजून कोणी करत नाही.

**निलम ढवण :-**

नाही. मॅडम, आता जाणून बुजून होते. एवढा वेळ जर ह्याच्यावर घालवू शकता मग मंजूर म्हणून सांगू शकत नाही का?

**मा. महापौर :-**

जाणून बुजून अस इथे अजिबात बोलू नका.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर मॅडम, एक विनंती. माझी अशी सुचना आहे की, मागच्या वेळेला २००७ ला सदस्य निवडून आले होते तेव्हा सुध्दा वर्ष माझ्या लक्षात नाही. तेव्हा सुध्दा नामकरणाचा प्रत्येकांनी आपल्या वॉर्डमधला विषय दिला होता की, ह्या रस्त्याला हे नाव द्यायचे तर, मी असे म्हणेन की आताचा जो विषय आहे. मॅडमनी आणलेला चांगला विषय आहे. परंतु मागचे जे विषय नामकरणाचे दिले होते ते अजून झालेले नाहीत.

**मा. महापौर :-**

मॅडम, सगळे एकत्र घेऊ या.

**वंदना चक्रे :-**

मॅडम, माझी अशी सुचना आहे की, ते सगळे विषय एकत्र घेऊन नामकरणाचे पुढच्या सभेला घ्यावे अशी मी सुचना मांडते.

**निलम ढवण :-**

मॅडम, दोन-तीन मिटींग पूर्वी नामांतराचा विषय जो विषय आला होता त्यावेळी दोन मिनिटात सगळ्यांना परमिशन दिली गेली होती. तुमच्याकडे नाव आली होती तर आज हा विषय घ्यायचाच नव्हता.

**नगरसचिव :-**

प्रकरण ७ करीता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्रीम. निलम ढवण, अनुमोदक श्री. प्रविण पाटील. दुसरा ठराव सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील, अनुमोदक श्री. जुबेर इनामदार. दुसरा ठराव मतदानासाठी टाकतो. सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील, अनुमोदक श्री. जुबेर इनामदार ह्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे. तटस्थ कोणी आहेत का? पहिला ठराव मतदानास टाकतो ह्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी आहेत का?

**मा. महापौर :-**

सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४७ आणि विरोधात ४१ तटस्थ कोणी नाहीत. श्री. ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यात येत आहे.

**निलम ढवण :-**

ह्या विषयावर ठराव मांडावा लागला. बाळासाहेबांसारख्या विषयावर जर तुम्ही सगळे आदर करता.

**मा. महापौर :-**

ठीक आहे. ठराव झाला ना. तुमची इच्छा होती. ठराव घेण्यासाठी.

**निलम ढवण :-**

आम्ही सगळे ह्याचा निषेध करतो.

**मा. महापौर :-**

तुमचीच इच्छा होती ठराव मांडायला.

**निलम ढवण :-**

आम्ही ह्या गोष्टीचा निषेध करतो. एकीकडे सांगायचे आदर करतो. मंजूर करण्यासाठी इतका वेळ घालवला. ह्याला काय अर्थ आहे काय? सगळी मनमानी चालली आहे.

**प्रभात पाटील :-**

अशी मनमानी शब्द कसे बोलता येतात. त्यांना पण ह्या सभागृहात स्थान दिल आहे. निर्णया प्रत थांबणे तुम्हाला मनमानी शब्द बोलता येणार नाही. आम्ही कुठेही विरोध केला नाही. मॅडम, हा शब्द त्याच्यातून काढून टाका.

**निलम ढवण :-**

मॅडम, बरोबर आहे. जर सगळ्या नगरसेवकांची मागणी होती. दोन्ही आमदारांची मागणी होती.

**प्रभात पाटील :-**

मनमानी शब्द होऊ शकत नाही.

**निलम ढवण :-**

*त्या आमदाराचा सन्मान राखला गेला का?*

**मा. महापौर :-**

ठराव तुम्ही मांडलेला.

**निलम ढवण :-**

ठराव करावा लागला.

**मा. महापौर :-**

ठीक आहे.

**निलम ढवण :-**

ठराव तुमच्यामुळे. तुम्ही सगळे सांगता आज विषय घ्यायचाच नव्हता.

**प्रकरण क्र. ७ :-**

भाईंदर (पूर्व) इंद्रलोक भागातील बगीचा आरक्षण क्र. २२१ चे " हिन्दु हृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे उद्यान'' असे नामकरण करण्याबाबतच्या विनंतीवर निर्णय होणेबाबत.

**ठराव क्र. ०५ :-**

भाईंदर पूर्व इंद्रलोक भागातील बगीचा आरक्षणाचे "हिन्दु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे उद्यान'' असे नामकरण करण्याबाबतच्या ठरावास / निर्णयास राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व बहुजन विकास आघाडी या पक्षांचा विरोध नसून प्रशासनाकडे आलेला नामकरणाचा प्रस्ताव व सदर प्रस्ताव एकत्र आणून पुन्हा मा. महासभेत विषय आणावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | १ | कोठारी सुमन रमेश | |
| २ | अशोक तिवारी | २ | कांगणे यशवंत बगाजी | |
| ३ | अन्सेन्ला मेन्डोंसा परेरा | ३ | मयेकर सरस्वती रजनीकांत | |
| ४ | ॲड. रवि व्यास | ४ | सिंग मदन उदितनारायण | |
| ५ | पाटील वंदना विकास | ५ | पाटील रोहिदास शंकर | |
| ६ | वंदना मंगेश पाटील | ६ | पाटील प्रेमनाथ गजानन | |
| ७ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | ७ | शर्मा सुनिला सत्येंद्र | |
| ८ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | ८ | मेहता डिंपल विनोद | |
| ९ | मेन्डोन्सा स्टिवन जॉन | ९ | केळुसकर प्रशांत नारायण | निरंक |
| १० | ग्रिटा स्टिफन फॅरो | १० | भानुशाली वर्षा गिरीधर | |
| ११ | डॉ. आसिफ गुलाब शेख | ११ | रावल भगवती जयशंकर | |
| १२ | गोविंद हेलन जॉर्जी | १२ | शाह राकेश रतिशचंद्र | |
| १३ | डिमेलो बर्नट अल्बर्ट | १३ | शरद केशव पाटील | |
| १४ | लियाकत ग. शेख | १४ | मेघना दिपक रावल | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | १५ | जैन गिता भरत | |
| १६ | खण्डेलवाल सुरेश | १६ | जैन रमेश धरमचंद | |
| १७ | नरेश तुकाराम पाटील | १७ | डॉ. राजेंद्र जैन | |
| १८ | शबनम लियाकत शेख | १८ | प्रतिभा प्रकाश तांगडे | |
| १९ | अनिता जयवंत पाटील | १९ | मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | |
| २० | म्हात्रे परशुराम प्रभाकर | २० | सुजाता रविकांत शिंदे | |
| २१ | भावसार शिल्पा कमलेश | २१ | मेहता नरेंद्र लालचंद | |
| २२ | वंदना रामदास चक्रे | २२ | कासोदरिया अश्विन श्यामजी | |
| २३ | भोईर कमलेश यशवंत | २३ | डॉ. नयना मनोज वसानी | |
| २४ | रविंद्र भिमदेव माळी | २४ | जैन दिनेश तेजराज | |
| २५ | दक्षता राजेंद्र ठाकूर | २५ | अरोरा दिपिका पंकज | |
| २६ | पिसाळ मनिषा नामदेव | २६ | मीरादेवी रामलाल यादव | |
| २७ | पांडे हंसूकुमार कमलकुमार | २७ | अनिल बाबुराव भोसले | |
| २८ | पाटील सुनिता कैलास | २८ | निलम हरिश्चंद्र ढवण | |
| २९ | वेतोसकर राजेश शंकर | २९ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | |
| ३० | प्रभात प्रकाश पाटील | ३० | श्रीमती संध्या प्रफुल्ल पाटील | |
| ३१ | बगाजी शर्मिला विल्सन | ३१ | प्रविण मोरेश्वर पाटील | |
| ३२ | रकवी सुहास माधवराव | ३२ | तारा विनायक घरत | |
| ३३ | झिनत रऊफ कुरेशी | ३३ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | |
| ३४ | मोहम्मद फरिद सिद्धीक कुरेशी | ३४ | शुभांगी महिन कोटियन | |
| ३५ | पुजारी कांचना शेखर | ३५ | जयमाला किशोर पाटील | |
| ३६ | काझी रशीदा जमील | ३६ | संदिप मोहन पाटील | |
| ३७ | इनामदार जुबेर | ३७ | परमार अनिता भरत | |
| ३८ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | ३८ | पाटील प्रणाली संदिप | |
| ३९ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | ३९ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | |
| ४० | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | ४० | गावंड मंदाकिनी आत्माराम | |
| ४१ | डिसा मर्लिन मर्विन | ४१ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | |
| ४२ | भट दिप्ती शेखर | | | |
| ४३ | विराणी रेखा अनिल | | | |
| ४४ | सामंत प्रमोद जयराम | | | |
| ४५ | भोईर भावना राजू | | | |
| ४६ | भोईर राजू यशवंत | | | |
| ४७ | मुन्ना सिंग | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८, श्री. क्लासो जॉर्ज फर्नांडिस, उप-मुख्य अग्निशमन अधिकारी, यांच्या स्वेच्छा निवृत्तीबाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

महानगरपालिका आस्थापनेवरील श्री. क्लासो जॉर्ज फर्नांडिस, सहाय्यक अग्निशमन अधिकारी हे दि. ०१/०४/१९९० पासून तत्कालीन नगरपरिषदेत वाहन चालक या पदावर नियुक्ती असुन, सद्यःस्थितीत अग्निशमन विभागात पदोन्नतीने सहाय्यक अग्निशमन अधिकारी या पदावर कार्यरत आहेत.

श्री. क्लासो जॉर्ज फर्नांडिस, सहाय्यक अग्निशमन अधिकारी यांनी दि. १६/०२/२०१३ रोजीच्या अर्जामध्ये त्यांचा अखंडीत सेवेचा कालावधी २० वर्षापेक्षा जास्त झाला असल्याने, त्यांनी 'स्वेच्छा निवृत्ती' घेण्याचा निर्णय घेतला असुन दि. १६/०२/२०१३ रोजीचे विनंती अर्जाने कळविले आहे. श्री. क्लासो जॉर्ज फर्नांडिस, सहाय्यक अग्निशमन अधिकारी यांनी कार्यालयास विनंती अर्ज सादर केला त्यावेळी त्यांची २२ वर्षे सेवा पुर्ण झालेली आहे. श्री. क्लासो जॉर्ज फर्नांडिस, सहाय्यक अग्निशमन अधिकारी यांनी सेवा कालावधीत ज्या-ज्या विभागात काम केले त्या संबंधित विभागाकडून ना-देय दाखला मागणी केलेली आहे. त्यानुसार

अग्निशमन विभाग, (उप-आयुक्त) व लेखा विभाग यांचेकडील ना-देय दाखला प्राप्त झालेले असुन महानगरपालिकेस त्यांचेकडून कोणत्याही प्रकारे येणे नाही.

प्रस्तावित उपरोक्त श्री. क्लासो जॉर्ज फर्नांडिस, सहाय्यक अग्निशमन अधिकारी यांचा अखंडीत सेवेचा कालावधी २२ वर्षे पेक्षा जास्त झाला असल्याने त्यांचे विनंती अर्जानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (सेवा निवृत्त) नियम-१९८२ चे नियम ६६ अंतर्गत तरतुदी अन्वये अर्ज केल्या दिनांकापासुन तीन महिन्याचे आत सेवा निवृत्ती स्विकारली नाही तर तिन महीन्यानंतर सेवा निवृत्ती अंमलात येईल. अशी तरतुद असल्यामुळे स्वेच्छा निवृत्तीचे आदेश मंजूर करुन तीन महिने मुदतीच्या अंतिम दिनांकाच्या एक दिवस आधी निर्गमीत करणे उचीत आहे.

श्री. क्लासो जॉर्ज फर्नांडिस, सहाय्यक अग्निशमन अधिकारी यांची वेतनश्रेणी (९३००-३४८०० ग्रेड वेतन ४४००) अशी असुन सहाय्यक आयुक्त या पदाचे समकक्ष वेतनश्रेणीत त्यांचे वेतन असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ अंतर्गत तरतुदी अन्वये नियुक्ती प्राधिकरी मा. महासभा असल्याने श्री. क्लासो जॉर्ज फर्नांडिस, सहाय्यक अग्निशमन अधिकारी यांचे स्वेच्छा निवृत्तीस ही सभा मान्यता देत आहे. यापूढील प्रशासकीय कार्यवाही मा. आयुक्तांनी करावी.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करत आहे. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ०८ :-**

श्री. क्लासो जॉर्ज फर्नांडिस, उप-मुख्य अग्निशमन अधिकारी, यांच्या स्वेच्छा निवृत्तीबाबत.

**ठराव क्र. ०६ :-**

महानगरपालिका आस्थापनेवरील श्री. क्लासो जॉर्ज फर्नांडिस, सहाय्यक अग्निशमन अधिकारी दि. ०१/०४/१९९० पासून तत्कालीन नगरपरिषदेत वाहन चालक या पदावर नियुक्ती असुन, सद्यःस्थिती अग्निशमन विभागात पदोन्नतीने सहाय्यक अग्निशमन अधिकारी या पदावर कार्यरत आहेत.

श्री. क्लासो जॉर्ज फर्नांडिस, सहाय्यक अग्निशमन अधिकारी यांनी दि. १६/०२/२०१३ रोजीच्या अर्जामध्ये त्यांचा अखंडीत सेवेचा कालावधी २० वर्षापेक्षा जास्त झाला असल्याने, त्यांनी 'स्वेच्छा निवृत्ती' घेण्याचा निर्णय घेतला असुन दि. १६/०२/२०१३ रोजीचे विनंती अर्जाने कळविले आहे. श्री. क्लासो जॉर्ज फर्नांडिस, सहाय्यक अग्निशमन अधिकारी यांनी कार्यालयास विनंती अर्ज सादर केला त्यावेळी त्यांची २२ वर्षे सेवा पुर्ण झालेली आहे. श्री. क्लासो जॉर्ज फर्नांडिस, सहाय्यक अग्निशमन अधिकारी यांनी सेवा कालावधीत ज्या-ज्या विभागात काम केले त्या संबंधित विभागाकडून ना-देय दाखला मागणी केलेली आहे. त्यानुसार अग्निशमन विभाग, (उप-आयुक्त) व लेखा विभाग यांचेकडील ना-देय दाखला प्राप्त झालेले असुन महानगरपालिकेस त्यांचेकडून कोणत्याही प्रकारे येणे नाही.

प्रस्तावित उपरोक्त श्री. क्लासो जॉर्ज फर्नांडिस, सहाय्यक अग्निशमन अधिकारी यांचा अखंडीत सेवेचा कालावधी २२ वर्षे पेक्षा जास्त झाला असल्याने त्यांचे विनंती अर्जानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (सेवा निवृत्त) नियम-१९८२ चे नियम ६६ अंतर्गत तरतुदी अन्वये अर्ज केल्या दिनांकापासुन तीन महिन्याचे आत सेवा निवृत्ती स्विकारली नाही तर तिन महीन्यानंतर सेवा निवृत्ती अंमलात येईल. अशी तरतुद असल्यामुळे स्वेच्छा निवृत्तीचे आदेश मंजूर करुन तीन महिने मुदतीच्या अंतिम दिनांकाच्या एक दिवस आधी निर्गमीत करणे उचीत आहे.

श्री. क्लासो जॉर्ज फर्नांडिस, सहाय्यक अग्निशमन अधिकारी यांची वेतनश्रेणी (९३००-३४८०० ग्रेड वेतन ४४००) अशी असुन सहाय्यक आयुक्त या पदाचे समकक्ष वेतनश्रेणीत त्यांचे वेतन असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ अंतर्गत तरतुदी अन्वये नियुक्ती प्राधिकरी मा. महासभा असल्याने श्री. क्लासो जॉर्ज फर्नांडिस, सहाय्यक अग्निशमन अधिकारी यांचे स्वेच्छा निवृत्तीस ही सभा मान्यता देत आहे. यापूढील प्रशासकीय कार्यवाही मा. आयुक्तांनी करावी.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९, श्रीमती सिमा मिश्रा, सिस्टीम मॅनेजर (सध्या निलंबित) यांना सेवेत पुर्नस्थापित करणेबाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्रीमती सिमा मिश्रा, सिस्टीम मॅनेजर यांना विविध प्रकरणी हलगर्जीपणा व निष्काळजीपणा कारणास्तव कार्यालयाचे आदेश जा. क्र. मनपा/आस्था/७२७/२०१०-११, दि. ३०/०९/२०१० अन्वये निलंबीत करण्यात आलेले आहे. श्रीमती सिमा मिश्रा, यांचे निलंबन महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र. ७८,दि. ०१/०२/२०११ अन्वये कायम करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणी श्रीमती सिमा मिश्रा यांचेवर विविध दोन प्रकारचे आरोप ठेवून विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली होती. श्रीमती सिमा मिश्रा, यांचेवर ठेवण्यात आलेले आरोप खालीलप्रमाणे आहेत.

१) संगणक खरेदी,

२) मालमत्ता करातील नोंदीमधील फेरफार,

विभागीय चौकशीमध्ये वरील दोन आरोपांपैकी अ.क्र. ०२ दोषारोप सिध्द होत नसल्याचे चौकशी अहवालात निष्पन्न झालेले आहे आणि सदर दोन आरोपांबाबत चौकशी अहवालातील तपशिल विचारात घेता सदरचा चौकशी अहवाल स्विकृत करुन अ.क्र. ०२ चे आरोपांबाबत श्रीमती सिमा मिश्रा, यांना दोषमुक्त करण्यास हरकत नाही.

तथापि वरील अ.क्र. ०१ चा आरोप सिध्द झाल्याचे विभागीय चौकशीत निष्पन्न झाले आहे व तसेच श्रीमती सिमा मिश्रा, यांना संगणक खरेदीमध्ये आवश्यक ती सचोटी व कर्तव्यपारायणता न राखता जो हलगर्जीपणा व निष्काळजीपणाचा आरोप सिध्द झालेला आहे,

सबब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ५६ अन्वये श्रीमती सिमा मिश्रा यांची एक वार्षिक वेतन वाढ कायमस्वरुपी (पुढील वेतन वाढीवर परिणामासह) रोखण्याचे शास्ती लादण्याचे वेगळे आदेश काढण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी श्रीमती सिमा मिश्रा, यांची विभागीय चौकशी पूर्ण झालेली आहे आणि ज्याअर्थी विभागीय चौकशीत सिध्द झालेल्या आरोपाबाबत शास्ती लादण्याचे आदेश काढण्यात आलेले आहेत आणि ज्याअर्थी आरोपाचे स्वरुप, चौकशी अहवालातील तपशिल इत्यादी विचारात घेता आरोप क्र. ०१ मधील संगणक खरेदी प्रकारणी पुरवठादारास अंतिम देयक प्रदान करणे व संभाव्य नुकसान वसुलीस अधिंन राहून श्रीमती सिमा मिश्रा, यांना सेवेत पुर्नस्थापित करण्यास हरकत नाही.

आणि ज्याअर्थी श्रीमती सिमा मिश्रा, सिस्टीम मॅनेजर यांची मूळ वेतनश्रेणी रु. ९३००-३४८००, ग्रेड वेतनरु. ४४००, द्वितीय गटातील म्हणजे सहा. आयुक्त समकक्ष श्रेणीतील किंवा त्यापेक्षा जास्त श्रेणीतील असल्यामुळे अशा श्रेणीतील निलंबीत अधिकारी/कर्मचारी यांना सेवेत पुर्नस्थापित करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकरण म्हणून महानगरपालिका सभेस आहेत.

तरी अपचारीक तथा निलंबीत श्रीमती सिमा मिश्रा, सिस्टीम मॅनेजर यांना दोषारोप क्र. ०२ बाबत दोषमुक्त करुन आरोप क्र, ०१ मधील संगणक खरेदी प्रकरणी पुरवठादारास अंतिम देयक प्रदान करणे व संभाव्य नुकसान वसूलीस अधिन राहून महानगरपालिका सेवेत पुर्नस्थापित करणेबाबत ही सभा मान्यता देत आहे.परंतू असे करताना त्यांचा मूळ पदावर (सिस्टीम मॅनेजर) आता आणि यापूढे कधीही नेमणूक करण्यात येऊ नये. त्यांना महापालिकेच्या इतर कोणत्याही पदावर रुजू करण्यांत यावे, असा मी ठराव मांडत आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर करत आहे.

**प्रकरण क्र. ०९ :-**

श्रीमती सिमा मिश्रा, सिस्टीम मॅनेजर (सध्या निलंबित) यांना सेवेत पुर्नस्थापित करणेबाबत

**ठराव क्र. ०७ :-**

श्रीमती सिमा मिश्रा, सिस्टीम मॅनेजर यांना विविध प्रकरणी हलगर्जीपणा व निष्काळजीपणा कारणास्तव कार्यालयाचे आदेश जा. क्र, मनपा/आस्था/७२७/२०१०-११, दि. ३०/०९/२०१० अन्वये निलंबीत करण्यात आलेले आहे. श्रीमती सिमा मिश्रा, यांचे निलंबन महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र. ७८,दि. ०१/०२/२०११ अन्वये कायम करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणी श्रीमती सिमा मिश्रा यांचेवर विविध दोन प्रकारचे आरोप ठेवून विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली होती. श्रीमती सिमा मिश्रा, यांचेवर ठेवण्यात आलेले आरोप खालीलप्रमाणे आहेत.

१) संगणक खरेदी,

२) मालमत्ता करातील नोंदीमधील फेरफार,

विभागीय चौकशीमध्ये वरील दोन आरोपांपैकी अ.क्र. ०२ दोषारोप सिध्द होत नसल्याचे चौकशी अहवालात निष्पन्न झालेले आहे आणि सदर दोन आरोपांबाबत चौकशी अहवालातील तपशिल विचारात घेता सदरचा चौकशी अहवाल स्विकृत करुन अ.क्र. ०२ चे आरोपांबाबत श्रीमती सिमा मिश्रा, यांना दोषमुक्त करण्यास हरकत नाही.

तथापि वरील अ.क्र. ०१ चा आरोप सिध्द झाल्याचे विभागीय चौकशीत निष्पन्न झाले आहे व तसेच श्रीमती सिमा मिश्रा, यांना संगणक खरेदीमध्ये आवश्यक ती सचोटी व कर्तव्यपारायणता न राखता जो हलगर्जीपणा व निष्काळजीपणाचा आरोप सिध्द झालेला आहे,

सबब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ५६ अन्वये श्रीमती सिमा मिश्रा यांची एक वार्षिक वेतन वाढ कायमस्वरुपी (पुढील वेतन वाढीवर परिणामासह) रोखण्याचे शास्ती लादण्याचे वेगळे आदेश काढण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी श्रीमती सिमा मिश्रा, यांची विभागीय चौकशी पूर्ण झालेली आहे आणि ज्याअर्थी विभागीय चौकशीत सिध्द झालेल्या आरोपाबाबत शास्ती लादण्याचे आदेश काढण्यात आलेले आहेत आणि ज्याअर्थी आरोपाचे स्वरुप, चौकशी अहवालातील तपशिल इत्यादी विचारात घेता आरोप क्र. ०१ मधील संगणक खरेदी प्रकारणी पुरवठादारास अंतिम देयक प्रदान करणे व संभाव्य नुकसान वसुलीस अधिन राहून श्रीमती सिमा मिश्रा, यांना सेवेत पुर्नस्थापित करण्यास हरकत नाही.

आणि ज्याअर्थी श्रीमती सिमा मिश्रा, सिस्टीम मॅनेजर यांची मूळ वेतनश्रेणी रु. ९३००-३४८००, ग्रेड वेतनरु. ४४००, द्वितीय गटातील म्हणजे सहा. आयुक्त समकक्ष श्रेणीतील किंवा त्यापेक्षा जास्त श्रेणीतील असल्यामुळे अशा श्रेणीतील निलंबीत अधिकारी/कर्मचारी यांना सेवेत पुर्नस्थापित करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकरण म्हणून महानगरपालिका सभेस आहेत.

तरी अपचारीक तथा निलंबीत श्रीमती सिमा मिश्रा, सिस्टीम मॅनेजर यांना दोषारोप क्र. ०२ बाबत दोषमुक्त करुन आरोप क्र. ०१ मधील संगणक खरेदी प्रकरणी पुरवठादारास अंतिम देयक प्रदान करणे व संभाव्य नुकसान वसूलीस अधिन राहून महानगरपालिका सेवेत पुर्नस्थापित करणेबाबत ही सभा मान्यता देत आहे.परंतू असे करताना त्यांचा मूळ पदावर (सिस्टीम मॅनेजर) आता आणि यापुढे कधीही नेमणूक करण्यात येऊ नये. त्यांना महापालिकेच्या इतर कोणत्याही पदावर रुजू करण्यांत यावे, असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील        अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

मी पत्र वाचून दाखवतो. (पत्राचे वाचन केले.)

**प्रभात पाटील :-**

शोक प्रस्ताव आणि एक अभिनंदनाचा प्रस्ताव आहे.

**मा. महापौर :-**

सभा संपली नाही.

**नगरसचिव :-**

ओवळा माजीवडा १४६ ह्या मतदार नोंदणी अधिकारी पोवार मॅडम, आल्या आहेत त्या आपल्याला थोडीशी माहिति देतील.

**शारदा पोवार (मतदान नोंदणी अधिकारी) :-**

नमस्कार. सन्मा. व्यासपिठ आणि ह्या सभागृहातले सर्व सन्मा. सदस्य मी प्रथम माझी ओळख करुन देते. मी १४६ ओवळा माजीवडा विधान संघाची मतदार नोंदणी अधिकारी आहे. माझ्याकडे ठाणे महानगरपालिका आणि मिरा भाईंदर पालिकेतील जे वॉर्ड क्र. आहेत. ९ ते १६ ३७ ते ४० आणि ४५ असे वॉर्ड क्र. येतात. आणि ह्या अंतर्गत आज ह्या महासभेत येण्याच प्रयोजन म्हणजे आमचा फोटो कार्यक्रम चालू आहे. मतदार यादीमध्ये ज्या मतदारांचे फोटो नाहीत. अशा मतदारांचे फोटो गोळा करण्याचे काम घरोघरी आम्ही पर यादी भाग बी.एल.ओ. केंद्र स्तरीय अधिकारी नेमलेले आहेत. आणि त्यांच्या मार्फत करत आहोत. परंतु आतापर्यंतचा अनुभव पाहता मिरा भाईंदर एरियामध्ये कम्प्यारिटीव्हली खूप कमी प्रमाणात फोटो गोळा होतात. ह्यामुळे आपला सहभाग आम्ही ह्या ठिकाणी अपेक्षित केलेला आहे. आपल्याकडून जास्तीत जास्त सहकार्य आणि प्रशासन तर्फे आणि निवडणूक प्रतिनिधी आहेत ह्याच्याकडून जास्तीत जास्त सहकार्य मिळावे ह्यासाठी मी इथे अपस्थित आहे. सर्वात महत्वाचा मुद्दा असा आहे की, हा जो प्रोग्राम आहे त्यामध्ये फक्त नमुना नं. ८ आहे. ज्या मतदाराचा यादीभागामध्ये फोटो नाही. आमचे बी.एल.ओ. ज्यावेळी घरोघरी जातील. त्यावेळेस त्याच्यासाठी हे रेस्यूड्यूअल इलेक्ट्रोक रजिस्टर असणार. त्या रजिस्टरमध्ये ज्या मतदारांचे फोटो नाहीत अशांची यादी असणार. आणि घरोघरी जाऊन त्यांचे फोटो गोळा करुन ती माहिती बरोबर आहे की नाही, नसेल तर लाल पेनानी करेक्शन हे मेमो ते त्या ठिकाणी करतील. आणि असे फोटो गोळा झाल्यानंतर त्यातले काही स्थलांतरीत असतील, काही डिलीट असतील, काही मयत असतील तर हे पुढे आपल्याला वगळ्याची

कार्यवाही करण्यासाठी हा प्रोग्राम घेतला आहे. ह्यात आम्हाला जास्तीत जास्त अपेक्षा अशी आहे की, माझा मिरा भाईंदर एरिया जो आहे साधारतः पूर्व भाग येतो तर त्या एरियामध्ये आजमितीस एक लाखाच्या आसपास फोटो येणे बाकी आहे आणि माझे पूर्ण मतदार संघाचे एकूण एक लाख पंचेचाळीस हजार फोटो येणे बाकी आहे. त्यापैकी मिरा भाईंदरचा जो वाटा आहे तो खूप मोठा आहे. माझी सगळ्यांना ह्या ठिकाणी विनंती आहे की, आपण सुध्दा आपल्या एरियामध्ये आपल्या कार्यकर्त्यांमार्फत किंवा आपले कोणी कोऑर्डिनेटर असतील ह्यांच्यामार्फत जास्तीत जास्त प्रसिध्दी करुन आता सध्या आपला अभिनव शाळेमध्ये प्रोग्राम चालू आहे. हा प्रोग्राम आपण पूर्ण मे महिन्यात घेत आहोत. त्यासाठी तेथे सेटअप सुध्दा उभारणार आहोत. आणि तात्काळ आयकार्ड देण्याचे त्या ठिकाणी योजना ठेवलेली आहे. त्यात तुमचे सहकार्य मी अपेक्षित केलेले आहे. अशाप्रकारे मतदारांनी ८ नंबरचा फॉर्म भरायचा आहे. त्याच्यावर फोटो लावायचा आहे. आणि त्याने फोटो संदर्भात अशा प्रकारे एक नमुना द्यायचा आहे. जेणेकरुन त्यांना तिकडे आपण तात्काळ आयकार्ड वितरीत करु शकणार.

**शारदा पोवार (मतदान नोंदणी अधिकारी) :-**

या दृष्टीकोनातून आपल्याला सर्वांना विनंती आहे की, सध्या आमचा मतदान ओळखपत्र वाटपाचा कार्यक्रम चालू आहे याचा आपल्या मतदारांना लाभ घ्यावा ही विनंती.

**प्रभात पाटील :-**

मॅडम, यामध्ये नगरसेवक निवडणुक लढवत असतात त्यांना त्यांच्या वॉर्डमधील मतदारांबद्दल माहिती असते एखादी इमारत तुम्ही बघितली तर त्याच्यामध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त लोक स्थलांतर झालेले आहेत त्याच्यामध्ये तुम्ही ते वगळा. कारण तुम्हाला आत्ता हे काम करताना त्रास होणार आहे कारण हे लोक शिफ्टींग झालेले आहेत आणि आपण त्यांना काऊंट करतो त्यामुळे आकडाही चुकलेला वाटतो आणि तुम्हाला प्रशासकीय बाबी निर्माण होतात आणि आम्हाला बोगस मतदानाला फेस करावे लागते तर जेव्हा आपले लोक त्या इमारतीमध्ये जातील तर तिथल्या सोसायटीचे अध्यक्ष किंवा सेक्रेटरी यांना जर हाताशी धरले आणि ती नावेच वगळून टाकली तर हा मुद्दा तुमच्यासाठी सुध्दा फायदेशीर ठरेल आणि आम्हालाही खुपसा फायदा होईल.

**शारदा पोवार (मतदान नोंदणी अधिकारी) :-**

मॅडम, या यादीसोबत आपण नोटीससुध्दा वाटत आहोत त्याच्यामध्ये शिफ्टेड, डिलीटेड, दुबार अशा तीन प्रकारच्या नोटीस आहेत त्याठिकाणी तो व्यक्ती आहे की नाही हे त्याचे लास्ट व्हेरीफीकेशन असणार आणि त्यानंतर तो जर हजर झाला नाही तर त्याच्या डिलीशनची कार्यवाही सुमोटो या लो लेव्हलवर केली जाणार त्याची काळजी घेतली जाईल.

**राजेश वेतोसकर :-**

मॅडम, एक शंका अशी आहे की, माझ्या वॉर्डमध्ये प्रत्येक यादीमध्ये चुकीचे ॲड्रेस आहेत एका बिल्डींगच्या ॲड्रेसवर कमीत कमी दहा दहा इमारतींच्या मतदारांची नावे आलेली आहेत आणि वारंवार तक्रारी करुनसुध्दा त्याप्रकारे बायफर्गेशन केलेले नाही सोसायटींच्या लेटरहेडवर आम्ही मतदारांची यादीपण दिलेली आहे पण तरीसुध्दा त्या इमारतींच्या नावाखाली त्यांची नावे येत नाहीत एकाच इमारतीमध्ये सर्व इमारतींच्या मतदारांची नावे येतात खास करुन २१,१९,२०,१३,१२ या सर्व पार्टमध्ये दहा दहा इमारतींची नोव एकत्र आलेली आहेत.

**शारदा पोवार (मतदान नोंदणी अधिकारी) :-**

मास करेक्शनचा प्रोग्राम अजून आमच्याकडे आला नाही परंतु इंडीव्हीज्युअली जो अर्जदार येईल तर त्याने नमुना क्र.८(अ) भरल्यानंतर किंवा आणखीन दुसरी गोष्ट आहे, ज्याचे कार्ड बाकी असेल, तर त्याने येऊन जरी प्रुफ दिला तर त्याचा जो सेक्शन मागच्या बाजुला असतो, आम्ही ॲड्रेस ऑन द स्पॉट दुरुस्त करुन देतो याच्यामध्ये एकच फरक आहे की, यापूर्वी एजन्सीकडे हा प्रोग्राम होता आत्ता हा ईआरओ लेव्हलला आहे म्हणजे एकदम डाऊन लेव्हलला दिलेला आहे त्यामुळे तुमचे आमचे जे काही प्रॉब्लेम आहेत, ते आम्ही आमच्या स्तरावरसुध्दा करेक्ट करु शकतो.

**राजेश वेतोसकर :-**

मॅडम, आमच्याकडे रोज यादी असते म्हणून आम्हाला समजते सामान्य नागरीकांना मतदारांना इमारती नसल्यामुळे त्यांचे नावच शोधता येत नाही.

**शारदा पोवार (मतदान नोंदणी अधिकारी) :-**

याच्यासाठी एक फक्त माहिती की, ज्याचे नाव आपल्याला शोधायचे असेल, आपणसुध्दा तो एक्सरसाईज आपल्या मतदारा संघात करु शकतो की, त्याचे नाव जर आपल्या सीईओ च्या साईटवरुन सर्व इंजिनवरुन टाकले तर त्याचे नाव कुठे-कुठे आहे हे येऊ शकते म्हणजे जरी दुबार असेल तरी ते त्या ठिकाणी दिसते.

**वंदना चक्रे :-**

मॅडम आपण १४६ चे सांगितले १४५ चे कोणाकडे आहे?

**शारदा पोवार (मतदान नोंदणी अधिकारी) :-**

१४५ चे ए.ई.आर.ओ. माझ्याबरोबर आलेले आहेत त्यांच्याकडे मिरा भाईंदर आहे.

**वंदना चक्रे :-**

१४५ चा बुथ कुठे असणार? जसे इथे सांगितले की, शाळा आहे तर १४५ चे सांगावे.

**नितीन चव्हाण (सहा. मतदान नोंदणी अधिकारी) :-**

नमस्कार, मी नितीन चव्हाण, सहा. मतदान नोंदणी अधिकारी, १४५ मिरा भाईंदर मतदार संघ १४५ मिरा भाईंदर मतदार संघाचे कार्यालय आत्तापर्यंत नगरभवन येथे होते तिकडे सध्या एक सेट अप सुरु आहे पण आम्हाला या आठवड्यामध्ये राम नगर येथे जागा मिळालेली आहे तिकडे आम्ही ती शिफ्ट करणार आहोत तिथे कोणी जाऊ नये सध्या भाईंदरसाठी चंदुलाल चाळ, जुने तलाठी कार्यालय आहे तिथे आपला एक सेटअप सुरु आहे तिथे आपले मतदार फोटो घेऊन गेले तर आम्ही तिकडे कोरे आठ नंबरपण ठेवलेले आहेत तिथे नाव शोधुन फोटो चिकटवून दिला, सही करुन दिले तर तिथल्या तिथे ॲक्सेप्ट होणार आहे.

**अशरफ शेख :-**

तुम्ही आयडेन्टीफिकेशन प्रुफचे सांगितले आत्ता मॅडमनी सांगितले की, आम्ही ते फोटो त्वरीत करुन देऊ परंतु, ज्या लोकांनी तीन चार वर्षापूर्वी ऑलरेडी दिलेले आहे अजूनपर्यंत त्यांचे आयडेन्टी कार्ड आलेले नाहीत, त्याबद्दल तुम्हाला काय बोलायचे आहे आणि दुसरे आत्ता तुम्ही सांगितले की, आम्ही दुरुस्ती करुन देऊ त्या दुरुस्ती करणे म्हणजे नावामध्ये दुरुस्ती करणे किंवा ॲड्रेसमध्ये दुरुस्ती करणे याच्या पावर तुम्हाला आहेत का? हे मला तुम्हाला विचारायचे आहे.

**शारदा पोवार (मतदान नोंदणी अधिकारी) :-**

याच्यामध्ये आत्ता तुमचा जो पहिला प्रश्न सांगितलेला होता, फोटोच्या संदर्भात तो आयकार्ड तात्काळ इथेच आमच्या लेव्हलला व्हायचे जसे मी मागे सांगितले पूर्वी वक्रांगी किंवा अतिषा इन्फोटक अशा एजन्सीज नेमलेल्या होत्या त्यांचा प्रॉब्लेम असा व्हायचा की, आम्ही फिल्ड लेव्हलवरुन सर्व मटेरीअल गोळा करुन त्या एजन्सीपर्यंत पोहोचवायचे मिनव्हाईल एजन्सी ज्यावेळेस टायपिंग मिस्टेक, शारदाचे शरद जरी झाले तरी तो प्रॉब्लेम व्हायचा तर हे ज्या मेजर मिस्टेक झालेल्या आहेत, परंतु आत्ता आमच्या लेव्हलला ही सगळी यंत्रणा असल्या कारणास्तव त्याच्यामध्ये आत्ता इंम्प्रुव्हमेंटची शक्यता जास्त आहे.

**अशरफ शेख :-**

परंतु, त्या लोकांचे आयडेन्टी कार्ड अजूनपर्यंत मिळालेले नाहीत त्यांचे काय?

**बर्नट डिमेलो :-**

मॅडम, ज्यांचे फोटो यादीमध्ये आहेत पण कार्ड पोहोचलेले नाहीत, त्यांनी काय करावे?

**शारदा पोवार (मतदान नोंदणी अधिकारी) :-**

सध्या त्यांचे यादीमध्ये जर फोटो आहेत, जर होऊ घालणाऱ्या इलेक्शनचा उद्देश लक्षात घेता त्यांना मेन जो मतदार यादीमध्ये मदर रोल आहे हा इंम्प्रुव्ह करणे गरजेचे आहे तर ज्यावेळेस मतदार येणार, त्यांच्याकडे मतदार यादीत फोटो असल्यानंतर प्रश्नच उरत नाही सध्याचा जो प्रोग्राम आहे त्या प्रोग्रामप्रमाणे आपल्याला काम करावे लागते नाहीतर सहा नंबर सात नंबर, आठ नंबर, आठ (अ) हे तुम्ही वर्षभरात कधीही देऊ शकता.

**अशरफ शेख :-**

मॅडम, तुम्ही माझ्या दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर दिले नाही नाव दुरुस्ती किंवा ॲड्रेस दुरुस्ती या पावर तुम्हाला आहेत का?

**शारदा पोवार (मतदान नोंदणी अधिकारी) :-**

आहेत, त्यासाठी आपल्याला इंडीव्हिज्युअल ज्या व्यक्तीचे नाव दुरुस्त करायचे असेल तर त्यांनी फॉर्म भरायचा. त्या फॉर्मच्या संदर्भात सांगत, नविन नाव ॲड करायचे असेल तर सहा नंबरचा फॉर्म भरायचा डिलीट करायचे असेल तर सात नंबरचा आणि दुरुस्तीच्या बाबतीत मतदार यादीतील जे काही तपशिल असतील नाव, वय, लिंग किंवा इतर नाते संबंधात तर त्यासाठी मात्र फॉर्म नं.८ आणि ८ (अ) जो आहे तर तो मतदार संघाच्या एका यादीभागातून दुसऱ्या भागात जर गेला असेल तर त्यासाठी आहे.

**वंदना चक्रे :-**

मॅडम, आम्ही स्वतः उमेदवार किंवा नगरसेवक असताना आमच्या फॅमिलीचे यादीवर फोटो आहेत पण अजूनपर्यंत आमच्याकडे आयकार्ड नाही हे दुर्देव आहे सांगायला लाज वाटते. कार्डची चौकशी करावी दुसरे की, जसे आपण सांगितले की, या ठिकाणी लावलेले आहेत आत्ता तुम्ही नविन ठिकाणी मिरारोडला पण लावता तुमचे जे कर्मचारी आहेत, त्यांनी घरोघरी जाऊन करणे हे अतिशय बरे पडेल किंवा तुम्ही सुचना द्यावी की, महानगरपालिकेच्या वतीने एखादे सर्क्युलर किंवा पत्र काढावे आणि ते संबंधीत नगरसेवकांना, विश्वासात घेऊन त्यांनी त्यांना संपर्क साधावा की, ज्यांचे वोटर लिस्टमध्ये नाव नाही ज्यांचे आयडी कार्ड नाही, तर तुम्हाला ते खुप इजी होईल अशी माझी सुचना आहे.

**शारदा पोवार (मतदान नोंदणी अधिकारी) :-**

आपल्या मार्फत प्रशासनाला सुध्दा हिच विनंती करु इच्छिते, आम्ही जे बी एल ओ अपॉईंट केलेले आहेत ते जर तात्काळ रिलीज केले तर मला ते बीएलओ मिळू शकतील आज एकंदरीत १५८ यादी भागांसाठी माझे फक्त ४६ बीएलओ कार्यरत आहेत. ४६ लोकांकडून काम करुन घेताना मला काय अडचणी येतात त्या मी आत्ता तुमच्यासमोर मांडलेल्या आहेत मला इथे येण्याचे कारणच हे होते की, मला तुमच्या सहभागातून हे अपेक्षित आहे मला जर मॅन पॉवर मिळाली तर आय विल डेफिनेटली इम्प्रुव्ह मायसेल्फ.

**वंदना चक्रे :-**

मॅडम, माझ्या कार्डचे उत्तर दिले नाही मी आधीपासून राहते मागच्या वेळेसपण निवडून आले होते आत्तापण आले पण आमचे कार्ड नाही आमचे कार्ड कसे मिळतील ते सांगा.

**शारदा पोवार (मतदान नोंदणी अधिकारी) :-**

*यापूर्वी सुध्दा डूप्लीकेट कार्ड देण्याची पध्दत होती ज्यांचे कार्ड हरवलेले आहे, खराब झालेले आहे,* दुरुस्ती असेल तर अशा लोकांनासुध्दा पंचवीस रुपये भरुन आपण डुप्लीकेट कार्ड दिलेले आहेत. परंतु, सध्या भारत निवडणुक आयोगाचा फक्त एक मोटो आहे की, मतदार यादीतील जे फील इन द ब्लँक असतील, म्हणजे ज्या मतदारांचे फोटो नसतील ते फील अप करणे हा सध्या प्रोग्राम आहे.

**वंदना चक्रे :-**

याच्यावर आपण पूढे इलेक्शन अधिकाऱ्यांना विचारावे सुचना पुढे पोहोचवावी की, ज्यांचे नाहीत त्यांच्यासाठी पुढचा काय कार्यक्रम असेल.

**शारदा पोवार (मतदान नोंदणी अधिकारी) :-**

याबाबतचा काही प्रोग्राम आला तर त्याची प्रसिध्दी आम्ही याच सभागृहात करु.

**शिल्पा भावसार :-**

मॅडम, माझे एक म्हणणे आहे की, आपल्याला जे फॉर्म नाव टाकण्यासाठी भरुन देतात तर त्याच्यात आपण चुक न करता व्यवस्थीतपणे फॉर्म भरतो आणि त्याच्याबरोबर जास्तीत जास्त प्रुफ लावतो तरीही ते टायपिंग करताना नवऱ्याच्या जागेवर सासऱ्यांचे नाव असते आणि मुलाचे नाव बदललेले असते ते सगळे कसे काय होते? वोटींग करताना त्यांना त्रासपण होतो कारण त्यांच्याकडे तसा प्रुफ नसतो म्हणजे अशा लोकांची पण वोटींग होऊ शकत नाही त्याचे नुकसान आम्हाला भोगावे लागते त्यासाठी आत्ता काय...

**शारदा पोवार (मतदान नोंदणी अधिकारी) :-**

आम्ही तुमच्या मताशी सहमत आहोत, मी आत्ता तोच मुद्दा सांगितला की, यापूर्वीची एक्सरसाईज ही एजन्सी लेव्हलला व्हायची एजन्सीने ऑपरेटर कशा पध्दतीने नेमले, त्याच्यावर ते नाव फीड व्हायचे नॉन महाराष्ट्रीयन असला तर त्या पध्दतीने स्पेलिंग मिस्टेक व्हायच्या तर हे कमी होण्यासाठी आत्ता हे सगळे आमच्या ऑफिसला आलेले आहे. हाच मुद्दा आहे की, याच्यातील हा डिफरन्स आहे. म्हणजे जे काही होणार, तुम्ही आज जरी माझ्या ऑफिसमध्ये आलात तर तुम्हाला कार्ड मिळू शकते.

**शिल्पा भावसार :-**

मॅडम, ज्यांचे आयकार्ड बनलेले आहेत आणि ते त्यांच्यापर्यंत पोहोचलेले नाहीत, तर त्यांच्यासाठी काय करायचे? आणि ते कुठे मिळू शकतील?

**शारदा पोवार (मतदान नोंदणी अधिकारी) :-**

आमच्या ऑफीसमध्ये आणि बी.एल.ओ. मार्फत जे आता घरोघर करतात ते आयकार्ड वाटपाचे चालू आहे.

**मा. महापौर :-**

*मॅडम, तुमचे ऑफिस किंवा भेटण्याचे कुठे काय आहे ते त्यांना द्या. हा न संपणारा विषय आहे.*

**शिल्पा भावसार :-**

तुमच्याकडे कोणकोणते वॉर्ड आहेत ते पण आम्हाला सांगा,

**मा. महापौर :-**

हा न संपणारा विषय आहे तर तुम्ही त्यांना तुमचा नंबर, ॲड्रेस किंवा मेल आयडी, काहीतरी द्या.

**शिल्पा भावसार :-**

साहेब, तुमच्याकडे कोणकोणते वॉर्ड आहेत, ते तरी आम्हाला सांगा. मग आम्हाला समजेल.

**मा. महापौर :-**

१४५ उनके पास है। १४६ मॅडम के पास है।

**फरिद कुरेशी :-**

१४५ चा नंबर द्या आणि मग १४६ चा नंबर द्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम, एक सजेशन असे आहे की, तुमचे जे काम आहे, तुम्ही आमच्या मार्फत हलके करुन घेणार. आणि ते काम करुन घेणार. परंतु, आमची जी समस्या आहे ती तुम्ही कधी सॉल्व करु शकत नाही. ज्या लोकांचे आयडेन्टी कार्ड आलेले नाहीत, ते तुम्ही अजूनही देऊ शकत नाहीत. तुम्ही तुमचे काम करण्यासाठी

इथे आलात परंतु, तुमचे जे बी.एल.ओ. आहेत तुमचा जो स्टाफ आहे, हे आयुष्यात करु शकत नाहीत. कारण त्यांना प्रॅक्टीकल नॉलेज नाही. हे नॉलेज आम्हाला आहे. एका बिल्डींगमध्ये, एका बिल्डींगचे नाव आहे आणि त्यामध्ये तीन-तीन बिल्डींगमधील लोकांची नावे येतात. ते तुमचा माणूस सॉल्व करु शकतच नाही. म्हणून तुमच्या बी.एल.ओ. ना सांगा की, नगरसेवकांना कॉन्टॅक्ट करा. म्हणजे आम्ही तुम्हाला परफेक्टली सर्वे देऊ की, या बिल्डींगमध्ये याचे नाव आहे आणि प्लस त्याच्यामध्ये आणखीन एक आहे की, जर समजा एखादा माणूस या बिल्डींगमधून या बिल्डींगमध्ये गेला, तो पण आम्ही तुम्हाला डिक्टेक्ट करुन देऊ शकतो. आणि आम्ही तुम्हाला गाईड करु शकतो. आणि तुम्ही आता दोघांचे नंबर द्या. ते आम्ही लिहून घेतो आणि याच्या व्यतिरिक्त तुम्हाला आणखीन एक विनंती आहे की, तुम्ही हे असे करण्यापेक्षा मागे श्री. शितोळे साहेबांनी जशी एक मोहिम काढली होती, तशी मोहिम, जर तुमचे बी.एल.ओ. घरोघरी गेले आणि जर फ्रेश यादी बनवली तर ती यादी परफेक्ट बनू शकेल. कारण आमच्या सीटीमध्ये स्थलांतर संख्या खूप जास्त आहे. म्हणजे आज हा माणूस इथे राहतो, तो माणूस दोन वर्षांनी लगेच दुसरीकडे जातो. त्यामुळे स्थलांतर भरपूर आहे. तुम्ही आता जे एक लाख सांगितले, त्यामध्ये जवळ-जवळ साठ ते सत्तर हजार लोक तुम्हाला अव्हेलेबल होऊ शकत नाहीत. कारण ते लोक तिथे राहातच नाहीत. तुमचा बी.एल.ओ. शोधणार आणि त्यांना ते सापडणारच नाही. परंतु, तो माणूस तिथे राहात आहे, पण तुमच्या बी.एल.ओ. ला माहिती नाही. हे आम्हाला माहिती आहे. कारण आम्ही तीन-तीन इलेक्शनला त्यांच्याकडे जातो. एम.ऐल.ए. च्या इलेक्शनला, पार्लमेंटच्या इलेक्शनला आणि कॉर्पोरेशनच्या इलेक्शनला. त्यामुळे तुमच्या बी.एल.ओ. ला स्ट्रीक्ट वॉर्निंग द्या की, तुम्ही तुमच्या नगरसेवकांना कॉन्टॅक्ट करा. जर नगरसेवक कॉन्टॅक्टमध्ये नसेल तर आमचा पक्ष आहे, त्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना कॉन्टॅक्ट करा.

**शारदा पोवार (मतदान नोंदणी अधिकारी) :-**

साहेब, आपली सुचना मान्य आहे. पण त्यात आणखीन एक दुरुस्ती अशी आहे की, भारत निवडणूक आयोगाने जशा सुचनेप्रमाणे आम्ही प्रत्येक यादी भागाल एक बी.एल.ओ. नेमलेला आहे. तसे आपल्या पण पक्षामार्फत एका यादी भागाला एक बी.एल.ओ. नेमणे अपेक्षित आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आमची यादी रेडी आहे. पण तुमचीच यादी रेडी नाही.

**शारदा पोवार (मतदान नोंदणी अधिकारी) :-**

तुमची यादी मिळाली तर त्या माणसाशी को-ऑर्डीनेट करायची जबाबदारी माझी राहणार. आमचा नंबर देते. मी शारदा पोवार, १४६, ई.आर.ओ., माझे डेझीग्नेशन डेप्युटी कलेक्टर. मी कलेक्टर ऑफिसला थर्ड फ्लोअरवर बसते. आणि माझे १४६ चे जे ऑफिस आहे, ओवळा माजीवडा प्रभाग समिती कार्यालय जे आहे, माजीवडाचे प्रभाग समिती कार्यालय, तिसरा मजला, बाळकुम माझा मोबाईल नं. ७३५०५१९००० असा आहे.

**नितीन चव्हाण (सहा. मतदान नोंदणी अधिकारी) :-**

१४५ मिरा भाईंदर विधानसभा मतदार संघासाठी श्री. अजिंक्य पडवळ म्हणून मतदान नोंदणी अधिकारी आहेत. त्यांचा नंबर ९८२०४७०९०९ असा आहे. मी सहाय्यक मतदान नोंदणी अधिकारी आहे. माझे नाव श्री. नितीन चव्हाण.

**प्रभात पाटील :-**

तुमच्याकडे काही निवेदन असेल ना? मतदारांना काही निवेदन वगैरे छापले असेल ना?

**शारदा पोवार (मतदान नोंदणी अधिकारी) :-**

आमच्या माजीवडाच्या ऑफिसचा पण एक नंबर आहे २५४०६१८२.

**नितीन चव्हाण (सहा. मतदान नोंदणी अधिकारी) :-**

माझा नंबर घ्या ८८९८९८१८१८ आणि मिरा भाईंदरच्या सी.पी.एस. चा नंबर आहे २८१८४४४०.

**जुबेर इनामदार :-**

१४५ चे केंद्र कुठे आहे?

**नितीन चव्हाण (सहा. मतदान नोंदणी अधिकारी) :-**

पुढच्या आठवड्यापासून रामनगरला एक सेंटर असेल. आम्हाला आता मिरारोडला एक जागा मिळालेली आहे. तिथे एक असणार आणि भाईंदर वेस्टला चंदुलाल चाळ म्हणून आहे. तिथे जुने तलाठी कार्यालय होते तिथे सेंटर चालू आहे.

**शारदा पोवार (मतदान नोंदणी अधिकारी) :-**

आजच्या सभेमध्ये आमचा विषय घेतला. त्याबद्दल मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब आणि सर्वांचे आभार व्यक्त करते. धन्यवाद.

**प्रभात पाटील :-**

हिंदी चित्रपट सृष्टीतील आपले सर्वांचे आवडते खलनायक श्री. प्राण किशन सिकंद यांना यावर्षीचा दादासाहेब फाळके पुरस्कार बहाल झालेला आहे. त्याबद्दल ही मा. महासभा त्यांचे अभिनंदन करीत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**अभिनंदन ठराव क्र. ०८ :-**

हिंदी चित्रपट सृष्टीतील आपले सर्वांचे आवडते खलनायक श्री. प्राण किशन सिकंद यांना यावर्षीचा दादासाहेब फाळके पुरस्कार बहाल झालेला आहे. त्याबद्दल ही मा. महासभा त्यांचे अभिनंदन करीत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पत्रकार श्री. राजा मयाल यांचे वडील श्री. महिपाल सिंह मयाल यांचे वयाच्या ७६ व्या वर्षी दुःखद निधन झाले आहे. म्हणून शोकप्रस्ताव मांडत आहे.

**नगरसचिव :-**

सर्वांनी दोन मिनिटे उभे राहून मृतात्म्यास श्रध्दांजली वाहायची आहे.

**दुःखवठा ठराव क्र. ०९ :-**

पत्रकार श्री. राजा मयाल यांचे वडील श्री. महिपाल सिंह मयाल यांचे वयाच्या ७६ व्या वर्षी दुःखद निधन झाले आहे. म्हणून शोकप्रस्ताव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

आजची सभा संपली असे जाहिर करण्यांत येत आहे.

**सभा संपल्याची वेळ - दु. २.२० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. ०६/०७/२०१३

## //गोषवारा//

**प्रकरण क्र. २२ :-** **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २, कलम ५(२)(ब) तसेच महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेवर पाच नामनिर्देशित पालिका सदस्यांची नियुक्ती करणे.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५(२)(ब) व महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेवर पाच नामनिर्देशित पालिका सदस्यांची नियुक्ती करणे आवश्यक असल्याने सदर प्रक्रियेस सुरुवात करून दि.०५/०४/२०१३ रोजी अर्ज स्विकारण्यासाठी वेळ निश्चित करण्यात आलेली होती. सदर दिवशी एकुण १५ अर्ज महानगरपालिकेस प्राप्त झालेली आहेत.

दरम्यान दि. ४/४/२०१३ रोजी भारतीय जनता पक्षाच्या सदस्या सौ. सिमा महेंद्र जैन (प्रभाग क्र. ३६ (अ)) यांनी नगरसेवक पदाचा राजीनामा दिल्यामुळे मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी दि.०८/०४/२०१३ रोजीच्या पत्रान्वये भारतीय जनता पार्टीचे सुधारीत तौलानिक संख्यांबळ २८ इतके असल्याचे महानगरपालिकेस कळविले आहे.

सद्यस्थितीत महानगरपालिकेतील पक्षीय बलाबल खालीलप्रमाणे आहे :-

| पक्षाचे नाव | संख्याबळ |
|---|---|
| भारतीय जनता पार्टी | २८ |
| राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी<br>(विभागीय आयुक्त यांचे दि.२४/०९/२०१२ च्या पत्रान्वये अपक्ष नगरसेवक श्री. मुन्ना सिंग यांनी राष्ट्रवादीला पाठींबा दिलेला आहे.) | २७ + १ = २८ |
| भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | १९ |
| शिवसेना<br>(विभागीय आयुक्त यांचे दि.२४/०९/२०१२ च्या पत्रान्वये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नगरसेवक श्री. अरविंद ठाकूर यांनी शिवसेनेला पाठींबा दिलेला आहे.) | १४ + १ = १५ |
| बहुजन विकास आघाडी | ३ |
| **एकुण** | ९३ |

महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ मधील नियम ५ (१) च्या पहिल्या परंतुकच्या तरतुदीमध्ये पक्षांचे किंवा गटांचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे

तौलानिक संख्याबळ विचारात घेउन नामनिर्देशित सदस्य म्हणून नामनिर्देशन करण्यासाठी शिफारस करतांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१अ अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी कळविल्यानुसार वरीलप्रमाणे नमुद सदस्य संख्येनुसार सद्यस्थितील पक्षांचे तौलानीक संख्याबळ खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | पक्षाचे नाव | तौलानिक संख्याबळ |
|---|---|---|
| १. | भारतीय जनता पार्टी | १.५० |
| २. | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | १.५० |
| ३. | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | १.०२ |
| ४. | शिवसेना | ०.८० |
| ५. | बहुजन विकास आघाडी | ०.१६ |

नामनिर्देशीत सदस्यांच्या नेमणूकीबाबत दि.१७/०४/२०१३ रोजी महानगरपालिकेतील सर्व गटनेत्यांची बैठक मा. आयुक्त यांच्या दालनात आयोजित करण्यात आली होती. सदर सभेमध्ये संख्याबळाबद्दल तसेच निवडणुक प्रक्रियेबद्दल मुद्दे उपस्थित झाल्यामुळे सदरच्या मुद्यांवर मा. राज्य शासनाकडून व मा. विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचेकडून मार्गदर्शन / अभिप्राय घेण्यात यावे व तद्नंतर त्यानुसार या विषयावर पुढील कार्यवाही करण्यांत यावी असा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार मार्गदर्शन मागविणेकरीता मा. राज्य शासनाकडे तसेच मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडे पत्रव्यवहार करण्यात आला होता. त्यामध्ये पहिला मुद्दा राष्ट्रवादी काँगेस पक्षाचे सदस्य संख्या बळाबाबत तर दुसरा मुद्दा निवडणुकीच्या प्रक्रियेबाबत होता. पहिल्या मुद्यांबाबत मा. विभागीय आयुक्त कोकण विभाग दि.०५/०६/२०१३ तसेच दुसऱ्या मुद्याबाबत मा. राज्य शासनाकडून दि. २४/०६/२०१३ रोजीच्या पत्रान्वये मार्गदर्शन / अभिप्राय प्राप्त झाले आहेत. दोन्ही पत्रानुसार याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१अ खालील तरतुदीनुसार कार्यवाही करावी असे या महानगरपालिकेस कळविण्यांत आले आहे.

महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या मार्गदर्शनानुसार पक्षाचे/गटाचे तौलानिक संख्याबळ विचारात घेऊन नामनिर्देशित सदस्य म्हणुन शिफारस करणेकामी विचारविनिमय करणेसाठी दि. २७/०६/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. आयुक्त यांच्या दालनात बैठक आयोजित केली असता सदर बैठकी मध्ये मा. सभागृह नेता, मा. विरोधी पक्ष नेता व गटनेते उपस्थित होते.

महापालिकेवर नामनिर्देशित करावयाच्या ५ (पाच) जागांसाठी प्राप्त झालेल्या १५ (पंधरा) नामनिर्देशन पत्रांपैकी १० (दहा) पात्र उमेदवारांची नावे खालीलप्रमाणे आहे.

१) श्री. हेमंत सदानंद म्हात्रे

२) श्री. शर्मा भगवती तुगनचंद

३) श्री. दुबोले प्रकाश शंकर

४)	श्री. पाटील धनेश परशुराम

५)	श्री. मुंज वासुदेव भास्कर

६)	श्रीम. गोहिल शानु जोरावरसिंग

७)	श्री. नलावडे दिनेश दगडू

८)	श्री. ठाकूर प्रकाश पांडुरंग

९)	श्री. एस्. ए. खान

१०)	श्री. सुशील गोपीकिसन अग्रवाल

सदर बैठकीत भारतीय जनता पार्टीचे गटनेत्यांनी त्यांच्या पक्षाच्या वतीने सादर करण्यांत आलेल्या दोन पात्र नामनिर्देशित उमेदवारांपैकी कोणत्याही उमेदवाराच्या नावाची शिफारस केलेली नाही. मात्र इतर गटनेत्यांनी पक्षनिहाय खालीलप्रमाणे नावे सुचविली आहेत :-

| अ.क्र. | पक्षाचे नाव | पात्र उमेदवाराचे नाव |
|---|---|---|
| १ | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | १. श्री. भगवती तुगनचंद शर्मा<br>२. श्री. प्रकाश पांडुरंग ठाकुर |
| २. | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | १. श्री. दिनेश दगडु नलावडे |
| ३. | शिवसेना | २. श्री. धनेश परशुराम पाटील |

वर नमुद केल्याप्रमाणे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने २ पात्र नामनिर्देशित उमेदवारांची स्वीकृत सदस्य म्हणून नेमणुक करण्यासाठी शिफारस केली असली तरीही त्यांच्या पैकी त्यांच्या पत्रामध्ये पहिल्या क्रमांकावर नमुद असलेले श्री. भगवती तुगनचंद शर्मा यांच्या नावाची शिफारस करण्यांत येत आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या केवळ एकाची व शिवसेनेने पक्षातील एका उमेदवाराच्या नावाची शिफारस करण्यांत येत आहे.

भारतीय जनता पार्टीच्या वतीने कोणतेही नाव सुचविण्यांत आले नसले तरीही महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्ती) नियम २०१२ चे नियम ४(क) मधील तरतुदीमध्ये नमुद केल्याप्रमाणे वरील तक्त्यामध्ये सुचविलेल्या नावांमध्ये कोणत्याही वैद्यकिय व्यावसायीकाचे नाव नसल्यामुळे, भारतीय जनता पार्टीतील पात्र असलेल्या उमेदवारांपैकी डॉ. सुशील गोपीकिसन अग्रवाल यांना नामनिर्देशित पालिका सदस्य म्हणून नामनिर्देशन करण्यासाठी शिफारस करण्यांत येत आहे.

सारांशतः, मिरा भाईंदर महानगरपालिकेवर नेमावयाच्या पाच स्वीकृत सदस्यांपैकी चार स्वीकृत सदस्य पदी नियुक्ती होण्यासाठी खालीलप्रमाणे शिफारस करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | पक्षाचे नाव | पात्र उमेदवाराचे नाव |
|---|---|---|
| १ | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | श्री. भगवती तुगनचंद शर्मा |
| २. | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | श्री. दिनेश दगडु नलावडे |
| ३. | शिवसेना | श्री. धनेश परशुराम पाटील |
| ४. | भारतीय जनता पक्ष | डॉ. सुशील गोपीकिसन अग्रवाल |

उर्वरित एका पदासाठी, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष व भारतीय जनता पार्टी यांचे संख्याबळ समान असल्यामुळे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१अ(३) अन्वये निर्णय घेण्याचे अधिकार मा. महासभेस असल्यामुळे, खालीलपैकी कोणत्या पक्षाच्या उमेदवाराची स्वीकृत सदस्य म्हणून नियुक्त करावी याबाबत निर्णय घेण्यांस मा. महासभेस विनंती करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | पक्षाचे नाव | पात्र उमेदवाराचे नाव |
|---|---|---|
| १ | राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष | श्री. प्रकाश पांडुरंग ठाकुर |
| २. | भारतीय जनता पक्ष | श्री. हेमंत सदानंद म्हात्रे |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०६/०७/२०१३

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक** (२३ ) :- रस्ते, चौक, वास्तू यांचे नामकरण करण्याच्या प्रस्तावाना मान्यता देणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध रस्ते, चौक, उद्याने व इतर वास्तूना नामकरण करण्याबाबत नागरीक व नगरसेवकाकडून प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. सदर प्रस्ताव खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | ठिकाण | प्रस्तावित नाव |
|---|---|---|
| १ | मोर्वा गांव बंदर आळी मधुकर धनाजी पाटील घराजवळील चौक | स्व. तुकाराम दाजी पाटील चौक |
| २ | मोर्वा स्मशान भूमी | स्व. काशिनाथ गोविंद पाटील स्मशानभूमी |
| ३ | मोर्वा गांव, शार्गिद शॉप ते गोडावून रस्ता | स्व. श्री. भाऊराव नारायण पाटील मार्ग |
| ४ | १. सुखसारग/नुरजहाँ इमारत/इब्राहिम मस्जिद समोरचा चौक | हजरत इब्राहिम अल्य सलाम चौक |
| | २. नागोरी जनता डेरी/रोहीत इमारत समोरच्या चौकाला | हजरत अबूबक्कर सिध्दीक रजिअल्लाताला अनहू चौक |
| | ३. तय्यब कासल इमारत ते गुलिस्तान पर्यंत रस्ता | हजरत मोईनुद्दीन चीश्ती (ख्वाजा गरीब नवाज मार्ग) |
| | ४. हिना एव्हेन्यू/जैन कॉटेज ते १०० फुटी रोड पर्यंतचा रस्ता | हजरत दादा ह्यात कलंदर मार्ग |
| | ५. नुरजहाँ इमारत ते पंचरत्न अपार्टमेंट पर्यंतचा रस्ता | गौसूल आजम दस्तगीर मार्ग |
| | ६. अस्मिता समिर ते दातार अपार्ट./रिलायन्स व्ह्यू इमारतीपर्यंतचा रस्ता | हजरत बिलाल रजिअल्लाताला अनहू मार्ग |

| | | |
|---|---|---|
| ५ | १.अस्मिता होराइजन ते अस्मिता हेरीटेज (बेक हाऊस) पर्यंत<br>२. मिरा नर्सिंग होम लेन | सर सय्यद अहमद मार्ग<br>हजरत उस्मान गनी रजिअल्लाताला अनहू मार्ग |
| ६ | १. शांतीपार्क हर्ष प्लाझा ते आर.एन.पर्यंत रस्ता<br>२. शांतीनगर बिल्डींग क्र.७८/८०,२७/२८, ७५/७६ व बी/२९ चौक<br>३. शांतीनगर सेक्टर २, जॉगर्स पार्क | जय गोपाल लाल मार्ग<br>जय गोपाल चौक<br>योगिजी महाराज उद्यान |
| ७ | मिरारोड (पूर्व) स्व. बी.के. भगत मार्ग व मंगल नगर क्रॉस रोड वरील चौक | हटकेश्वर महादेव चौक |
| ८ | मोर्वा गांवदेवी मंदीर ते रमेश पाटील घरापर्यंतचा रस्ता | श्री एकविरा आई मार्ग |
| ९ | मोर्वा गाव राधाकृष्ण मंदीर जवळील नाट्यमंच | कै. द्वारकाबाई नामदेव म्हात्रे नाट्यमंच |
| १० | मोर्वा गाव येथे श्री. ओमकारेशवर मंदिर ते पाड्या आळी पर्यंतचा रस्ता | स्व.श्री. जगन शेठ पाटील मार्ग |
| ११ | मोर्वा गाव पोलिस पाटील ते पांडुरंग म्हात्रे घर चौक | गावदेवी मंदिर चौक |
| १२ | भाईंदर (पू.) खारीगावातील नाट्यमंच | कै. परशुराम दामोदर पाटील नाट्यमंच |
| १३ | भाईंदर (पू.) बी.पी.रोड़ काशिनाथ अपार्टमेंट ते बजरंग बली हॉटेल रस्ता | स्व. दौलतसिंग भाटी मार्ग |
| १४ | मिरारोड (पूर्व) निदा पार्क ते गीतानगर अंतर्गत रस्ता व चौक | अश्रफुल उलेमा चौक व अश्रफुल उलेमा मार्ग |
| १५ | मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र. २२१ (बगीचा) | हिंन्दू हृदय सम्राट स्व. श्री. बाळासाहेब ठाकरे उद्यान |
| १६ | भाईंदर (पूर्व) बंदरवाडी चौक | नाना चौक |
| १७ | जैसलपार्क एस.टी.पी. समोरील मैदान | प्रा. राम कापसे मैदान |
| १८ | श्री. साफल्य सोसायटी ते गणपती मंदिर पर्यंतचा अंतर्गत रस्ता | श्री गणपती मंदिर मार्ग |

| | | |
|---|---|---|
| १९ | शितल दर्शन सोसायटी ते कॉस्मोपॉलिटन शाळेपर्यंतचा अंतर्गत रस्ता | सेंट लॉरेन्स मार्ग |
| २० | शितल स्वर सोसायटी ते आलाप झंकार सोसायटी पर्यंतचा अंतर्गत रस्ता | रहनुमा मदरसा मार्ग |
| २१ | शितल किरण सोसायटी ते शितल सरगम सोसायटी पर्यंतचा अंतर्गत रस्ता | सेंट गेब्रीयल मार्ग |
| २२ | श्री मिरा साफल्य सोसायटी ते मुकूंद पार्क सोसायटी पर्यंता अंतर्गत रस्ता | सावित्रीबाई फुले मार्ग |
| २३ | शितल आर्केड सोसायटी ते नवजीवन शितल आशिष सोसायटी पर्यंतचा अंतर्गत रस्ता | मदर टेरेसा मार्ग |
| २४ | ग्रीन मॅडोज सोसायटी ते सेंट जोसेफ चर्च पर्यंतचा अंतर्गत रस्ता | होली क्रॉस कॉन्व्हेंट स्कुल मार्ग |
| २५ | मिरारोड शांतीनगर से.२ उद्यान | जय सच्चिदानंद उद्यान |
| २६ | रामदेव पार्क रस्त्याकडून आयमाता मंदिराकडून आयडीयल पार्क कडे जाणारा रस्ता | मर्सी जॉन मेमोरीयल रस्ता |
| २७ | सरदार वल्लभाई शाळा केनवुड पार्ककडून रामदेव पार्क ते वागडनगर पर्यंतचा रस्ता | अजरामर मार्ग |
| २८ | वॉर्ड क्र. ३ जैसलपार्क चौपाटी बाल उद्यान | चाचा नेहरू बाल उद्यान |
| २९ | मिरारोड शांतीनगर सेक्टर .३ नाना – नानी पार्क | सरदार वल्लभभाई पटेल पार्क |
| ३० | भाईंदर (प.) वेलकंनी माता चर्चकडे जाणारा रस्ता | वेलकंनी शिरे मार्ग |
| ३१ | मुर्धा खाडी पूल | जिजाऊमाता पुल |
| ३२ | काशिमिरा नीलकमल हॉटेल समोरील चौक | पंडित दिनदयाळ उपाध्याय चौक |
| ३३ | मिरारोड मनपा हॉस्पीटल व अल्हाबाद बँकेसमोरील चौक | स्व. प्रमोद महाजन चौक |
| ३४ | नवघर आरक्षण क्र. ११७ उद्यान | स्वामी विवेकानंद उद्यान |
| ३५ | भाईंदर (पुर्व) इंद्रलोक फेस - ४ व फेस – ५ समोरील रस्ता | शहीद विजय साळसकर मार्ग |
| ३६ | आर.एन.पी. पार्क गार्डन | आर.एन.पी. पार्क उदयान |
| ३७ | श्रीजी पार्क ते सरोवर अपार्टमेंट आर.एन.पी. पार्क रस्ता | काशि विश्वनाथ मंदीर मार्ग |

| | | |
|---|---|---|
| ३८ | जैसल पार्क चौपाटी (धार्मिक कार्यक्रम ठिकाण) | सुदामाधाम |
| ३९ | कोठार गल्ली ६० फुटी वरून | संत ॲन्ड्रयू मार्ग (लेपोरा स्ट्रीट) |
| ४० | भाईंदर (प) उड्डाणपूल ते मिरारोड जाफरी खाडी कडे जाणारा डी.पी. रोड | माहेश्वरी भवन मार्ग |
| ४१ | भाईंदर (प) स्काय वॉक | स्व. नानाजी देशमुख स्कायवॉक |
| ४२ | मोअर डीपार्टमेंट स्टोर ते गौरव संकल्प रस्ता | शहिद हेंमत करकरे मार्ग |
| ४३ | शांती विदयानगरी ते गौरव संकल्प फेज – ४ रस्ता | शहिद विजय सालसकर मार्ग |
| ४४ | गौरव संकल्प फेज – ४ ते चिचबा देवी पावर हाउुस रस्ता | चिचबादेवी मार्ग |
| ४५ | हरीयस ड्रीम पार्क ते सालासर गार्डन रस्ता | कै. संगितकार श्रीकांत ठाकरे मार्ग |
| ४६ | *सग्नाय देवी मंदिर ते गोवला देव मंदिर रस्ता* | *कै. नानाशंकर शेठ मार्ग* |
| ४७ | शांती विदयानगरी ते गौरव संकल्प फेज – ४ जॉगर्स पार्क | कै. बाबा आमटे उदयान |
| ४८ | मिरारोड शांतीस्टार कार्यालय समोरील रस्ता | श्री. शामलजी अजमेरा मार्ग |
| ४९ | इंद्रलोक फेज.३ येथील चौक | ओम शांती ओम चौक |
| ५० | शांतीनगर सेक्टर १० उद्यान | लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल उद्यान |
| ५१ | जैसल पार्क जैन मंदिर चौक | सम्राट अशोक चौक |
| ५२ | नवघर शाळेमागील रस्ता (उद्याना शेजारी) | स्वातंत्र्य सैनिक कै.श्री. गोपीनाथ रामचंद्र पाटील मार्ग |
| ५३ | मिरा-रोड कनकीया सरोगी अपार्टमेंट, बेव्हर्ली पार्क चौक | शहीद विजय साळसकर चौक |
| ५४ | भाईंदर (प) स्टेशन रोड ॲनी अपार्टमेंट समोरील चौक | स्व.श्रीमती. ॲनी जोसेफ रॉड्रीक्स चौक |
| ५५ | मिरारोड नयानगर सन राईज इमारत समोरील चौक | हजरत इब्राहीम (अलेहिस्सलाम) चौक |
| ५६ | भाईंदर (पूर्व) चौपाटी विधिवत कार्य इमारत मागील धक्का | सावित्री घाट |
| ५७ | मिरारोड सृष्टी शॉपिंग सेंटर येथील चौक | सृष्टी चौक |
| ५८ | आर.एन.पी. पार्क चिंतामणी ते कोळी नगर रस्ता | रामशरण अमृतवाणी आश्रम मार्ग |

| | | | |
|---|---|---|---|
| ५९ | मिरारोड (पूर्व) चंदन ॲव्हेन्यू ते सनटॉक इमारतीपर्यंतचा रस्ता | बालाजी मार्ग | |
| ६० | मिरारोड (पूर्व) प्रियंका इमारत समोर बालाजी मठच्या बाजूचा चौक | बालाजी चौक | |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची "ड" मधील प्रकरण ११ (२) (१) (अ) अन्वये नावे देण्याचा अधिकार मा. महासभेस आहे. सदर नामकरण प्रस्ताव मान्य झाल्यास जाहीर वृत्तपत्रात नावे प्रसिध्द करुन पोलिस खाते, पोष्ट खाते व महानगरपालिकेच्या सर्व संबंधित विभागाना नविन नावानूसारच पत्रव्यवहार करण्याबाबत कळविण्यात येईल. सदर प्रस्तावाबाबत विचार विनिमय होऊन अंतिम मान्यता देण्यास शिफारस आहे.

**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

[illegible] २३/५/[illegible]९३ पेज ४...९५
आ. स्थायी [illegible] / [illegible] सौंपवारा
नोंद रजिस्टर क्र. ...९०...............

निरीक्षक
नगरसचिव विभाग.

# <u>मिरा भाईंदर महानगरपालिका</u>

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०३/०७/२०१३.

## <u>मा. महासभा दि. ०६/०७/२०१३</u>
## पुरक घोषणा

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ____________________

नगरसेवक/नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसूची प्रकरण २ नियम १ (ज) अन्वये दिनांक ०६/०७/२०१३ रोजी आयोजित केलेल्या सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेमध्ये पुढील विषय समाविष्ट करणेची पुरक घोषणा करण्यांत येत आहे.

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| २४ | सन्मा. सदस्य श्री. सुरेश जे. खंडेलवाल यांचा दिनांक २८/०६/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>------------------------------------------<br>भाईंदर (प.) प्रभाग समिती क्र. ०१ (जुने नगरपरिषद कार्यालय) समोर भाडेकरु करिता बांधलेल्या इमारती मधील गाळ्यांचे जुने भाडे माफ करणेबाबत. |
| २५ | सन्मा. सदस्य श्री. प्रमोद जयराम सामंत यांचा दिनांक २८/०६/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>------------------------------------------<br>मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मिरारोड, बंदरवाडी व काशिमिरा या तीन स्मशानाकरीता महानगरपालिकेमार्फत लाकडे पुरवठा करणेबाबत. |
| २६ | सन्मा. सभागृह नेते श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक २९/०६/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>------------------------------------------<br>मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या रहिवाश्यांना एम.एम.आर.डी.ए.च्या रेंटल हाऊसिंग प्रकल्पात तात्पुरते अल्पदरात भाड्याने घर उपलब्ध करुन देणेबाबत. |
| २७ | सन्मा. सदस्या प्रभात प्रकाश पाटील यांचा दिनांक ०२/०७/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>------------------------------------------<br>आर.सी.एच. खालील लिंकवर्कर्सच्या मानधनाबाबत. |

(सुरेश ल. पाटील)
**महापालिका नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

E:\01 Backup 02\1 D\01 My Document\01 Nagar Sachiv\04 Purak Ghoshna\Purak Ghoshana - 13-14.doc

सचिव/पुरक घोषणा/०२/२०१३
दि. २८/०६/१३


# सुरेश ज. खण्डेलवाल

**नगरसेवक**

मिरा भाईंदर महानगरपालिका

विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन

मिरा भाईंदर महानगरपालिका,
मुख्य कार्यालय,
स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

कार्यालय : शॉप नं. ९, बरसाना, सालासर ब्रिज भुमी कॉम्पलेक्स, टेम्बा रोड, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे -४०१ १०१ मोबाईल : 9892773388


जावक क्र. प्रकरण क्र. २४ करिता. दिनांक २८/६/२०१३

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची "ड" मधील प्रकरण दोन (१)(ज) अन्वये**

**प्रति**
**मा. नगरसचिव**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**विषय :-** भाईंदर (प.) प्रभाग समिती क्र. ०१ (जुने नगरपरिषद कार्यालय) समोर भाडेकरु करीता बांधलेल्या इमारती मधील गाळयांचे जुने भाडे माफ करणे बाबत...

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. ०१ (जुने नगरपरिषद कार्यालय) कार्यालयासमोर रस्ता रुंदी करण्यात तोडलेल्या तत्कालिन ग्रामपंचातीपासुन असलेल्या भाडेकरु साठी शॉपिंग सेंटर इमारत बांधली आहे. सदर गाळे महानगरपालिकेस संबधिताना मोफत देऊन पर्यायी व्यवस्था करावयाची होती, परंतु महानगरपालिकेने बाजार भाव प्रमाणे भाडे ठरवून सदर गाळेधारकाना नोटीसा दिल्या आहेत. सदर गाळे धारकांना सन २००२ पासुन आलेले भाडे भरणे शक्य होणार नाही व त्याची आर्थिक पिळवणूक केल्यासारखे होईल. तरी मा. महासभा दि.१५/०१/२०१३ ठराव क्र. ३३ अन्वये पारीत केलेल्या ठरावात बदल करुन यापुर्वीची थकबाकी संबधित गाळेधारकाकडून एका वर्षात चार समान हपत्यात वसूली करावी ही अट रद्द करावी व त्यांच्याकडून १ एप्रिल २०१३ पासुनच भाडे वसूल करण्यात यावे असा ठरावात बदल करण्या करीता माझा हा प्रस्ताव मा. महासभेत घेण्यात यावी ही विनंती.

आपला विश्वासू

Khandelwal

(सुरेश खंडेलवाल)
नगरसेवक

सचिव/मुद्रक शाखा/०५/२०१२-१३ दि.२८/६/१३


**श्री. प्रमोद जयराम सामंत**

सदस्य स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

**विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन**

मिरा भाईंदर महानगरपालिका, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

निवास : ए/००६, रिजन्सी एन्क्लेव्ह, पुनमसागर कॉम्प्लेक्स, मिरारोड (पूर्व), ता. जि. ठाणे - ४०११०७.

दुरध्वनी : २८११३४५७ भ्रमणध्वनी : ९८२१ ०६३ १६२ • E-mail : samantpramod@yahoo.co.in


जावक क्र. : २८/०६/२०१३

दिनांक :

प्रकरण क्र. २५ करीता.

जावक क्र. ______ दिनांक : २८/६/२०१३

प्रति,

**मा. नगरसचिव सो.,**

मिरा-भाईंदर महानगरपालिका.

विषय :- **मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मिरारोड, बंदरवाडी व काशिमिरा या तीन स्मशानाकरीता महानगरपालिकेमार्फत लाकडे पुरवठा करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची "ड" मधील प्रकरण दोन(१)(ज) अन्वये मा. महासभेपुढे ठेवणेबाबत....**

**महोदय,**

वरील विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेच्या १४ स्मशानभुमीपैकी ११ स्मशानभुमीत महानगरपालिकेमार्फत मोफत पुरवठा करण्यात येतात. तथापि बंदरवाडी काशिमिरा व मिरारोड स्मशानभुमीत खाजगी संस्थेमार्फत लाकडे ठेऊन विक्री करण्यात येते. मोफत लाकडे मागणा-यांना मोफत लाकडे देऊन सदर संस्था महानगरपालिकेकडे रु. १०००/- प्रमाणे रक्कमेची मागणी करणे व महानगरपालिका सदर रक्कम संबंधीत संस्थाना अदा करते. सदर संस्थामार्फत जळाऊ लाकडाचे दर जास्त आकारणे, लाकडे ओली असणे, लाकडाचा साठा नसणे अशा तक्रारी प्राप्त होतात.

तरी सदर तीन स्मशानभुमीत देखिल महानगरपालिकेमार्फत जळाऊ लाकडे पुरवठा करण्यात यावी याबाबत निर्णय घेण्याकरीता माझा सदर प्रस्ताव मा. महासभेपुढे घेण्यात यावा, ही विनंती.

(प्रमोद सामंत)

नगरसेवक तथा स्थायी समिती सदस्य

मिरा-भाईंदर महानगरपालिका

पत्र प्राप्त दि: 28/6/2013

प्राप्ति: 2 45

प्रकरण क्र. २६ करीता

सचिव (पुरक) कार्य ०११/०६/१३-१४
दि २५/६/२०१३

**ध्रुवकिशोर पाटील**
सभागृह नेता
मिरा भाईंदर महानगरपालिका
सदस्य - मंडल रेल्वे उपभोक्ता सलाहकार समिती, मुंबई-पश्चिम रेल्वे
सदस्य - दक्षता समिती शिधावाटप कार्यालय, भाईंदर

जा.क्र. मनपा/सभागृहनेता/५९/२०१३-१४ दिनांक :- २९/०६/२०१३

प्रति,
मा. नगरसचिव सो.,
सचिव विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

**विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या रहिवाश्यांना एम.एम.आर.डी.ए. च्या रेंटल हाउसिंग प्रकल्पात तात्पुरते अल्पदारात भाड्याने घर उपलब्ध करून देणेबाबत प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनूसूची "ड" मधील प्रकरण दोन(१)(ज) अन्वये मा. महासभेपुढे ठेवणेबाबत.**

महोदय,

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात जुन्या धोकादायक व मोडकळीस आलेल्या इमारती दरवर्षी अचानकपणे पडून मानवहानी होत आहे. धोकादायक इमारतीमधील रहिवाशी इमारत खाली करत नाहीत. त्यामुळे पावसाळा कालावधीत अचानकपणे इमारत पडून मानवी हानी / मृत्यु होत आहे व अशा घटना मागील दोन वर्षात घडलेल्या आहेत. विद्यमान इमारतीचे चटईक्षेत्र व सध्याच्या नियमामधील तरतुद यांचा मेळ घालून नविन पुर्नविकास करणे इमारत धारकांस, गृहनिर्माण संस्थेस, विकासकास शक्य होत नाही. त्यामुळे मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे वाढीव चटईक्षेत्राचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे परंतु, प्रस्ताव प्रलंबित असल्याने पुर्नबांधणीस अनेक अडथळे निर्माण होत आहेत. धोकादायक इमारतीमध्ये नागरिक जीव मुठीत धरून राहत आहेत. ह्या सर्व रहिवाश्यांना एम.एम.आर.डी.ए. च्या रेंटल हाउसिंग प्रकल्पात तात्पुरते अल्पदारात भाड्याने घर उपलब्ध करून द्यावे असा मी ठराव मांडत आहे व सदरचा प्रस्ताव अंतिम मंजुरीकरिता राज्य शासनाकडे पाठवावा.

सुचक :-
सही ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदकः-
सही ज्युबेर इनामदार

संपर्क कार्यालय - ६ पदमावती, नारायणनगर, भाईंदर (प.), ता.जि.ठाणे - ४०१ १०१.
Mobile : 98202 96597, Tel.:2819 8989 E-mail : info@dhruvkishor.com Website : dhruvkishor.com

सचिव/पुरक बोषणा/ ७/४/२०१३-१४
मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, दि - २/७/१३

# सौ. प्रभात प्रकाश पाटील


नगरसेविका
मिरा भाईंदर महानगरपालिका
विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन

स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

संपर्क कार्यालय : गुलमर्ग अपार्टमेन्ट, नवघर रोड, भाईंदर (पूर्व), ता. जि. ठाणे - ४०१ १०५. मोबाईल : 9892409323
निवास : पारिजात बंगलो, इंद्रलोक फेस -४, न्यु गोल्डन नेस्ट रोड, भाईंदर (पूर्व), ता. जि. ठाणे - ४०१ १०५. E-mail: prabhat.p.patil@gmail.com


(१)

जावक क्र ________ प्रकरण क्र. २७ करीता दिनांक : २/७/१३

प्रती,

सचिव, मि. भा. म. न. पा.

**अनुसुची "ड" प्रकरण २, नियम अन्वये प्रस्ताव**

विषय - R.C.H. खालील लिंकवर्कर्सच्या मानधनाबाबत.

महोदय,

सन २००७-२०१२ च्या मागील महासभेत एका लक्षवेधी द्वारे मी लिंकवर्कर्सच्या बाबतीत एक लक्षवेधी मांडली होती. त्या अन्वये हया क्षेत्रात म.न.पा. तर्फे १३० महिला कार्यरत असुन घरोघरी पोलीओ डोस पाजणे, हिवतापासारख्या इतर सर्व साथीच्या रोगांची माहीती घेणे, नोंदी घेणे, औषध वाटप करणे आदी कामे हया महीला महीनाभर करीत असतात. त्याचे महीनाकाठी मानधन म्हणुन शासन ५६० व म.न.पा. कडुन २००रू. इतके मिळते. हे काम करणाऱ्या महिलांची ही क्रुर थटटाच आहे. महिनाभर घरोघरी फिरून आपली पर्वा न करता थंडी, वारा, उन, पाउस हयाची पर्वा न करता केवळ ७०० रू. पोटी इतकी सेवा कोणीही करणार नाही. त्या करतात कारण त्यांना उदयाची आशा आहे. त्या लक्षवेधी नंतर म्हणजे २० पासुन आजपर्यंत त्यांच्या मानधनात काही सुधारणा झाली नाही. त्याचे कारण देताना प्रशासन कायम अर्थसंकल्पात तरतुद नसल्याचे कारण देत असे. त्यामुळे २०१३-१४ च्या आर्थीक वर्षात तरतुद करण्यात यावी म्हणुन मी आरोग्य विभागास पत्र दिले होते. त्यानुसार त्यांनी २०१३-१४ च्या अर्थसंकल्पात तशी तरतुद केली आहे. तसे लेखी पत्र त्यांनी मला दिले आहे. २००७ पासुन आशेने तुटपुंज्या मानधनावर गेली ७ वर्षे काम करणाऱ्या महिलांच्या भविष्याचा विचार करता त्यांच्या मानधनात योग्य आणि आवश्यक अशी वाढ होणे अपेक्षित आहे. म्हणुन हा प्रस्ताव स्विकारण्यात यावा.

आपली,

सौ. प्रभात प्रकाश पाटील

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]